# मिरा भाईंदर महानगरपालिका

## मुख्य कार्यालय, तिसरा मजला, छत्रपती शिवाजी महाराज सभागृह

मा. महासभा दि. ०७/१२/२०२० (दि.४/१२/२०२० ची तहकुब सभा)

शुक्रवार दि. ०४/१२/२०२० रोजी मिरा भाईंदर महानगरपालिकेची मा. महासभा सकाळी १०.३० वाजता आयोजित करण्यात आली होती . सदर सभा तहकुब केल्याने विषयपत्रिकेवरील प्रलंबित विषय क्र. ३१ ते ४२ व पुरक घोषणा क्र . ४३ या विषयांवर चर्चा करण्यासाठी ही सभा सोमवार , दि. ०७/१२/२०२० रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता Video Conferencing द्वारे मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित केली असता खालीलप्रमाणे सदस्य हजर होते.

**उपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १) | हसनाळे ज्योत्सना जालींदर | महापौर |
| २) | गेहलोत हसमुख मोहनलाल | उपमहापौर |
| ३) | पाटील रोहिदास शंकर | सभागृह नेता |
| ४) | पाटील प्रविण मोरेश्वर | विरोधी पक्षनेता |
| ५) | भोईर सुनिता शशिकांत | सदस्या |
| ६) | शाह रिटा सुभाष | सदस्या |
| ७) | तिवारी अशोक सूर्यदेव | सदस्य |
| ८) | पांडेय पंकज सूर्यमणि | सदस्य |
| ९) | गोहिल शानू जोरावर सिंह | सदस्या |
| १०) | कांगणे मीना यशवंत | सदस्या |
| ११) | सिंह मदन उदितनारायण | सदस्य |
| १२) | शेट्टी गणेश गोपाळ | सदस्य |
| १३) | ढवण निलम हरीश्चंद्र | सदस्या |
| १४) | कदम अर्चना अरुण | सदस्या |
| १५) | नलावडे दिनेश दगडु | सदस्य |
| १६) | भोईर गणेश गजानन | सदस्य |
| १७) | पाटील प्रभात प्रकाश | सदस्या |
| १८) | गुप्ता कुसुम संतोष | सदस्या |
| १९) | पाटील धनेश परशुराम | सदस्य |
| २०) | पाटील वंदना मंगेश | सदस्या |
| २१) | रावल मेघना दिपक | सदस्या |
| २२) | शाह राकेश रतिशचंद्र | सदस्य |
| २३) | सिंग श्रीप्रकाश जिलेदार | सदस्य |
| २४) | धृवकिशोर मन्साराम पाटील | सदस्य |
| २५) | जैन गीता भरत | सदस्या |
| २६) | जैन सुनिता रमेश | सदस्या |
| २७) | भूप्ताणी रक्षा सतीश (शाह) | सदस्या |
| २८) | मोकाशी दिपाली आनंदराव | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| २९) | व्यास रवि वासुदेव | सदस्य |
| ३०) | परेरा कॅटलीन एन्थोनी | सदस्या |
| ३१) | रकवी वैशाली गजेंद्र | सदस्य |
| ३२) | अग्रवाल सुशील गोपीकिशन | सदस्य |
| ३३) | खंडेलवाल सुरेश जगदीश | सदस्य |
| ३४) | परदेशी गिता हरीश | सदस्या |
| ३५) | पाटील नरेश तुकाराम | सदस्य |
| ३६) | सय्यद नुरजाहॉ नाझर हुसेन | सदस्या |
| ३७) | शेख अमजद गफार | सदस्य |
| ३८) | पाटील जयंतीलाल गुरूनाथ | सदस्य |
| ३९) | घरत तारा विनायक | सदस्या |
| ४०) | पांडे स्नेहा शैलेश | सदस्या |
| ४१) | शिर्के अनंत गेणू | सदस्य |
| ४२) | पाटील वंदना विकास | सदस्या |
| ४३) | पाटील संध्या प्रफुल्ल | सदस्या |
| ४४) | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | सदस्या |
| ४५) | डिम्पल विनोद मेहता | सदस्या |
| ४६) | शिंदे रुपाली वसंत (मोदी) | सदस्या |
| ४७) | थेराडे संजय अनंत | सदस्य |
| ४८) | मुखर्जी अनिता बबलू | सदस्या |
| ४९) | चंद्रकांत सिताराम वैती | सदस्य |
| ५०) | पारधी सुजाता यशवंत | सदस्या |
| ५१) | म्हात्रे सचिन केसरीनाथ | सदस्य |
| ५२) | यादव मिरादेवी रामलाल | सदस्या |
| ५३) | म्हात्रे मोहन गोपाळ | सदस्य |
| ५४) | सोनार सुरेखा प्रकाश | सदस्या |
| ५५) | भोईर विणा सुर्यकांत | सदस्या |
| ५६) | भोईर कमलेश यशवंत | सदस्य |
| ५७) | पाटील अनिता जयवंत | सदस्या |
| ५८) | भोईर भावना राजू | सदस्या |
| ५९) | भोईर राजू यशवंत | सदस्य |
| ६०) | मांजरेकर आनंद दत्ताराम | सदस्य |
| ६१) | अरोरा दीपिका पंकज | सदस्या |
| ६२) | बेलानी हेमा राजेश | सदस्या |
| ६३) | दळवी प्रशांत ज्ञानदेव | सदस्य |
| ६४) | गजरे दौलत तुकाराम | सदस्य |
| ६५) | नाईक विविता विवेक | सदस्या |
| ६६) | सोंस नीला बर्नाड | सदस्या |
| ६७) | राय विजयकुमार सिस्थन नारायण | सदस्य |
| ६८) | शेख रुबीना फिरोझ | सदस्या |
| ६९) | डिसा मर्लिन मर्विन | सदस्या |

| | | |
|---|---|---|
| ७०) | सावंत अनिल दिवाकर | सदस्य |
| ७१) | मेहरा राजीव ओमप्रकाश | सदस्य |
| ७२) | परमार हेतल रतिलाल | सदस्या |
| ७३) | भट दीप्ती शेखर | सदस्या |
| ७४) | जैन दिनेश तेजराज | सदस्य |
| ७५) | भावसार वंदना संजय | सदस्या |
| ७६) | शाह सीमाबेन कमलेश | सदस्या |
| ७७) | दुबे मनोज रामनारायण | सदस्य |
| ७८) | विराणी अनिल रावजीभाई | सदस्य |
| ७९) | सपार उमा विश्वनाथ | सदस्या |
| ८०) | अहमद साराह अकरम | सदस्या |
| ८१) | इनामदार जुबेर अब्दुल्ला | सदस्य |
| ८२) | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | सदस्य |
| ८३) | भोईर जयेश भानुदास | सदस्य |
| ८४) | म्हात्रे नयना गजानन | सदस्या |
| ८५) | भानुशाली वर्षा गिरधर | सदस्या |
| ८६) | गोविंद हेलन जॉर्जी | सदस्या |
| ८७) | बगाजी शर्मिला विन्सन्ट | सदस्या |

**गैरहजर सदस्य -**

| | | |
|---|---|---|
| १) | जैन राजेंद्र भवरलाल | सदस्य |
| २) | रॉड्रीकस मोरस जोसेफ | सदस्य |
| ३) | शेट्टी अरविंद आनंद | सदस्य |
| ४) | म्हात्रे परशुराम पदमाकर | सदस्य |
| ५) | कासोदारिया अश्विन शामजीभाई | सदस्य |
| ६) | म्हात्रे विनोद काशिनाथ | सदस्य |
| ७) | बांड्या एलायस दुमिंग | सदस्य |

**रजेचा अर्ज - निरंक**

**नगरसचिव :-**

सभासूचना टाईप करणे . सर्वप्रथम प्रश्नोत्तराच्या तासाला सुरुवात करतो . सन्मा. सदस्य अनिल सावंत ह्यांनी दि. 23/12/2019 रोजी विचारलेला प्रश्न. सावंत साहेब आपण आपल्या प्रश्नाच्या कामकाजाला सुरुवात करावी.

**अनिल सावंत :-**

आदरणीय महापौर मॅडम, 23/12/2019 ला वर्धमान फॅन्टसी टाऊन पार्क आरक्षण क्र . 262 हयाबद्दल प्रशासनाला प्रश्न विचारला होता . अपेक्षा ही होती त्या प्रश्नाचे सविस्तर उत्तर आपल्याला मिळेल आणि प्रशासन काहीतरी कारवाई करेल. 9/11/2020 ला प्रशासनाने मला उत्त्र दिले ते अपूर्ण उत्तर आहे. मी प्रशासनाला विचारु इच्छितो की आज टाऊन पार्कची परिस्थिती काय आहे.

**दिपक खांबित :-**

सद्यस्थितीत टाऊन पार्कचा ताबा वर्धमान फॅन्टसी ताब्यात असून आरबिट्रेटरची नेमणूक केली आहे. आरबिट्रेटरची कारवाई सुरु आहे.

अनिल सावंत :-

मा. महापौर मॅडम 2006 ला महासभेचा एक ठराव झाला तो सर्वानुमते पास झाला त्या ठरावाच्या अनुषंगाने ह्या शहरामध्ये एक कुशल असा सेवक म्हणतात . टाऊन पार्क त्याठिकाणी 262 आरक्षणामध्ये विकसित करण्यात यावे प्रथम तो महापालिकेनी प्र यत्न केला पण त्यावेळी महापालिकेची आर्थिक परिस्थिती तेवढी चांगली नव्हती . त्यामुळे बी.ओ.टी. तत्वावर हे टाऊन पार्क बनवण्याचा निर्णय एक मताने घेण्यात आला. त्यासाठी वर्धमान फॅन्टसी ह्यांनी सर्वात जास्त निविदा भरली आणि त्यांना 2007 मध्ये करार करुन ज्या ज्या गोष्टी टाऊन पार्कमध्ये बनवायच्या होत्या त्या बनवून संपूर्ण 262 आरक्षण त्याच्या ताब्यात देतात 2007 ला हा ठराव झाला वर्षाला 45 लाख त्याने महापालिकेला देण होते. आजपर्यंत त्याने किती जमा झाले तुम्ही मला जे उत्तर दिले आहे त्याने महापालिकेकडे फक्त दोन करोड जमा केले आहेत. 2016 ला ही गोष्ट लवादाकडे गेली त्यावेळी 9 वर्ष पूर्ण टाऊन पार्क वापरले आहे . पालिकेत कमीत कमी पाच करोड जमा व्हायला पाहिजे होते . 45 लाखापैकी 10 टक्के ॲप्रिसिएशन प्रत्येक वर्षाला त्याच्यावर घेणार होतो . पण असे असताना वर्धमान फॅन्टसीला एवढी मूभा एवढी सुविधा का देण्यात आली प्रशासनाने ह्या गोष्टी ज्या शहराच्या हितामध्ये होत्या महापालिकेचे आर्थिक उत्पन्न ह्या ठिकाणी बुडाले. मग प्रशासनाने त्याला असेच का सोडले . सदस्यांनी ठराव करुन दिला. शहरामध्ये चांगली गोष्ट होते मग प्रशासनाने पालिकेचे हित का बघितले नाही. दि. 29/06/2009 ला गॅरन्टी घेतली ती 3 सप्टेंबर 2016 ला आपण लवाद नेमलात. आज 4 वर्ष पूर्ण झाली ह्या साडेचार वर्षामध्ये लवाद करतो काय अजून ही जागा त्याच्या ताब्यात आहे . पालिकेचे उत्पन्न शून्य. पालिकेचे उत्पन्न बुडाले. लोकांना त्या सुविधेचा उपभोग घेता येत नाही. आज त्यांनी ते पजेशन आपल्याकडे ठेवले आहे पालिकेला काही न देता त्याचा धंदा चालू आहे . ह्याचे प्रशासनानी उत्तर द्यावे. कोणते आर्थिक हितसंबंध प्रशासनाचे ह्याच्यात गुंतले आहेत.

दिपक खांबित :-

आपण 4 वर्ष भाडे भरले त्यानंतर भाडे भरायचे बंद केले आपण त्याला नोटिसा दिल्या. नियमानुसार कारवाई करुन त्याचे जे कॉन्ट्रॅक्ट आहे ते महापालिकेनी रद्द केले आहे . तथापि ह्याबाबत त्यांनी कोर्टात जाऊन स्थगिती घेतली आणि त्यानंतर करारनाम्यातील अटीशर्तीसाठी लवादाची नेमणूकीची मागणी केली. त्यानंतर लवाद नेमला आहे. हे लवादापुढे न्यायप्रविष्ठ प्रकरण आहे.

अनिल सावंत :-

साहेब प्रॉपर्टी पालिकेची ॲग्रीमेंट पालिकेच्या हितामध्ये पालिकेनी ॲग्रीमेंट बनवले मग त्याला कोर्टामध्ये स्टे कसा मिळाला आपले वकील काय करत होते . परिवहन असू दे कचऱ्याचे टेंडर असू दे आपण मोठमोठे वकिल त्या ठिकाणी उभे करतो. आज त्याठिकाणी परिस्थिती बघा त्या लोकांनी खंडर बनवून टाकले आहे. 4 वर्ष त्यांनी तुम्हाला भाडे दिले. 5 वर्ष पालिका काय करत होती. तुम्ही 2016 ला लवाद नेमला 2007 ला ॲग्रीमेंट बनली आहे. परंतु 5 वर्ष भाडे दिले नाही त्यावेळी पालिकेनी काय केले. पालिकेनी प्रॉपर्टी का ताब्यात घेतली नाही. तुमच्या ॲग्रीमेंटमध्ये आहे पालिका घेऊ शकते.

दिपक खांबित :-

अटीशर्तीनुसार प्रशासनाने कारवाई करुन ते कॉन्ट्रॅक्ट रद्द केले आहे . लवादासमोर ते प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्याच्यामध्ये 2016 ला मा . उच्च न्यायालयाचे देशपांडे म्हणून निवृत्त न्यायाधिशाची नेमणूक केली होती . त्याच्यापूढे हे प्रकरण बरेच पूढे गेले होते . तथापी 20196 मध्ये त्यांचा मृत्यू झाल्याने आपण पुन्हा हायकोर्टात गेलो आणि हायकोर्टाच्या कन्सेनने हायकोर्टाने नविन लवाद दिले त्यांची आताच नेमणूक झाली. त्याच्यापुढे प्रकरण सुरु होणार आहे . कोव्हीडमुळे सर्व थांबलेले आहे तथापी हे प्रकरण आता सुरु होईल . वर्धमान फॅन्टसी मार्फत जे काही चालवण्यात येते

आणि तुम्ही बोलले जी काय काम करण्यांत येत नाही त्याचे सर्व फोटोग्राफ दर 2-3 महिन्याला आलेल्या तक्रारी लवादासमोर वेळोवेळी सादर केले आहेत. लावादापुढे ह्याचा निर्णय होईल.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब आपण त्यावेळी ह्या शहरामध्ये नव्हता वर्धमान फॅन्टसी जेव्हा डेव्हलप करायची होती त्यामध्ये बोटींग क्रॅम्प विस्तारीकरण , टाऊन पार्क कुंपण भिंत लगत खेळण्याकरिता रेल्वे ट्रॅक, जॉगर्स ट्रॅक, रस्ते टाऊन पार्क दर्शनी डेकोरेटीव्ह रिटनिंग हॉल, सुलभ शौचालय ह्या सर्व गोष्टी त्यांनी करुन द्यायच्या होत्या . ह्याच्यातले किती गोष्टी त्यांनी केल्या . लोकांना त्याचा किती उपयोग झाला. सुरुवातीपासून आपण वर्धमान फॅन्टसी लूज का सोडले आहे . त्याच्या बाजूची जागा पार्किंगसाठी होती त्या जागेवर लाखो रुपये देऊन तो लग्नासाठी देतो . त्याबाबत पालिका का कारवाई करत नाही. ॲग्रीमेंट बनवते वेळी पालिकेच्या हातात काय ठेवले की नाही पालिकेनी एवढी मोठी जागा दिली त्यावेळी पालिकेनी आपल्याकडे काही गोष्टी ठेवल्या की नाही . कोणीतरी कोर्टात जायचे आणि पालिकेचे उत्पन्न शून्य.

**दिपक खांबित :-**

हे दोन टप्प्यामध्ये डेव्हलप करायचे होते . पार्ट ए आणि पार्ट बी . पार्ट ए मध्ये त्याला तुम्ही जी वाचून दाखवली ती काम करायची होती ती त्यांनी केलेली आहेत . त्याच्यामध्ये आपण त्यांना अजूनपर्यंत जवळ जवळ सहा हजार स्क्वेअर मिटरची जागा ताब्यात दिली नाही ती जागा आपल्या पण ताब्यात आली नाही . त्यामुळे तिकडचे डेव्हलपमेंट बाकी आहे . पार्ट बीमध्ये त्याने क्लब हाऊस बांधायचे होते त्याचे नकाशे 2010 ला आपण मंजूर केले आहेत त्यानी ते क्लब हाऊसचे काम सुरु केले नाही ह्या सर्व गोष्टीकरिता आपण त्याचे कॉन्ट्रॅक्ट रद्द केले. तो मेन्टेनन्स नीट करत नव्हता . त्यासाठी कॉन्टॅक्ट रद्द केले.

**अनिल सावंत :-**

कॉन्ट्रॅक्ट रद्द केल्यानंतर टाऊन पार्कचे पीसफूल पजेशन पालिकेला का घेता आले नाही . पालिका कुठे कमी पडली . तुमच्या ॲग्रीमेंटमध्ये कॉन्ट्रॅक्टर टर्मिनेट झाले तर ती जागा पालि केच्या ताब्यात यायला पाहिजे.

**दिपक खांबित :-**

पूढची प्रोसिजर आरबिट्रेटर नेमायचा होता तो नेमलेला आहे.

**अनिल सावंत :-**

साहेब तुमच्या प्रत्येक गोष्टीमध्ये आरबिट्रेटर असतात आरबिट्रेटर नेमला की तुमचे काम संपले. त्याचा धंदा चालू.

**दिपक खांबित :-**

त्यांच्या सगळ्या बाबी कायदेशीर आहेत.

**अनिल सावंत :-**

आरबिट्रेटरच्या कॉन्समुळे पालिकेचा प्रत्येक ठिकाणी नुकसान झाले आहे . ह्याला जबाबदार कोण. महापालिकेनी ठराव केला त्यावेळी म्हटले नव्हते की आरबिट्रेटर नेमला म्हणून प्रत्येक गोष्टीमध्ये आरबिट्रेटर त्यांनी पहिले जेव्हा भाडे द्यायला बंद केले तेव्हा त्यावेळी पालिकेनी पजेशन का घेतले नाही. त्यामध्ये कंडीशन आहेत तो जर भाडे देत नसेल डिफॉल्टर झाला असेल मग पाच वर्ष पालिकेनी वाट का बघितली . लोकांसाठी कधी ओपन होणार आहे . आपण वाटच बघत राहायची का लवाद निर्णय कधी देणार? आणखी 25 वर्षानी लवाद निर्णय देईल.

**दिपक खांबित :-**

वर्षभरामध्ये निर्णय होईल . आम्ही हे फास्ट ट्रॅकमध्ये घ्यायला सांगितले आहे . त्याला आतापर्यंत चार वर्ष झाली आहेत . आम्ही नविन आरबिट्रेट रला आपल्या भावना कळवल्या आहेत . वर्षभरात निर्णय होईल.

**अनिल सावंत :-**

ह्याच्या लवादामध्ये पालिकेचे रिप्रेझेन्टेटीव्ह कोण आहेत.

**दिपक खांबित :-**

आपल्याकडून लवादाच्या वेळेला आम्हीच जातो. लॉ ऑफिसर, वकिला जातात आम्ही जातो.

**अनिल सावंत :-**

लवाद ज्यावेळी नेमायचे त्यावेळी कंडीशन टाकली होती त्यामध्ये तुमच्या ॲग्रीमेंटमध्ये एक रिप्रेझेन्टेटीव्ह पालिकेचा एक रिप्रे झेन्टेटीव्ह, वर्धमान फॅन्टसी आणि थर्ड पर्सन म्हणजे रिटायर्ड जज अशी हेयरींग व्हायला पाहिजे होती.

**दिपक खांबित :-**

लवादाची प्रोसिजर लवादाच्या नियमानुसारच चालू आहे . लवादासमोर आहे जे काही करताना लवादालाच सांगायला लागते आणि त्याप्रमाणे सर्व गोष्टी आम्ही लवादाला सांगत आहोत.

**अनिल सावंत :-**

लवादाजवळ कसे ॲक्सेप्ट करता ही पालिकेची प्रॉपर्टी आहे . पालिकेचे एवढी वर्ष तुम्ही नुकसान केले.

**दिपक खांबित :-**

लवादाशी प्राथमिक बैठक झाली त्यावेळी आम्ही सर्व भावना सांगितल्या आहेत . कारण जुन्या लवादाने हे प्रकरण अंतिम स्तरावर आणले आहे आणि त्याचा मृत्यू झाला त्यामुळे ह्याच्यामध्ये साक्ष घ्यायच्या बाकी आहेत.

**अनिल सावंत :-**

आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे ह्याच्यामध्ये टाऊन प्लानिंगच्या सुरुवातीच्या ॲग्रीमेंटमध्ये खांबित साहेब एक सांगा हे प्रकरण लवादाकडे का गेले.

**दिपक खांबित :-**

ॲग्रीमेंटप्रमाणे गेले ना.

**अनिल सावंत :-**

पालिका डिफॉल्टर होती वर्धमान फॅन्टसी डिफॉल्टर होता.

**दिपक खांबित :-**

वर्धमान फॅन्टसीने कॉन्ट्रॅक्ट रद्द केले.

**अनिल सावंत :-**

रद्द कधी केले 2016 ला.

**दिपक खांबित :-**

हो त्याचवेळी तो कोर्टात गेला आणि लवादाची प्रक्रिया होईपर्यंत ह्या कामाला त्याच्याकडून ताबा घेऊन ये म्हणून स्टे दिला आहे.

**अनिल सावंत :-**

9 वर्ष तो व्यवस्थित होता. 2016 पर्यंत तुम्ही गेलात.

**दिपक खांबित :-**

2009 नाही हे काम 2010 ला पूर्ण झाले तत्कालीन महापौर तुळशीदास म्हात्रे साहेब होते त्यांच्या हस्ते 2010 मध्ये ह्याचे ओपनिंग झाले होते.

अनिल सावंत :-

त्यावेळी मी सुध्दा नगरसेवक होतो. 2010 मध्ये.

दिपक खांबित :-

तेव्हा आपण पार्ट 1 चे पझेशन घेतले आणि ते सुरु झाले . 2010 ते 2014 पर्यंत त्याने 4 वर्षाचे पैसे आपल्याकडे भरलेले आहेत . त्यानंतर मग 2014 मध्ये ही प्रोसीजर आपण सुरु केली . तो पार्ट तो विकसित करायला तयार नव्हता आणि बऱ्याच अशा गोष्टी झाल्या त्याला नोटिस कंटीन्यू दिल्या आणि आम्ही त्यांच्या हेअरींग वगैरे घेऊन हे रद्द केले . त्याच्या विरोधामध्ये तो कोर्टात गेला त्याने लवाद नेमण्याची मागणी केली . त्याप्रमाणे तोपर्यंत कोर्टाने स्टे दिला साहेब लवादाची कारवाई झाली तोपर्यंत.

अनिल सावंत :-

साहेब कोर्टात तुम्ही ॲग्रीमेंट रद्द केल्यानंतर तो कोर्टात जाईपर्यंत मधल्या काळामध्ये पालिकेने त्याचे पझेशन का घेतले नाही?

दिपक खांबित :-

साहेब तो लगेच गेला. ज्या दिवशी ऑर्डर रद्द केल्या त्यानंतर लगेच गेला साहेब. तो नॅच्युरली चान्स असतो.

अनिल सावंत :-

साहेब केवेट दाखल करुन आपण त्याठिकाणी कोर्टामध्ये आपली व्यवस्थित बाजू का मांडली नाही?

दिपक खांबित :-

साहेब तरी पण हे आरबीट्रेटरचा क्लॉज आहेत याच्यामध्ये.

अनिल सावंत :-

साहेब आरबीट्रेटरने आता तुमची 4 वर्ष घेतली तुम्ही त्या देशपांडेचे सांगितले ते देशपांडे गेले तरी सुध्दा 4 वर्ष झाली देशपांडे साहेब गेल्या वर्षी गेले असतील. मग 4 वर्षामध्ये तो ज्यावेळी एवढी तत्परता दाखवतो तर आपण पालिका कुठे कमी पडते. पालिका का दाखवत नाही.

दिपक खांबित :-

साहेब प्रशासनामार्फत या प्रकरणामध्ये कुठल्याही प्रकारे दिरंगाई केलेली नाही आम्ही वेळोवेळी साहेब सगळ्या आरबीट्रेटरच्या मीटींगला जातो मिटींग लावाय लाही सांगतो. आम्ही याबाबत लवकरात लवकर निर्णय घ्यावा हे ही सांगतो . प्रशासनामार्फत वेळोवळी जी काही कारवाई करायची आहे. फास्ट ट्रॅकवरती सगळी केलेली आहेत.

अनिल सावंत :-

कोर्टाने ज्यावेळी स्टे चा निर्णय दिला त्यावेळी स्टे म्हणजे त्याच्या ॲक्टीव्हीटीज सुध्दा बंद व्हायला पाहिजे होत्या पालिकेचे उत्पन्न नाही म्हणजे त्याच्या ॲक्टीव्हिटीज सुध्दा बंद व्हायला पाहिजे होत्या. त्याच्या ॲक्टीव्हीटीज चालू आहेत.

दिपक खांबित :-

चालू आहेत आम्ही कोर्टाला सांगितले की त्याच्या ॲक्टीव्हीटी चालू आहेत आणि पैसे भरत नाही यांनी पैसे भरायला पाहिजे.

अनिल सावंत :-

त्यानंतर त्याने काय केले.

दिपक खांबित :-

आता कसे आहे लवादासमोर आम्ही ह्या सगळ्या गोष्टी मांडत आहोत साहेब तिकडे त्याने तो प्लॉट बी मध्ये भाड्याने देतो काही दुकाने टाकली होती . मंडप टाकला होता ते ही आपण वेळोवेळी

काढलेला आहे आणि ह्या सगळ्यांचे फोटोग्राफ वगैरे आपण तो जागेचा करा मिसयुज करतो हे ही आपण दिलेले आहे.

अनिल सावंत :-

आता लवादाचा निर्णय तुमच्या फेवरमध्ये गेला की परत तो कोर्टामध्ये जाईल . परत स्टे घेऊन येईल. लवादाचा निर्णय अंतीम नाही मग त्यावेळी तुम्ही काय करणार आहात.

दिपक खांबित :-

प्रोसिजर आहे ती तर करावी लागेल.

अनिल सावंत :-

ह्या प्रॉपर्टीवर तुळशीपत्र ठेऊन देणार आहात.

दिपक खांबित :-

प्रोसिजर तर साहेब करावी लागेल. जी नियमानुसार चालू आहे.

अनिल सावंत :-

मी तेच म्हणतो ॲग्रीमेंट कॅन्सल झाल साहेब ॲग्रीमेंट रद्द झाल्याबरोबर ताबडतोब पझेशन तुम्ही का नाही घेतले. त्यावेळी त्याने भाडे बंद केले. त्यावेळी का नाही घेतले. मला सांगा कधी गेले कोर्टात, कोर्टात गेलेल्याची तारीख मला द्या.

दिपक खांबित :-

आता साहेब तुम्ही जे प्रश्न विचारले त्या प्रश्नाचे उत्तर दिले आहेत हे पूरक प्रश्न विचारत आहेत त्याची माहिती आता इकडे अव्हेलेबल ती तुम्हाला मी देतो साहेब. ह्या ही बाबतीत तुमची काय अजून काही माहिती असेल ती तुम्हाला मी स्वत : देईन. तुमच्या याच्याबाबत काही अजूनही प्रश्न असतील त्याची तुम्हाला वस्तुस्थिती किंवा तुम्हाला आम्ही फाईलचे अवलोकनही देऊ . तुम्हाला सगळ्या प्रकरणाचा आम्ही अवलोकन देऊ. तुम्ही सगळे बघू शकता.

अनिल सावंत :-

मला साहेब पर्स नल माहिती घेण्यामध्ये काहीच इंटरेस्ट नाही . हा प्रश्न ज्यावेळी मी महासभेमध्ये विचारला त्यावेळी अपेक्षा हीच होती की ह्या शहराचे 95 नगरसेवक आहेत पालिकेचे काम कशाप्रकारे चालते. एखादी चांगली गोष्ट ह्या शहरासाठी सदस्यांनी एकमताने मंजूर केल्यानंतर त्याचा बट्याबोळ प्रशासन कस करते. हे सर्वांना कळावे हा माझा उद्देश होता. ह्या प्रश्नाच्या बाबतीत एवढी चांगली वास्तु आपण त्याठिकाणी उभी केली त्यावेळी त्याच्या अगोदरच हा कोर्टात गेला होता तुम्ही त्याला टेंडर द्यायच्या अगोदर मग त्याच वेळी तुम्ही व्यवस्थित काळजी घेऊन पुढील गो ष्टी का केल्या नाही? का त्याला वाऱ्यावर सोडून दिले?

दिपक खांबित :-

प्रशासनाने साहेब नियमानुसार सगळी कारवाई केली आहे. मी तुम्हाला तेच सांगतो. लवादापुढे ह्या सगळ्या गोष्टी आहेत.

अनिल सावंत :-

नियमानुसार कारवाई केली असती तर आज रिझल्ट हा दिसला नसता.

दिपक खांबित :-

नियमानुसारच सगळी कारवाई केलेली आहे.

अनिल सावंत :-

हा प्रश्न विचारला म्हणून ह्या गोष्टी तुमच्या निदर्शनाला आल्या . आज तिथे जाऊन बघा . शहरातील लोक ज्यावेळी जातात अगोदर फ्री जॉगिंग होते . आज सदस्यांजवळ जे नागरीक जातात तिथे जॉगिंग करायला त्यांच्या जवळून...............

दिपक खांबित :-

फक्त 2 रुपये आहेत.

अनिल सावंत :-

ते काही असु देत साहेब . लोकांसाठी अजूनपर्यंत असे कधी झाले आहे का शहरामध्ये एवढी गार्डन आपण बनवले किती पैसे घेतो हा विषय नाही . लोक त्या ट्रॅकवर चालायला जातात. ते ट्रॅकवर ते अजून त्याने व्यवस्थित बांधलेले नाही. तलावाचे सुशोभिकरण केलेले नाही. तरी सुध्दा त्याला तुम्ही दोन रुपयेच घेतो म्हणून समर्थन करता.

दिपक खांबित :-

समर्थन नाही जे आहे ते तुम्हाला सांगतो. दोन रुपये घेतो की नाही.

अनिल सावंत :-

चुकीचे आहे साहेब . पालिका सुपर पावर आहे ना . प्रशासनाला अधिकार आहेत. ही प्रॉपर्टी आपली आहे. ही लोकांची प्रॉपर्टी आहे. त्याचा टी.डी.आर तुम्ही दिला असेल. त्या जागेचा जो मालक होता त्याला टी .डी.आर तुम्ही दिला असेल . त्या जागेचा जो मालक होता त्याला टी .डी.आर दिला असेल.

दिपक खांबित :-

साहेब हे जे प्रकरण आहे वर्धमानला आपण बी.ओ.टी. वर दिलेले आहे साहेब..........

अनिल सावंत :-

मला माहिती आहे साहेब.

दिपक खांबित :-

त्याने हे सगळ आपल्या प्लान प्रमाणे पार्ट डेव्हलप करायची . त्याच्यामध्ये 10 कोटी खर्च करायचे. 30 वर्ष चालवायची आणि त्यानंतर आपल्याकडे हॅन्ड ओव्हर करायची.

दिपक खांबित :-

सर्व बरोबर साहेब मी तेच म्हणतो ही प्रॉपर्टी फुकट नव्हते करत त्याने महापालिकेवर मेहेरबानी केलेली नाही . कॉम्पीटेशनमध्ये त्यांनी टेंडर घेतले होते . तुम्ही बँक गॅरेन्टी घेतली आज त्याची काय परिस्थिती आहे.

दिपक खांबित :-

20 कोटीची बँक गॅरेन्टी आहे.

अनिल सावंत :-

तुम्ही उत्तर दिले आहे त्याच्यात 20 लाख लिहीले आहे.

दिपक खांबित :-

सॉरी 20 लाखाची.

अनिल सावंत :-

45 लाख भाडे आहे. आपण साधी प्रॉपर्टी जरी भाड्याने दिली तरी ॲटलिस्ट 3 महिन्याचे डिपॉझिट देतो. 20 लाखाचीच बँक गॅरन्टी घेऊन गप्प बसलात 45 लाख भाड आहे आणि फक्त् 20 लाख बँक गॅरेन्टी बँक गॅरेन्टीची आज काय परिस्थिती आहे.

दिपक खांबित :-

तुमचे जे सर्व प्रश्न आहेत त्याची माहिती देण्यात येईल तुम्ही जे प्रश्न विचारले त्याची माहिती आणली आता तुम्ही नविन नविन प्रश्न विचारता. ह्याची माहिती दिली जाईल.

अनिल सावंत :-

तुमची बँक गॅरेन्टी 29 जून 2009 ला एक्सपायर झाली. त्याची व्हॅलिडीटी तेवढीच होती.

**दिपक खांबित :-**

ह्याची तपासणी करुन माहिती दिली जाईल.

**अनिल सावंत :-**

हा प्रश्न मी पेंडींग ठेवू का?

**दिपक खांबित :-**

प्रश्नाची उत्तर दिली आहेत. हे नविन नविन प्रश्न येतात त्याची माहिती देऊ. महासभेत जे प्रश्न आहेत त्यांची उत्तर दिलेली आहेत.

**अनिल सावंत :-**

साहेब त्याच्यात बँक गॅरेन्टीचा प्रश्न होता.

**दिपक खांबित :-**

आम्ही सगळ्यांनाच माहिती देऊ . तुम्ही जे प्रश्न विचारले तुमची इच्छा असेल तर सर्व सदस्यांना द्यायला पाहिजे . तर त्यांनाही तुमच्याशी चर्चा करुन तुमचे अजून काही प्रश्न असतील त्याची माहिती 95 नगरसेवकांना देण्यात येईल.

**अनिल सावंत :-**

मा. आयुक्त साहेब माझी आपल्याला विनंती आहे हे 2007 ला शहराचे भूषण म्हणून वर्धमान फॅन्टसी सेवन वंडर त्या ठिकाणी बनवण्यात आले . सर्व सदस्यांनी एक मतानी ठराव पास करुन त्या ठिकाणी विकसित करण्यात आला. परंतु त्याचा लोकांना फायदा होईल हे महापालिका ठरवणार . ह्या दृष्टीकोनातून ही वास्तु उभी करण्यात आली . ही वास्तू पुर्ण झालीच नाही त्याने मॅक्झीमम वापर लग्नासाठीच केला आहे आणि त्याने करोडो रुपये इन्कम कमवावे ह्याच्या शी आम्हाला कर्तव्य नाही. पण ह्यामध्ये महापालिकेचे फार मोठे आर्थिक नुकसान झालेले आहे आणि जे सेवेन वंडर लोकांसाठी खूल पाहिजे होते त्याचा फायदा लोकांना मिळत नाही . ह्या ठिकाणी लवादाच्यामार्फत बरेच निर्णय करुन आपण हे वर्धमान फॅन्टीसी धारक लोकांसाठी कसे पूरे करेल ह्याचे मला उत्तर पाहिजे.

**जुबेर इनामदार :-**

सावंत साहेबांच्या प्रश्नावर मी थोडी चर्चा करु इच्छितो. आयुक्त महोदय कुठलाही धोरणात्मक निर्णय पालिका जेव्हा घेते तेव्हा हा विषय महासभेसमोर गोषवाऱ्याच्या माध्यमातून आणला जातो. जो प्रतिनिधी शहरामध्ये चांगली वास्तू उभारण्यात येणार आहे ती बी .ओ.टी. तत्ववर असो पी .पी.पी. तत्वावर असो आम्ही त्याला मान्यता देतो कारण शहराचा विकास पाहिजे . प्रत्येक पक्षाचे हेच धोरण असते. आम्ही त्याला कधी विरोध करत नाही . मात्र त्याची बारकाई साहेब करारनामे कसे केले पाहिजेत ह्या करारनाम्याचा आर्थिक घोर कसा असायला पाहिजे मजकूर काय पाहिजे . करारनामा करताना आरबिट्रेटरचा त्याच्यामध्ये अट टाकणे विधी विभागाचा हा विषय समजत नाही का ? त्याना आरबिट्रेटरचा विषय कसा चालतो त्याचा अनुभव नाही का ? 10-10 वर्ष जातील एका वर्षात संपत नाही. दुसऱ्या बाजूला ठेकेदारांनी ठरलेली रक्कम भरली नाही किंवा आपण त्यांना देऊ शकलो नाही . असलेली जागा तर जागा आपल्या ताब्यात आली नव्हती हे प्रशासनाला माहिती नव्हते. हे स्पष्ट चित्र असताना अशाप्रकारे केलेल . करारनामा आपआपल्या ठेकेदाराला फायदेशीर कसा ठरेल ह्या दृष्टीकोनातून करण्यात आलेला. आयुक्त महोदय ह्या सर्व प्रकरणाची एक प्रशासकीय अधिकारी तुम्ही एक अय.एस अधिकारी आहात. तुम्ही ह्या पूर्ण प्रकरणाची चौकशी लावा . कुठला अधिकारी ह्याला कारणीभूत आहे. हे करारनामे करताना त्याच्यावर टिपण्या आल्या असतील करारनामे करताना सीटी इंजिनिअर होते, कनिष्ठ अभियंता होते, विधी विभाग ह्याच्या सर्वांच्या टिप्पण्या मागवा आणि वाचा. हा करारनामा कोणासाठी केला जात होता महापालिकेच्या फायद्यासाठी केला जात होता की ह्या शहराच्या हितामध्ये केला जात होता . त्या ठेकेदाराच्या हितासाठी केला जात होता . ती जागा ठेकेदाराच्या घशात भरली आहे. तो सोडायला तयार नाही त्याने आरबीट्रेटर नेमला. एका न्यायाधिशाचे

निधन झाले उद्या काय होईल हे सांगता येत नाही. 30 वर्ष उलटून जातील वर्षाचे भाडे थकत चालले आहे. त्याच्यातून रेव्हेन्यू इन्कम पालिकेचे नुकसान होते . लोकांचे नुकसान होते. शहरामध्ये वास्तू तयार केली त्याचे नुकसान होते. हे सर्व प्रकरण आहे ह्याच्यामध्ये तुमचा हस्तक्षेप. मला असे वाटते तूम्ही ह्याच्यामध्ये तुमचे जे निवेदन असेल ते करा मात्र हा विषय संपवू नका. हा एक महत्वाचा विषय आहे. अनिल सावंतजीने आणलेला आहे. चर्चेसाठी तर याच्यावरती साहेब तुम्ही चौकशी आदेश करा. चौकशी समिती बसवा. याच्यावरती चर्चा होऊ द्या. याच्यातून खर काय आहे ते बाहेर पडू द्या. याच्यामध्ये किती लोक गुंतलेले आहेत त्यांना सर्वांना बाहेर काढा आणि त्यांच्यावरती कायदेशीर ताकीदीची कारवाई करा. दुसरं एक साहेब कोर्टामध्ये आपल्याकडे वकीलाचे जे पॅनल आहेत तुमच्याकडे याची आधी माझी चर्चा झाली होती. साहेब कुठले अतिक्रमणचा विषय असेल अनधिकृत बांधकामाचा विषय असेल आपल्याला आपल्या बाजूने निकालच लागत नाही कधीच . आपण केविट दाखल केल्यानंतर सुध्दा कारण ते वकील जागेवरती जात नाही . त्यांच्याकडे कागद वगैरे नसतात. पुर्तताच करु शकत नाही कोर्टामध्ये चर्चेच्या वेळी मग ह्या पॅनलला बदला. यांच्यावरती आपण वर्षाला लाखो कोटी रुपये खर्च करतो. यांची बदली करा चांगले वकील साहेब तुम्ही बसवा . त्यांना विचारा त्यांना बजावून सांगा . तुम्हाला पालिकेच्या कामासाठी ठेवण्यात आलेले आहे ते अधि कृत बांधकाम करण्यासाठी ठेवण्यात आले नाही. हे सगळ तुम्हाला साहेब थोडा बदल घडवायला लागेल. तेव्हा जाऊन कुठेतरी साहेब इथे काहीतरी एक चांगले शहर निर्माण होईल ही माझी तुम्हाला एक सूचना आहे . धन्यवाद.

मा. आयुक्त :-

सन्मा. नगरसेवक सावंत साहेब आणि इनामदार साहेबां नी जे आपल्याला सांगितले आहे त्याच्या नुसार जी सद्यपरिस्थिती आहे ती कार्यकारी अभियंता यांनी आपल्या समोर सभागृहासमोर मांडलेली आहे. याच्यामध्ये जे दोन तीन मुद्दे आहेत त्याच्यावर आम्ही जरूर चौकशी करु आणि त्याच्यानुसार पुढील कारवाई केली जाईल आणि सोबतच हे प्रकरण लवादामार्फत लवकरात लवकर निकाली काढण्यासाठी आम्ही विधी विभाग आणि कार्यकारी अभियंता यांना स्पेशल त्याच्यावर लावू की लवकर प्रकरण निकाली लागुन या वास्तुला किंवा हे जे काही आपले जागा आहे ती आपल्या ताब्यात येऊन जनतेच्या हितासाठी ती उपलब्ध राहील.

अनिल सावंत :-

आयुक्त साहेब सध्या आपले इस्टेड मॅनेजर कोण आहेत ? ज्या ह्या प्रॉपर्टीज आहेत महापालिकेच्या सांभाळणारे असे असतील ना कोणीतरी रिस्पॉन्सीबल.

मा. आयुक्त :-

त्यांच्याकडेच तो चार्ज आहे.

अनिल सावंत :-

बाय डिफॉल्ट तेच आहेत. पालिकेच्या अशा किती प्रॉपर्टी आहेत. ज्याच्यातुन पालिकेला उत्पन्न मिळणार होते. पालिकेची ओनरशीप होती. आज उत्पन्न बंद झालेले आहे . पण ते आपला धंदा तर व्यवस्थित करत आहोत. त्या ठिकाणी ह्या संपूर्णची चौकशी लावा साहेब. याचे पुढचे माझे दोन प्रश्न आहेत समाज मंदिराच्या बाबतीत , लोकांचे पैसे खर्च करुन समाज मं दिरे बांधण्यात येतात आणि आपण कॉन्ट्रॅक्टरला चालवायला देतो. पहिला 3-4 वर्ष पैसे तो करतो नंतर कोर्टातून स्टे घेऊन येतो . प्रकरण लवादाकडे जाते त्याचा धंदा चालू पालिकेचे उत्पन्न बुडालेले आहे . अशा किती तरी प्रॉपर्टीज आहेत साहेब हे फक्त एक उदाहरण मी घेतले . वर्धमान फॅन्टासीचे मी एवढे दिवस बघत होतो . प्रशासन या ठिकाणी काय करते. अक्षरश: तिथे गेल्यानंतर साहेब एवढी चांगली प्राईम लोकेशन प्राईम प्रॉपर्टी आपण त्याला दिली . त्याठिकाणी तो व्यवस्थित आपला प्रायव्हेट धंदा करतो . पण लोकांचा त्याला उपभोग घेता येत नाही आहे . बघुन वा ईट वाटते. म्हणजे चांगल्या धोरणाचा चांगला

धोरणात्मक घेतलेल्या निर्णयाचा कसा बट्याबोळ प्रशासन करते याचे हे उत्तम उदाहरण आहे . साहेब तुम्ही चौकशी करा आणि लवकरात लवकर हा प्रश्न मार्गी लावा.

मा. आयुक्त :-

ठिक आहे.

अनिल सावंत :-

खांबित साहेब आम्ही ज्यावेळी प्र श्न विचारतो तुम्हाला राग यायचे काही कारण नाही आहे साहेब. आम्ही ज्यावेळी बँक गॅरंटीचा संपूर्ण सभागृहाला त्या विषयाची कल्पना यावी हाच उद्देश असतो. आमचा काही पर्सनल इंटरेस्ट नसतो त्यामध्ये . आम्ही प्रश्न विचारला त्या पिरेडमध्ये जर तुम्ही समाधानकारक त्याच्यावर कारवाई केली तर आम्ही चर्चा पण करणार नाही महासभेमध्ये . तुम्हाला धन्यवाद देऊ. मागच्या मिटींगमध्ये साहेब माझा प्रश्न होता त्या गॅरेजेसचा . मी तुम्हाला धन्यवाद देतो. त्या प्रश्नाच्या अनुषंगाने तरी काहीतरी कारवाई व्हायला सुरुवात झालेली आहे. म्हणजे पूर्ण नाही. पण काही तरी कुठेतरी मुव्हमेंट दिसत आहे आणि हाच उद्देश असतो महासभेमध्ये प्रश्न विचारायला.

अनिल सावंत :-

आयुक्त साहेब याच्यावर आपण जातीने लक्ष घालून लवकरात लवकर ह्या वर्धमान फॅन्टासीचा प्रश्न पाळाल आणि लोकांना एक चांगली वास्तु उपभोगायला मिळेल ह्या शहरामध्ये अशी मी आशा करतो माझे प्रश्न संपवतो.

नगरसचिव :-

प्रश्नोत्तराची वेळ संपलेली आहे. आजच्या महासभेसाठी दोन लक्षवेधी प्राप्त झालेल्या आहेत . पहिली लक्षवेधी आहे प्रशांत दळवी सभागृह नेत्यांची . मिरा भाईंदर शहरास होणाऱ्या अपुरा पाणी पुरवठ्याबाबत.

प्रशांत दळवी :-

सचिव साहेब कोणती लक्षवेधी घेतलेली आहे. पाणी पुरवठ्याची नाही.

नगरसचिव :-

सॉरी ही मागच्या वेळची होती. प्रशांत दळवी यांची जी लक्षवेधी आहे ती रस्त्यावरील गॅरेजवाले व विक्रीकरता ठेवण्यात आलेली वाहने आधी अतिक्रमणे हटविणेबाबत आणि दुसरी लक्षवेधी आहे प्रभात पाटील मॅडम यांची मिरा भाईंदर महापालिकेतील मुळ रहिवाशी असलेल्या लोकांना घराची सनद नसतेबाबत. दोन्ही लक्षवेधी मी महापौरांकडे सुपुर्द करतो.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम माझी मी लक्षवेधी मागे घेत आहे. त्याचे कारण ह्या ठिकाणी मी जी लक्षवेधी मांडली होती त्या लक्षवेधी चा आपण वाचन करुन घ्यावे. मी ती लक्षवेधी मागे घेत आहे याचे कारण की मा. आयुक्त साहेबांनी दि. 25/11/2020 ला एक आदेश काढण्यात आला आहे. ह्या संदर्भात आणि त्या लक्षवेधीशी ते निगडीत आहे की मिरा भाईंदर महापालिका क्षेत्रातील वाहतुक व्यवस्था सुरळीत करणे कामी समन्वय साधुन विशेष सुधारणा करणे व शहरातील जागा वाहतुकीस मोकळी ठेवणे बाबत नेमलेल्या समितीच्या बैठका घेणे अशा प्रकारची एक समिती स्थापन केलेली आहे . आणि ही समिती सध्या आपल्या मिरा भाईंदर शहरामध्ये कार्यरत आहे ती पुढेही कार्यरत राहो अशी इच्छा आहे आणि म्हणून मी मा. आयुक्त साहेब यांचे ह्या ठिकाणी अभिनंदन करतो की आपण प्रशासनाच्या वतीने हे जे काही पाऊल उचलले आहे त्यामुळे खरोखरच मिरा भाईंदर नागरिकांना या ठिकाणी ह्या सगळ्या ज्या काही अडचणी आहेत त्यातून मूभा मिळेल आणि पूढही कारवाई कठोरपणे चालू ठेवा अशी आपणांस विनंती करतो. पुन्हा एकदा आपले अभिनंदन करतो. धन्यवाद अणि महापौर मॅडम आता जी लक्षवेधी आहे दुसरी ती आपण स्विकारावी अशी मी आपणांस विनंती करतो प्रभात ताई आपली लक्षवेधी आहे.

मा. सभापती :-

दोन लक्षवेधी आलेल्या आहेत. त्याच्यामध्ये प्रभात ताईची लक्षवेधी आपण स्विकारत आहेत.

प्रभात पाटील :-

महापौर मॅडम सध्या स्थायी समिती सभापती पिठासीन अधिकारी आहेत. त्यांचे पण थँक्यू की आपण ती लक्षवेधी स्विकारली. आयुक्त साहेब महापौर ठिकाणावर नाहीत पण जे पिठासीन अधिकारी आहेत त्यांच्यासाठी पण सुचना आपण पण आयुक्त साहेब हे आपण नक्की आहेत का मिरा भाईंद र शहराची अकरा गाव मिळून 12 जून 1985 ला नगरपालिका स्थापन झाली . आणि त्यानंतर 28 फेब्रुवारी 2002 ला त्याची महापालिका झाली. ह्यापूर्वी आपल्याला थोडस मागे जावे लागते . ह्यापूर्वी ह्या शहरामध्ये अनेक ग्रुप ग्रामपंचायती होत्या काही सिंगल ग्रामपंचायती पण होत्या . पण हे शहर जेव्हा वाढीला लागले मुंबईच्या लगत असल्यामुळे ह्या शहराचा वेग लोकसंख्या वाढीचा वेग इतर कोणत्याही शहरापेक्षा खूप वेगवान होता आणि त्यामूळे इथे नगरपालिका आणि त्यानंतर महापालिका यांच्या काळामध्ये अधिकृत अनधिकृत अशा खूप इमारती उभ्या राहिल्या . ज्याच्यामध्ये ह्या शहराला बाहेरचे लोक येऊन राहिले. ज्यांच्याकडे दोन पैसे होते त्यांनी ह्या शहरामध्ये घरं घेतली . पण इथला स्थानिक मात्र जो होता तो स्थानिक म्हणजे आगरी कोळी इथला कायमचा रहिवाशी असलेल्या ख्रिश्चन समाज हे लोक आपआपल्या गावामध्ये त्याच पध्दतीने राहत होते त्यां ची स्वत:ची घरे होती म्हणजे घरं होती आता ती अधिकृत होती की अनधिकृत होती हा भाग त्या त्या वेळचा प्रशासनाने त्या त्या दृष्टीने त्याच्याकडे पाहिले. पण साहेब आज परिस्थिती अशी आहे की ह्या परिसराचे आधी शहर झाले, शहराचे महानगर झाले आणि आज आपण आपल्या दोन्ही शहराच्या दोन्ही बाजूला असलेले ठाणे आणि मुंबईशी स्पर्धा करतोय इथपर्यंत आपली प्रगती झाली . परंतु ही प्रगती होत असताना ह्या शहरातला नागरिक जो मुळ नागरिक आहे , तो मुळ स्थानिक आहे त्याची परिस्थिती अशी आहे की त्याचे घर आहे ते आहे त्याला ना आजूला वाढवता येत ना बाजूला वाढवता येत ना वर वाढवता येत कारण का तर त्याच्याकडे ती गावठण असल्यामुळे त्यांच्याकडे सनद नाही आणि त्याही परिस्थितीमध्ये हे लोक काम करायला गेले इथला स्थानिक रहिवाशी काम करायला गेला की आपण जातो ते काम थांबवतो. प्रसंगी आपण ते काम तोडतो सुध्दा. स्थानिक रहिवाशी हा इथला गर्भश्रीमंत माणूस नाही आहे हे लक्षात घ्या. तो स्थानिक आहे आणि अशी ही जी शंका आहे किंवा हा जो प्रश्न आहे ही जी जाणीव आहे की आपल्या ध्यानात आल्यानंतर आपण 12 वर्षापूर्वी म्हणजे साधारण 2008 ला आपण ह्या शहराचा सिटी सर्व्हे करण्याचा निर्णय महासभेतच घेतला आ णि त्यानुसार आपण सीटी सर्व्हेचा शासनाकडून करुन घेतला . इथल्या स्थानिकांनी त्यांना मदत केली . आपल्या प्रशासनाने मदत केली . 2008 ते 2012 त्या सीटी सर्व्हेचे काय झाले कारण आजही कोणी घर बांधायला गेले की आपण तिथे हजर होतो आणि ते घर तोडतो किंवा ते काम थांबवतो आज ह्या भुमीपुत्रांची वस्तुस्थिती अशी आहे साहेब की त्या नटसम्राटमध्ये म्हणत होते कोणी घर देता का घर म्हणून तो नटसम्राट सगळीकडे फिरत होता . तशी ह्या स्थानिक गावातील लोक अहो आम्हाला घर बांधून देता का म्हणून तुमचे ऊंबरठे झिजवत आहेत आणि हे सगळे का तर त्यांच्याकडे सन द नाही. म्हणून साहेब किती मोठी शोकांतिका आहे की बाहेरचे लोक आले . दोन पैसे होते घरे घेऊन राहिले . सोसायट्यांमध्ये राहिले त्यांना काही प्रॉब्लेम नाही आणि त्यांना प्रॉब्लेम नाही आहे हे माझे दु:ख नाही. परंतु जो भुमिपुत्र आहे तो आज घरासाठी दाहोदीशा फिरतोय. आपले ऊंबरठे झिजवतोय. नगरसेवकांचे झिजवतो, पालिकाचे आमदार खासदार आहेत त्यांचे ऊंबरठे झिजवतो ही किती मोठी शोकांतिका आहे . याचा प्रश्नाच्या मुळाशी गेले तेव्हा कळले की त्याच्यामध्ये आता तुम्ही सुध्दा तेच सांगणार आहात की उत्तनचा 5 गावांनी त्यांना विरोध केला . त्या 5 गावांनी विरोध केला त्याची शिक्षा सगळ्यांना का ? त्या 5 गावांची मिटींग घ्या. त्यांचे काय प्रश्न आहेत ते सोडवा त्यांच्या काय अडचणी आहेत त्यांना थांबवा आणि इतरांना का शिक्षा देता . आपण हे सगळे करत असताना हा भुमीपुत्र कुठे जाणार आहे .

एक कुटुंब होते 1985 ला म्हणा किंवा 1980 ला म्हणा त्यांची 4 मूले झाली. घर होते ते 4 लोकांना त्याने वाटून दिले आता त्या चार चार लोकांची आणखीन दोन दोन मुले झाली . त्या लोकांनी जायचे कुठे? हा प्रश्न स्थानिकांच्या जिवनाशी निगडीत आहे आणि आपण त्या बांधकाम परवानग्या त्यांना देत नाही कारण आपल्या कडे त्याची सनद नाही . तर एक प्रगत शहरामध्ये जे शहर आज मुंबई ठाण्याशी स्पर्धा करते ज्या शहरातल्या लोकांना स्थानिकांना भुमीपुत्रांना तर आपल्या घरासाठी शासनाचे ऊंबरठे झीजवावे लागत असतील तर हे आपले प्रगत शहराचे लक्षण नक्कीच नाही . आपण कुठल्याही प्रगत शहराशी स्पर्धा करतो असे म्हणणे अतिशय चुकीचे ठरेल . तेव्हा माझी विनंती आहे की स्थानिकांचा हा जो मुळ मूद्दा आहे मला आता दोन दिवसांपूर्वी कळले की त्या संदर्भात तुमच्याकडे काहीतरी मिटींग झाली ते तुम्ही मला सांगाच . मला म्हणण्यापेक्षा सगळ्या सभागृहाला सांगा . परंतु साहेब ह्याच्यामध्ये तोडगा निघाला पाहिजे. घर प्रत्येकाचे व्हायला पाहिजे आपण रस्त्यावर ज्यांची घरे येतात ज्यांच्या झोपड्या येतात किंवा जे सफाई कर्मचारी आहेत किंवा आणखी काही लोक आहेत त्यांना आपण आपल्या खर्चाने घरे बांधून देतो . पण तो भुमीपुत्र आहे तो तिथेच आहे . त्याचे काहीच होत नाही. गरिबांना घरे मिळतात , झोपडपट्टीवाल्यांना घरे मिळतात त्यांच्या जागा जमिनी असून सुध्दा त्यांना घरे नाही हा कूठला न्याय आहे . ह्या शहरामध्ये कूठे न्याय आहे घर हे किती मोठी कल्पना आहे. त्याच्या डोक्यावर छप्पर नाही तो मीठ भाकरी खाऊन जगतो . पण आपण त्यां ना छप्परा विना ठेवलेले आहे. माजी महापौर मॅडम आपल्या आणि प्रशासनाला विनंती आहे की , हा जो मुद्दा आहे सनदीचा हा तुम्ही त्वरीत निकाली काढा आणि त्या लोकांना जितक्या लवकर तुम्हाला आश्वस्त करता येईल त्या दृष्टीने आपली पावले पडली पाहिजेत आणि हा प्रश्न निकाली नि घाला पाहिजे.

मा. महापौर :-

आयुक्त महोदय सन्मा. सदस्या प्रभात ताई पाटील यांनी उपस्थित केलेल्या लक्षवेधीवर आपण जरा खुलासा करावा.

मा. आयुक्त :-

आपल्या शहराचा सिटी सर्व्हे हा पेंडींग विषय लक्षात झाल्यानंतर आपण त्याच्या बद्दल मागच्या आठवड्यामध्ये भुमी अभिले ख या विभागाशी मिटींग आपण घे ण्यात आली यामध्ये काही गोष्टी प्रामुख्याने समोर आलेल्या आहेत की आपल्या इथे टोटल 19 महसुल गावे आहेत त्याचा सर्व्हे आपल्याला करायचा होता. जसे मॅडमने सांगितले की जुन्या काळी काही लोकांचा त्याला विरोध होता त्यामूळे 5 गावाचे सर्व्हे पेंडींग होते पण आजच्या घडीला ती परिस्थिती दिसून येत नाही की ह्या लोकांचा सपोर्ट आहे आणि जे 14 गाव झाले आहेत त्याचा पण आम्ही आढावा घेतला की ज्या 14 गावांचा सर्व्हे कम्पलीट झालेला आहे पण तो सर्व्हे झाल्यानंतर त्याला पूर्ण इन्क्वायरी ऑफिसर बसवून तो सर्व्हे फा यनल लोकांचे सजेशन ऑब्जेक्शन घेऊन ते फायनल करणे आवश्यक असते ती बाब सध्याला भुमी अभिलेख विभागामार्फत पेंडींग आहे . त्यापैकी एका गावाचे त्यांच्या इन्क्वायरी कम्पलीशन स्टेजमध्ये आहे . एका गावाचा जो फायनल रिपोर्ट आहे तो कदाचित या महिन्याच्या एंडपर्यंत आम्हाला भेटे ल अशी आम्ही अपेक्षा व्यक्त केलेली आहे . सोबतच त्याच्यामध्ये दोन विषय अजून आलेले आहेत की यामध्ये जे इन्क्वायरी ऑफिसर लागतो . तो आपण नॉर्मली शासनामार्फत मुंबईमधले सिटी सर्व्हे ऑफिसर असतील किंवा ठाण्यातले सिटी सर्व्हे ऑफिसर असतील तर त्यांच्याकडे दिले जाते आणि त्यांच्याकडे तो ॲडीशनल चार्ज असल्या सारखा असल्यामुळे ते एवढ्या मोठ्या प्रमाणात इन्क्वायरी करणे त्यांच्याकडून होत नाही . म्हणून आम्ही त्या मिटींगमध्ये असे डिसीजन घेतले होते की आपण शासनाला स्पेशल कोणी ऑफिसर फक्त आम्हाला सिटी सर्व्हेचा इन्क्वायरी करण्यासाठी द्या वा अशी मागणी आम्ही जमावबंदी आयुक्त पुणे यांना आम्ही करणार आहोत आणि त्या सोबतच दुसरा विषय यामध्ये असा आलेला आहे की त्याचे प्रपोजल पण आपण

भुमी अभिलेखकडून घेणार आहोत की ज्या पाच गावाचे सर्व्हेच झाले नाही त्या गावांसाठी आता जे आपले त्याठिकाणी काही कॉन्ट्रॅक्ट झाले होते किंवा आपण आऊटसोर्स केले होते त्या रेटमध्ये ते सध्याला भुमी अभिलेख कडून होणार नाही . तर त्यांना त्यांच्याकडून नविन डिमांड की तुम्हाला एक्झॅक्टली आता त्या 5 गावांचा सर्व्हे करण्यासाठी किती खर्च येईल तर त्याच्यासाठी पण आम्ही त्यांच्याकडून डिमांड घेत आहोत तर हे दोन्ही विषय आम्ही लवकरात लवकर त्याचा फॉलो अप करून निकाली लावायला आमचा प्रयत्न राहणार आहे.

प्रभात पाटील :-

थँक्यू साहेब एका प्रश्नाचे उत्तर मला हवे आहे . मला असे कळलेले आहे की एक दोन महिन्यापूर्वी आपल्याकडे तसा शासनाचा एक जी .आर आलेला आहे की तु म्ही त्यांच्याकडे जर सनद असेल तर तुम्ही आर्किटेक्टकडून आराखडा घेऊन किंवा पालिकेला सबमिट करुन पालिकेने त्यांना घराच्या परवानग्या द्यायच्या असे काहीतरी तुमच्याकडे जी.आर आलेला आहे असे काही आहे का?

मा. आयुक्त :-

मॅडम नविन डी .सी. रुल आलेले आहेत . आपल्याला ते वा चून त्याच्याबद्दल महत्वाचे दिसते म्हणजे पेपरात तरी वाचण्यात आलेले आहे की ज्यांचा घराचा प्लॉट 1500 स्क्वेअर फुटपर्यंत असेल तर त्यांना फक्त आर्किटेक्टकडून प्लान सबमिट करुन डेव्हलेपमेंट चार्जेस भरुन त्यांना परवानगी द्यायची म्हणजे द्यायची गरज नाही . इट विल बी ला ईक डीम परमिशन . आता तो डी .सी.आर आपल्याकडे आलेले आहेत. तर ते वाचून याबद्दल आम्ही त्याबद्दल पब्लीसीटी जरुर देऊ मॅडम.

प्रभात पाटील :-

ओके थँक्यू.

जुबेर इनामदार :-

आयुक्त् महोदय विषय विकास आराखड्याचा चालू असताना माझा एक प्रश्न आहे . टाऊन प्लानर घेवारे साहेब मला तिथे दिसले होते . आपली साहेब विकास आराखड्याची परिस्थिती काय आहे? जो रखडलेला विकास आराखडा आहे त्याची परिस्थिती काय आहे? तो कधीपर्यंत पूर्ण होईल. तो कधी प्रसिध्द करणार?

दिलीप घेवारे :-

मा. महापौर मॅडमच्या परवानगीने बोलतो , विकास आराखड्याची मुदत ही आपली 1997 ला मंजूर झाला होता . 2017 ला संपलेली आहे . 20 वर्ष होती. त्याच्यानंतर ते शासनाने एक नियुक्त अधिकारी नेमले. सहा. संचालक नगररचना ठाणे त्यांच्यामार्फत आता विकास आराखडा तयार होत आहे आणि त्यांना आता मुदत डिसेंबर पर्यंत पब्लिश करण्याचे आहे पब्लीश म्हणजे कलम 26 अंतर्गत ते डायरेक्ट प्रसिध्द करणार आहेत . सुचना हरकतीसाठी तर त्यांची मुदत डिसेंबरपर्यंत आहे . परंतु मी परवा साहेबांनी आम्ही त्या कामाचा आढावा घेतला त्यांचा मला वाटत नाही ते मार्चपर्यंत पब्लिश होईल असे मला वाटते.

जुबेर इनामदार :-

मार्चपर्यंत त्याचा निकाल लागेल का सर?

दिलीप घेवारे :-

ते होईल ते नियुक्त अधिकारी आहेत . ते सगळे काम करत आहेत . त्याचे एक म्हणणे होते की मार्च लागेल त्याची शेवटची मुदत डिसेंबरपर्यंत आहे . डिसेंबर 2020 प्रसिध्द करण्याची. पण ते बोलले की अजून तेवढे तयार नाही . त्यासाठी मार्च उजाडेल . मार्च एंडपर्यंत नक्की होईल असे ते म्हणतात.

जुबेर इनामदार :-

ठिक आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**नगरसचिव :-**

विशेष समित्यांवर तौलानिक संख्येप्रमाणे सदस्य घेणे . आपल्याला गोषवारा दिलेला आहे . त्याप्रमाणे त्या-त्या पक्षाला किती सदस्य द्यायचे याचे गोषवाऱ्यामध्ये माहिती दिलेली आहे. भारतीय जनता पार्टीला ६ सदस्य द्यायचे आहेत. शिवसेना पक्षाला २ सदस्य द्यायचे आहेत. काँग्रेस लोकशाही आघाडीला १ सदस्य द्यायचा आहे. आपल्या ४ विशेष समित्या आहेत. १. पाणी पुरवठा मलनि:सारण समिती २. शिक्षण, समाजकल्याण, झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती , ३. विधी व नियोजन समिती ४. आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती ह्या चारही समित्यांवर आपल्याला पक्ष निहाय तौलानिक संख्याबळानुसार सदस्यांची नावे गटनेत्यांनी द्यायची आहेत.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने, भारतीय जनता पार्टीचा गटनेता नात्याने पाणी पुरवठा मलनि:सारण समिती, शिक्षण, समाजकल्याण, झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती, विधी व नियोजन समिती व आरोग्य परिरक्षण, वैद्यकिय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती ह्या चारही समित्यांचे पत्र मी महापौर मॅडम यांच्या हातात देत आहे.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब, समित्यांचे सदस्यांचे नावे माझ्याकडे जी आलेली आहेत त्या पध्दतीने आपण त्यांचे वाचन करावे.

**जुबेर इनामदार :-**

महापौर मॅडम, मला ह्या विषयावर बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

बोला.

**जुबेर इनामदार :-**

आयुक्त महोदय मी आपले याच्यावर लक्ष वेधू इच्छितो विशेषत : म्हणजे विशेष समिती हे गठीत करणे मिरा भाईंदर महापालिकेमध्ये खरतर ही एक "क" वर्ग महापालिका असताना आपल्याला खरोखर ह्या समितींची गरज आहे का ? समिती तयार करायच्या याचा अर्थ एक नविन धोरण एक नविन खर्च महापालिकेला त्याचा भुर्दंड भरायचा . आम्ही ह्या विषयावर सुरुवातीपासून विरोध करत आलेलो आहोत. अतिरिक्त आयुक्त मला वाटते तुम्ही ह्या व्यासपिठावर आहेत . त्यांच्या जागेवर तुमचे मी लक्ष वेधू इच्छितो ह्या विषयावर महापालिकेमध्ये ह्या ज्या समित्या तयार करण्यात आलेल्या त्याचा प्रत्येकाचा स्वतंत्र कारभार करण्यासाठी विभाग आहेत आणि त्या प्रत्येक विभागाला एक उपायुक्त दर्जाचा अधिकारी नेमण्यात आलेला आहे . मला तरी वाटत नाही की अशा समितींची गरज ह्या महापालिकेला आहे . समिती तयार करणे हे ह्याचा अर्थ कुठेतरी एक नविन खर्च तयार करणे. याच्या पालिकेकडे काहीच नाही . २०१८ ला याचा ठराव झाला होता . आम्ही ह्या समितींचा म्हणजे २०२० ला आम्ही ह्या समितींवर कुठल्या सदस्यांची नावेच नाही दिली. कारण आमच्या लक्षात आले की ह्या समितीमध्ये कामकाज म्हणजे वर्षामध्ये ह्या समितीमध्ये कामकाज होणार नाही . त्याच्यापलीकडे त्यांना कुठलाही अधिकार नाही . फक्त आणि फक्त अर्थसंकल्पामध्ये त्यांना अनुदान देण्यात आलेले आहे ते अनुदान कसा खर्च करायचा किंवा सभापतीला गाडीचा प्रतिपुर्ती भत्ता , उपसभापतींना प्रतिपुती भत्ता किंवा त्या दिलेल्या दालनामध्ये कर्मचाऱ्यांचा खर्च त्याच्या प लीकडे ह्या समितींचा काही मला समोर आलेले दिसुन आलेले नाही . ह्या शहरामध्ये सध्याच्या परिस्थितीमध्ये आता ह्या कोविड परिस्थितीमध्ये हे शहर काय पूर्ण देश ह्या परिस्थितीतुन आजच्या तारखेत ह्या

विषयामधुन बाहेर निघत आहे . अजून अडचणीत आहे . अजून कोविड काही गेलेले नाही . व्हॅक्सीन आलेले नाही. महापालिकेची आर्थिक परिस्थिती आपल्या डोळ्याच्या समोर आहे. पाणीपट्टीची परिस्थिती म्हणजे आपला महसुल आजच्या तारखेमध्ये ह्या महापालिकेला मिळणारे उत्पन्न आपल्याकडे ५० टक्के कमी आणि खर्च आपल्याकडे जो स्थायी आस्थापना , अस्थायी आस्थापनांचा जो खर्च आहे. तो कमी झालेला नाही.

मा. महापौर :-

मा. सदस्य, इनामदारजी आपल्याकडे नावे असतील तर आपण द्यावी . कारण इथे फक्त सदस्य घेणे हाच विषय आजचा आहे.

जुबेर इनामदार :-

मान्य आहे मॅडम.

मा. महापौर :-

तुम्हाला जर नावे द्यायची असतील तर तुम्ही द्या.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, माझा लोकतांत्रिक अधिकार हिसकाऊन घेऊ शकत नाही.

मा. महापौर :-

हिसकाऊन घेत नाही. अनेक विषय पटलावरती आहेत. आपल्याला पुढचे विषय सुध्दा घ्यायचे आहेत.

जुबेर इनामदार :-

हा ही विषयपटलावरचा आहे.

मा. महापौर :-

कॉंग्रेस पक्षातर्फे तुमच्याकडे सदस्य आहेत का समित्यांवरती?

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, तुम्ही विचारले म्हणजे मला ठराव करावा लागेल.

मा. महापौर :-

आपण त्यांची नावे द्यायची आहेत आणि नसतील तुम्हाला नंतर द्यायचे असतील तर तुम्ही माझ्या दालनामध्ये ती नावे देऊ शकता.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम माझी भावना तुम्हाला ऐकून घ्यावी लागेल. हा विषय पटलावरती आलेला आहे. याचा गोषवारा दिलेला आहे. गोषवाऱ्यावर माझा ठराव आहे. तो ठराव मांडायचा अधिकार माझा आहे.

मा. महापौर :-

ठराव काही होणार नाही.

जुबेर इनामदार :-

का होऊ शकत नाही ठराव?

मा. महापौर :-

मला फक्त सदस्यांची नावे द्या. तुमचा ठराव आम्ही घेणार नाही.

जुबेर इनामदार :-

विषयावर ठराव होऊ शकतो की नाही?

मा. महापौर :-

विषयपत्रिकेवरती विषय स्पष्टपणे लिहलेला आहे . विशेष समित्यांवरती तौलानिक संख्येप्रमाणे सदस्य घेणे. सदस्यांची नावे तुमच्याकडे असतील तर द्या.

जुबेर इनामदार :-

माझे मत मी ठराव मांडू शकतो. हा माझा अधिकार तुम्ही हिसकावून घेऊ शकत नाहीत.

मा. महापौर :-

सदस्यांची नावे असतील तर तुम्ही द्या.

जुबेर इनामदार :-

सदस्यांनी नावे देण्यासाठी ठराव असणार आहे . तुम्ही नावे घेता ते ठरावाच्या माध्यमातून घेता. प्रकरणाच्या माध्यमातून किंवा ठरावाच्या माध्यमातून असेल . ठराव करायचा अधिकार हा तर तुम्ही माझ्याकडून हिसकावून घेऊ शकत नाही.

मा. महापौर :-

सचिव साहेब, ह्याच्यावरती ठराव होऊ शकतो का?

नगरसचिव :-

आपण जी नावे घेतो ती ठरावाच्या माध्यमातून घेतो.

जुबेर इनामदार :-

ठरावाच्या माध्यमातून घेतात.

मा. महापौर :-

नावे न देण्याबाबतचा ठराव आहे का?

जुबेर इनामदार :-

माझा तर समिती गठित न करणेचा ठराव आहे.

मा. महापौर :-

ठिक आहे. तसा ठराव तुम्ही मांडा.

जुबेर इनामदार :-

आयुक्त महोदय, तुम्ही गोषवारा दिला म्हणून मी तुमची प्रतिक्षा करत होतो.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य इनामदारजी, आपण ठराव मांडा.

जुबेर इनामदार :-

महापालिकेमध्ये स्वतंत्र हे सगळे काही कामकाज बघण्यासाठी विभाग आहेत. त्यावर उपायुक्त दर्जाचा अधिकारी तुम्ही नेमलेले असताना ह्या समितींची महापालिकेला गरज नाही . "क" वर्ग महापालिका आहे याचा भुर्दंड महापालिकेच्या तिजोरीवर पडतो . सभापती नेमले की त्यां ना प्रतिपुर्ती भत्ता द्यायचा, उपसभापती नेमला की प्रतिपुर्ती वाहन भत्ता साहेब समिती गठीत केली म्हणजे त्याला दालनाचा खर्च आहे . त्याला अनुदान स्वरुपात तुम्हाला पैसे द्यायचे आहेत . त्यांचा दिलेला ठरावाच्या अनुषंगाने तो खर्च पालिकेला करावा लागतो . अशा बाबी आपल्याला सध्या अशा प्रकाराचा कुठलाही आपल्याकडे जबाबदारी त्यांना देण्यासाठी समितीची गरज नाही.

मा. महापौर :-

ठिक आहे मग तसा ठराव मांडा.

जुबेर इनामदार :-

कोविड परिस्थितीमध्ये पालिकेची आर्थिक परिस्थिती डबघाईला आहे . आपल्याकडे आपले उत्पन्नाचे स्त्रोत कमी झालेले असताना समित्यांची गरज नाही . आयुक्त महोदय आमचे ठाम मत आहे म्हणजे आमचे काँग्रेस पक्षाचेही मत आहे आणि शिवसेनेचेही तेच मत आहे. त्यांना ही अनुमती देण्यात यावी की त्यांनी त्यांचे निवेदन करावे.

मा. महापौर :-

ठिक आहे. तुम्ही ठराव मांडणार का?

**जुबेर इनामदार :-**

मी ठराव करणार.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम त्यांना काय ठराव करायचा तो करु द्या . माझी एक विनंती आहे आपल्याला भारतीय जनता पार्टी गटनेत्यांनी दिलेली नावे आपण घोषित करावी.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**जुबेर इनामदार :-**

निलम मॅडम तुम्हाला काही बोलायचे आहे की मी ठराव करु.

**निलम ढवण :-**

ठराव करा.

**मा. महापौर :-**

पाटील साहेब आपल्याला काही बोलायचे आहे का?

**निलम ढवण :-**

प्रविणजी बोलत आहेत.

**मा. महापौर :-**

धृवकिशोर पाटील तुम्ही बोला.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम , आजचा जो विषय आहे त्या वि षयामध्ये क्लियरकट प्रशासनाने गोषवारा दिलेला आहे की विशेष समित्यांवरती तौलानिक संख्येप्रमाणे सदस्य घेणेसाठी हा विषय आलेला आहे . आणि ऑलरेडी १८ जुलै २०१८ रोजीच्या महासभेत ठराव क्र. २३ अन्वये आपण विशेष समित्या गठीत केलेल्या आहेत. त्याप्रमाणे आता हा ठराव होऊ शकत नाही . मागे सुध्दा काँग्रेस लोकशाही आघाडी व शिवसेना पक्षाने आपल्या सदस्यांची नावे दिलेली नव्हती.

**जुबेर इनामदार :-**

दिलेली होती.

**धृवकिशोर पाटील :-**

नव्हती आणि जर दिली असेल तर ते अॅक्सेप्ट करतात . म्हणजे आता तुम्हाला ठराव करता येत नाही. आता फक्त तुम्हाला नावे द्यायची आहेत. जर तुम्हाला नावे द्यायची नसेल तर तुम्ही तेच करा. परंतु.............

**निलम ढवण :-**

ठराव करता येतो की नाही सचिवांना सांगु देत . सचिव साहेब सांगतील. त्यांनी मगाशी उत्तर दिले नाही.

**धृवकिशोर पाटील :-**

मॅडम, आपण सुध्दा सुशिक्षित आहात . ह्या गोषवाऱ्यामध्ये क्लियर कट लिहीलेले आहेत . विशेष समित्यांवरती तौलानिक संख्येप्रमाणे सदस्य घेणे.

**निलम ढवण :-**

आम्ही वाचले.

**धृवकिशोर पाटील :-**

त्या प्रमाणे आपले सदस्य देण्याचे कर्तव्य आहे . आपण सदस्य देणे ह्याच्यामध्ये ठरा व होऊ शकत नाही. ऑलरेडी आपला ठराव झालेला आहे. आपण कृपया तुमची नावे देणे.

**निलम ढवण :-**

माझ्या माहितीप्रमाणे गोषवारा दिलेला आहे आणि गोषवाऱ्यामध्ये विषय दिले आहेत . तर प्रत्येक विषयावर चर्चा करणे आणि त्याच्यावर ठराव करणे हे काही चुकीचे नाही . आणि जरी काही असेल तर सचिवांनी त्याचे उत्तर द्यावे.

**धृवकिशोर पाटील :-**

मॅडम चर्चा केलेली आहे . सन्मा. जुबेरजींनी चर्चा केलेली आहे . त्यानंतर आम्ही सांगितले ते आता ठराव करु शकत नाही. फक्त नावे देऊ शकतात.

**निलम ढवण :-**

प्रशासन म्हणून सचिवांना बोलू द्या.

**मा. महापौर :-**

सदरच्या विषयाबाबत ठराव झालेला आहे . आपल्याला सदस्यांची संख्या आपल्या पक्षाच्या वतीने जर द्यायची असतील जसे बी .जे.पी ची पक्षातर्फे सदस्यांची नावे आलेली आहेत . तसेच आपआपल्या सदस्यांची नावे आलेली आहेत . तसेच आपआपल्या पक्षातर्फे गटनेत्यांनी आपल्या सदस्यांची नावे दिली तर जास्त बरे होईल आणि जर तुम्हाला नाव द्यायची नसतील तर तसा ठराव तुम्ही मांडू शकतात. ठराव मांडा. आता चर्चा करु नका. इतर भरपूर विषय आहेत.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम मागच्या वेळी ज्या कमिट्या नेमल्या होत्या मी त्यावेळी विधी व नियोजन समितीवर पण होते आपले सन्मा. खंडेलवालजी पण होते. त्यावेळी आम्ही मिटींग घेतल्या होत्या काही सुचना केल्या होत्या प्रशासनाला . काही गोष्टी विचारात पण विश्वासात पण घेतल्या नव्हत्या . ह्या सदस्यांना मग ह्या कमिटींची गरज काय . फक्त करायचे म्हणून नगरसेवकांना खुर्ची द्यायची किंवा हजारो लाखो रुपये त्यावेळी पण आमचा विरोध होता . किती केबीन बनविल्या गेल्या . त्यानंतर कमिट्या झाल्या त्या लोकांना विश्वासात प्रशासन घेत नसेल पण मला वाटते ह्या समितींना काही अर्थ नाही.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य ढवण ताई आपण मला पत्र दिलेले आहे की तुमच्या पक्षाची ह्या समितीबाबत नावे देणेबाबत चर्चा सुरु आहे . आणि आपण ती नावे मला असे वाटते तुमची चर्चा संपलेली नसेल म्हणून तुम्ही नावे देण्यास इच्छूक नसाल तर नंतर तुम्ही मला नावे देऊ शकता . परंतु मला आता असे वाटते की सचिव साहेब आपण भारतीय जनता पार्टीतर्फे जी नावे आलेली आहेत त्याचे वा चन ह्या ठिकाणी करावे.

**जुबेर इनामदार :-**

आमचा ठराव आहे महापौर मॅडम.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य जुबेरजी यांना ठराव करायचा असेल तर ते करु शकतात . मी तुम्हाला ठराव करायला संधी देते.

**प्रविण पाटील :-**

मॅडम महासभेचा विषय क्र . ३१ विशेष समित्यांवर तौलानिक संख्ये नुसार सदस्य घेणे. ह्या महासभेच्या नियमानुसार विषय आलेला आहे. मला सचिव साहेबांनी एकच सांगावे की ह्या विषयावर ठराव होऊ शकतो की नाही. ठराव काय करायचा तो आम्ही ठरावू. एक सदस्य बोलतो की ठराव होऊ

शकत नाही. आता ह्या महासभेचे कामकाज एखादा सचिव साहेब चालवणार की एखा दा सदस्य चालवणार.

**मा. महापौर :-**

सचिव चालवणार.

**प्रविण पाटील :-**

कोणीही उठून सांगतो की, ह्या विषयावर ठराव होऊ शकत नाही. ठराव काय करायचा तो आम्ही ठरवू मॅडम.

**मा. महापौर :-**

सदस्यांनी आपले मत सांगितले आहे.

**प्रविण पाटील :-**

आम्हाला अधिकृत सांगा सचिवांनी त्या विषयावर ठराव होऊ शकतो की नाही ? तेवढे सांगा ठराव काय करायचा तो आम्ही ठरवू.

**मा. महापौर :-**

तुम्हाला आता ठराव मांडायचा आहे की सचिवांनी खुलासा केल्यानंतर?

**प्रविण पाटील :-**

सचिवांनी मत सांगा त्यानंतर आम्ही ठराव मांडतो.

**मा. महापौर :-**

ठिक आहे.

**नगरसचिव :-**

विशेष समित्यांवर तौलानिक संख्येप्रमाणे सदस्य घेणे हसमुख गहलोत , गटनेता, भारतीय जनता पार्टी ह्यांनी चारही विशेष समित्यांवर प्रत्येकी ६ सदस्यांची नावाची शिफारस केलेली आहे. त्यापैकी पहिली समिती आहे. उद्यान व शहर सुशोभिकरण समिती ह्या समितीवर.........

**जुबेर इनामदार :-**

सचिव महोदय, आम्हाला नावे ऐकायची आहेत. फक्त प्रविण पाटीनल साहेब त्यांनी विचारलेला प्रश्न की कुठलाही विषय आल्यानंतर त्याचा निकाल आम्ही ठरावाच्या माध्यमातून करु शकतो की नाही?

**नगरसचिव :-**

ऑलरेडी आपल्याला महापौर मॅडम यांनी सांगितले आहे की, ह्या विषयावरती तुम्हाला ठराव करायचा असेल तर तुमचा ठराव घेणार आहे म्हणून. आरोग्य समितीवर मी नावे वाचुन दाखवतो. १. पाटील वंदना मंगेश २. भानुशाली वर्षा गिरीधर ३. शेट्टी गणेश गोपाळ ४. मांजरेकर आनंद दत्ताराम ५. शाह सिमा कमलेश ६. दुबे मनोज रामनारायण. विधी नियोजन समितीवरती नावे आहेत. १. संजय थेराडे २. भोईर जयेश ३. जैन राजेंद्र ४. शेट्टी अरविंद ५. विराणी अनिल ६. म्हात्रे मोहन. शिक्षण व समाजकल्याण झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समितीवर नावे आहेत ती डॉ. प्रिती जयप्रकाश पाटील २. भानुशाली वर्षा गिरीधर ३. शेट्टी गणेश गोपाळ ४. मांजरेकर आनंद दत्ताराम ५. शाह सिमा कमलेश ६. दुबे मनोज रामनारायण. पाणी पुरवठा मलनि :सारण समितीवर नावे आहेत. १. यादव मिरादेवी रामलाल २. शाह रिटा सुभाष ३. भोईर गणेश गजानन ४. म्हात्रे नयना गजानन ५. शाह राकेशय रतिशचंद्र ६. म्हात्रे सचिन केसरीनाथ ह्या चार समित्यांव रती प्रत्येक ६ सदस्य ह्याप्रमाणे भारतीय जनता पक्षाचे गटनेता हसमुख गहलोत ह्यांनी नावे दिलेली आहेत. महापौर मॅडमकडे आणि महापौर मॅडमच्या आदेशानुसार त मी नावे आपणांस वाचुन दाखवलेली आहेत.

**मा. महापौर :-**

सन्मा. पाटील साहेब बोला.

**प्रविण पाटील :-**

**ठरावाच्या अगो दर याच्यामध्ये गोषवाऱ्यामध्ये सांगितलेले आहे . एखादी समिती परिपूर्ण होण्यासाठी ती तौलानिक संख्या लागते . सचिव साहेब तुम्ही मला सांगा . ह्या समितीवर जी परिपूर्ण तौलानिक संख्येनुसार परिपूर्ण सदस्य जर नाही झाले तर तुम्ही समिती गठन करू शकता की नाही?**

**नगरसचिव :-**

**समितीवरती आपण जो ठराव क्र . २३, १८ जुलै २०१८ रोजी जो ठराव केलेला होता त्याअनुषंगाने प्रत्येक समितीवरती ९ सदस्य ह्या समितीमध्ये असतील हे निश्चित केलेले आहे. ह्या ९ सदस्यांच्या संख्येनुसार तौलानिक बळानुसार आपल्याला भारतीय जनता पार्टीला ६ सदस्य, शिवसेना पक्षाला २ सदस्य, कॉग्रेस लोकशाही आघाडीला १ सदस्य ह्याप्रमाणे तौलानिक संख्याबळ आहे . भारतीय जनता पक्षाने ६ सदस्यांची नावे दिलेली आहेत. शिवसेना पक्ष आणि काँग्रेस लोकशाही आघाडी पक्षाची नावे येणे अपेक्षित आहेत.**

**प्रविण पाटील :-**

**माझ्या प्रश्नाचे उत्तर मिळाले नाही साहेब. मी असा प्रश्न विचारला की, तौलानिक संख्येनुसार तदर्थ समित्या ज्या आहेत त्याच्यात तौलानिक संख्येनुसार ती परिपूर्ण समिती लागते म्हणजे ९ तुम्ही सांगितल्याप्रमाणे प्रत्येक पक्षाला महापालिका सदस्यांचा ९ जी संख्या लागते ती जर पूर्ण झाली नाही तर ती समिती गठीत करता येते की नाही एवढेच फक्त सांगा.**

**नगरसचिव :-**

**समितीवरती सदस्यांची नावे द्यायची की नाही द्यायची हा पूर्णत : आपला अधिकार आहे . तथापी यापूर्वी जे मागे एका प्रकरणामध्ये महिला बालकल्याण समितीच्या प्रकरणामध्ये पक्षाने नावे दिलेली नसताना आपण हे प्रकरण राज्य शासना कडे मार्गदर्शनासाठी पाठवले होते . त्यावेळी त्यांनी ही समिती गठीत झालेली आहे असे समजून त्यानुसार पुढील कार्यवाही आपण करावी अश्या प्रकारचे राज्य शासनाचे आपल्याला निर्देश प्राप्त आहेत.**

**प्रशांत दळवी :-**

**महापौर मॅडम , याबाबत आता खुप चर्चा झालेली आहे . पुढेही विष य आहेत पुढेही शहराचे विषय आहेत.**

**जुबेर इनामदार :-**

**ठिक आहे मी माझा ठराव वाचतो.**

**मा. महापौर :-**

**वाचा.**

**जुबेर इनामदार :-**

**आयुक्त महोदय, आम्ही आणि शिवसेना पक्षाच्या वतीने काँग्रेसच्या वतीने सदस्यांची नावे देत नाही. समिती गठीत करु शकत नाही कारण हा परिपूर्ण समिती होत नाही. 9 सदस्य संख्या असायला पाहिजे तुम्ही काय त्याचा निर्णय घेतला तरी आम्ही त्याची दाद शासनाकडे मागु . हे निश्चित आहे . महापौर मॅडम माझी तुम्हाला चर्चा आहे म्हणून सांगु इच्छितो आमचे सदस्य राजीव मेहराजीने तुमच्याकडे हरकतीचा मुद्दा दिलेला आहे . त्यांना ती चर्चा करण्यासाठी अनुमती देण्यात यावी . कारण त्यांचे अनम्युट असल्यामुळे..................**

**मा. महापौर :-**

माझ्याकडे त्यांचा हरकतीचा विषय आलेला आहे. त्यांना मी वेळ देणार आहे. परंतु आता तूम्ही ह्या विषयावरती बोला.

**गिता जैन :-**

महापौर मॅडम मला आधी बोलायचे आहे. ह्या विषयावर मला बोलायचे आहे महापौर मॅडम.

**मा. महापौर :-**

तुम्हाला ह्या विषयावरती बोलायचे आहे?

**गिता जैन :-**

ह्या विषयावरती बोलायचे आहे.

**मा. महापौर :-**

इनामदार साहेब पहिला तुम्ही वाचून घ्या. तुमचा ठराव.

**गिता जैन :-**

त्याआधी मला बोलायचे आहे. महापौर मॅडम आता ते तौलानिक संख्येचा विषय आहे. भारतीय जनता पार्टी 61 सदस्य दिले आहेत. मला बडतर्फ केलेले आहे मग ते 61 कसे मोजतात.

**जुबेर इनामदार :-**

अरे हो आम्ही विसरलो.

**गिता जैन :-**

असे विसरुन कसे चालणार . तुम्ही मला बडतर्फ केलेले आहे . माझ्याकडे लेटर आहे तुम्ही बडतर्फ केलेले मग तुम्ही 61 कसे मोजले.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या जैन मॅडम आपण काही पत्र दिले आहे का बडतर्फ केल्यानंतर आपण पत्रव्यवहार केलेला आहे का पक्षाला?

**गिता जैन :-**

तुम्ही बडतर्फ केले मग मला द्यायची गरजच काय आहे तुम्हाला. तुम्ही बडतर्फ केलेले आहे.

**मा. महापौर :-**

हा विषय तुम्ही पक्ष कार्यालयामध्ये क्लियर करु शकता इथे महासभेमध्ये................

**गिता जैन :-**

कशाला पक्ष कार्यालयात येऊ तुम्ही मला बडतर्फ केले मी परत पक्षासाठी बोलायला जाऊ का ? तुम्ही काय सांगता मॅडम आता 60 होतील ना. मला कमी करुन मोजा.

**मा. महापौर :-**

ठिक आहे तुम्हाला पुढच्या वेळेला कमी करु.

**गिता जैन :-**

पुढच्या वेळेला नाही माझा आक्षेप आहे . तुम्ही आताच मोजायला पाहिजे त्यानुसार तौलानिक संख्या बदलुन विपक्षमध्ये टाका. मी हे प्रकरण घेऊन जाणार तुम्ही हे चुकीचे दाखविलेले आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्या जैन मॅडम हा अधिकार कोकण कमिशनरचा आहे . त्यामुळे तुम्ही तसे तिथे पत्रव्यवहार करा.

**गिता जैन :-**

मॅडम तुम्ही बडतर्फ केल्यानंतर तुमची ड्यूटी आहे. कोकण भवनात जायचे.

**मा. महापौर :-**

माझ्याकडे तसे पत्र नाही आहे मॅडमम मला कोकण कमिशनरकडून पत्र आले . आयुक्तांना पत्र आले किंवा कमिशनरला पत्र आले तर आम्ही तुम्हाला काही बोलणार नाही.

**गिता जैन :-**

माझा आक्षेप आहे की तुम्ही बडतर्फ केल्यानंतर मला सोडून मोजायचे.

**मा. महापौर :-**

तुम्ही महासभेत आक्षेप नोंदवू नका तिथे आक्षेप नोंदवा.

**गिता जैन :-**

माझा आक्षेप आहे गोषवारा चुकीचा आहे.

**मा. महापौर :-**

आमचा गोषवारा बरोबर आहे.

**गिता जैन :-**

माझा आक्षेप आहे तुमचा गोषवारा चुकीचा आहे.

**मा. महापौर :-**

आयुक्त साहेब कोकण विभागाकडून पत्र आलेले आहे का? त्यांना सांगा.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम , तौलानिक संख्याबळ हे कोकण आयुक्तांकडून शिफार स होऊन इकडे महापालिकेला सचिव साहेबांकडे येते. तिथे अगोदर त्यांना कॅन्सल करायचे आहे. तिकडे जाऊन कॅन्सल करायचे आहे. तिकडे जाऊन कॅन्सल करायचे आम्ही पण बडतर्फ नगरसेवकांसाठी ते कोर्टामध्ये आहे.

**गिता जैन :-**

ते मला नाही करायचे ते तुम्ही करायचे आहे लेटर तुम्ही दि ले आहे मी नाही . तुमची तौलानिक संख्या चुकीची आहे . तुम्हाला फायदा पाहिजे म्हणून तुम्ही इथे 61 दाखवत आहात. तुम्हाला माझा फायदा पण घ्यायचा आहे हे चालणार नाही.

**मा. महापौर :-**

तुम्ही कोकण कमिशनर कडून पहिला कमी करुन घ्या.

**गिता जैन :-**

मी कशाला जाऊ मॅडम.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, पुढचा विषय घ्या.

**गिता जैन :-**

कोकण भवनात जायची मला काय गरज पडलेली आहे.

**मा. महापौर :-**

सन्मा. सदस्य इनामदारजी तुम्हाला काही बोलायचे आहे का?

**जुबेर इनामदार :-**

माझा ठराव आहे मॅडम.

**मा. महापौर :-**

ठराव मांडा.

**जुबेर इनामदार :-**

सदस्य शिवसेनाचे आमदार गिता जैनजी बोलत आहेत. मी कसा मध्ये बोलू.

**गिता जैन :-**

माझा आक्षेप नोंदवून घ्या.

**मा. महापौर :-**

त्या पालिका सदस्या आहेत.

गिता जैन :-

माझ्या नावाचा फायदा घ्यायचा नाही. तुम्ही तेथून नाव कमी करुन आणा.

गिता जैन :-

मॅडम मी कशाला जाऊ कमी करायला. तुम्ही मला सांगा. मी इथून बोलू शकते. असे चालणार नाही मॅडम मला अनम्युट करुन.

मा. महापौर :-

इनामदरजी आपण बोला. माझा अधिकार नाही. तुम्हाला इथून कमी करायला. सचिव साहेब तुम्हाला उत्त्र देतील.

गिता जैन :-

सचिव साहेब बोला.

नगरसचिव :-

सन्मा. सदस्या श्रीम. गिता जैन यांनी जो मुद्दा उपस्थित केलेला आहे. तौलानिक संख्या बद्दल त्यांनी सांगितल्याप्रमाणे भारतीय जनता पार्टीने त्यांना पक्षातून बडतर्फ केलेले आहे . असे त्यांचे म्हणणे आहे. त्यानुसार तौलानिक संख्या बळामध्ये फरक किंवा बदल होणे अपेक्षित आहे . तथापी हा प्रश्न तौलानिक संख्याबळ जे आहे हे कोकण विभागीय आयुक्त यांच्याकडे आपण नाव नोंदणी करत असतो त्यांना त्याअनुषंगाने कोकण कमिशनर हे त्याच्यावरती महापालिकेला त्या -त्या महापालिकेचे पक्षनिहाय तौलानिक संख्याबळ लेखी कळवत असतात . आपल्या म्हण्ण्यानुसार भारतीय जनता पार्टीने आपल्या तर बडतर्फ केले आहे तर त्या अनुषंगाने हा एक तर पक्षांतर्गत प्रश्न आहे . भारतीय जनता पार्टीने कोकण कमिशनर यांच्याकडे आपल्याला बडतर्फ केलेले असून आपले नाव भारतीय जनता पार्टीच्या गटातून कमी करुन त्यानुसार नव्याने तौलानिक संख्याबळ द्यावे अशा पध्दतीचे पत्र देणे अपेक्षित होते आणि ते पत्र नविन तौलानिक संख्याबळ महापालिकेला प्राप्त झाल्यानंतरच त्याअनुषंगाने आपल्याला पुढील कार्यवाही करता येऊ शकते . आजच्या घडीला आपल्याकडे अशा प्रकारचे आपल्याला आपले नाव ह्या भारतीय जनता पार्टीच्या गटातून कमी केल्याबाबतचे कोणतेही पत्र किंवा तशा प्रकारची तौलानिक संख्याबळामध्ये काही बदल झालेला आहे अशा प्रकारची कोणतीही माहिती किंवा कोणताही आदेश कोकण कमिशनर यांच्याकडून मिरा भाईंदर महापालिकेला प्राप्त न झालेला असल्यामुळे आजच्या स्थितीमध्ये जी तौलानिक संख्याबळ आहे ते आपल्याला गोषवाऱ्यामध्ये दिलेले आहे आणि आजच्या तारखेत ह्याच तौलानिक संख्याबळानुसार आपण सदस्य घेणार आहोत.

गिता जैन :-

महापौर मॅडम, हे पक्षाचे काम होते जेव्हा मला बडतर्फचे लेटर दिले तेव्हा हे पक्षाचे काम होते महापौर मॅडमने लेटर द्यायचे . का दिले नाही . ते देईपर्यंत माझा आक्षेप आहे . सचिव साहेब माझा आक्षेप नोंदवून घ्यावा. तुम्ही बडतर्फ करुन एक वर्ष झालं अजून तुम्ही कोकण भवनला कळवले नाही असे कसे होणार पक्षाने बडतर्फ केले आहे मी राजीनामा दिला नव्हता. पक्षाने का कळवले नाही.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य सभागृह नेते बोला.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम, आता माझ्या माहितीप्रमाणे जे सचिवांनी सांगितले ते क्लियर उत्तर सगळ्या सन्मा. सदस्यांना कळलेले आहे . उगाच टाईम वेस्ट करु नका . पुढेही शहराचे अतिशय चांगले प्रश्न आपण आणलेले आहेत. त्या प्रश्नांवरती पण चर्चा करायची आहे.

(सभागृहात गोंधळ)

निलम ढवण :-

महापौर मॅडम, विरोधी पक्षनेत्यांना बोलायचे आहे त्यांना अनम्युट करा.

मा. महापौर :-

मला वाटते प्रशासनाने आपल्याला उत्तर दिलेले आहे . ह्या विषयावर भरपूर चर्चा झालेली आहे.

गिता जैन :-

माझा आक्षेप नोंदवून घ्या.

मा. महापौर :-

जुबेरजी आपल्याला ठराव मांडायचा असेल तर मांडून घ्या . नाहीतर पुढील विषयाला मी सुरुवात करणार आहे. तुम्ही ठराव मांडा.

गिता जैन :-

माझा आक्षेप आहे तो नोंदवा.

जुबेर इनामदार :-

शिवसेनेचे आमदार श्रीम. गिता जैन मॅडम यांचे पहिला फायनल करा.

मा. महापौर :-

त्यांचा विषय संपलेला आहे तुम्ही तुमचा ठराव मांडा.

जुबेर इनामदार :-

ठिक आहे.

(सभागृहात गोंधळ)

जुबेर इनामदार :-

प्रकरण क्र. 31 ठराव टाईप करणे.

निलम ढवण :-

माझे अनुमोदन आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम वोटींग करावी लागेल ना.

मा. महापौर :-

हो. सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील साहेब बोला.

धृवकिशोर पाटील :-

सचिव साहेब, गोषवाऱ्यामध्ये आपण क्लियर कट दिलेले आहे की विशेष समित्यांवर तौलानिक संख्याप्रमाणे सदस्य घेणे त्याप्रमाणे आम्ही सदस्यांची नावे दिलेली आहेत. माझ्या माहितीप्रमाणे आता पुन्हा तो ठराव होऊ शकत नाही कारण की ऑलरेडी आम्ही 18 जुलै 2018 च्या मिटींगमध्ये ठराव केलेला आहे. विशेष समित्या आम्ही गठीत केलेल्या आहेत. तुमचा अभिप्राय काय याच्यावरती आम्ही ठराव करु शकतो का सांगा. जर ठराव होत असेल तर आम्ही आमचा पण ठराव मांडतो.

जुबेर इनामदार :-

मांडा.

मा. महापौर :-

सचिव साहेब तुम्हाला विचारले आहे ठराव होतो की नाही ते सांगा.

नगरसचिव :-

मी आधीच सांगितलेले होते. त्याप्रमाणे आपण जी कुठल्याही समितीवर नावे सदस्य नियुक्त केल्याबाबत जे घोषित करतो हे ठरावाद्वारेच करत असतो . तुमची नावे ऑलरेडी आलेली आहेत. तर हाच ठराव आहे आपला असे समजून ह्या नावाचा विरोधात विरोधी पक्षाने जो ठराव मांडलेला आहे त्यावरती आपण मतदान घेऊ शकतो.

धृवकिशोर पाटील :-

ओके डन.

मा. महापौर :-

ठिक आहे. मतदानाची प्रक्रिया सुरु करा.

गिता जैन :-

सचिव साहेब माझ्या आक्षेपाचे काय झाले. माझ्या आक्षेपाची नोंद घेतली की नाही.

मा. महापौर :-

आता मतदानाच्या वेळेस ठरेल तुमचा आक्षेप घेतला की नाही.

नगरसचिव :-

तुमचा आक्षेप हा तौलानिक संख्या बळावरती होता.

गिता जैन :-

माझा आक्षेप काय आहे सांगा.

नगरसचिव :-

तुमचा आक्षेप जो होता तो तौलानिक संख्याबळावरती होता.

गिता जैन :-

तुम्ही मिनिट्समध्ये द्यावे माझा आक्षेप आहे म्हणून.

नगरसचिव :-

आपला आक्षेप जो होता मॅडम तो तौलानिक संख्याबळावरती होता . त्याची नोंद तर घेणारच आहे.

गिता जैन :-

सचिव साहेब माझ्या आक्षेपाची नोंद मिनिट्समध्ये घेण्यात यावी अशी माझी विनंती आहे.

नगरसचिव :-

ठिक आहे.

जुबेर इनामदार :-

मतदानामध्ये कॉंग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने आम्ही ठराव केलेला आहे . शिवसेनेचा अभिप्राय विचारा. त्यांच्या कुठल्या सदस्यांचा आहे का.

नगरसचिव :-

मी मतदान घेतो . मी मतदानासाठी पुकारतो त्याप्रमाणे आपण आपली मतदानाची अभिप्राय द्यावेत. सर्वप्रथम दुसरा ठराव जो आलेला आहे सुचक जुबेर इनमादार, अनुमोदन श्रीम. निलम ढवण ह्या ठरावाच्या बाजूने आता आपण यामध्ये विरोधातच मतदान डायरेक्ट घेऊया . कारण दोन्ही वेळा आपल्याला मतदान घेणे ऑनलाईन शक्य नाही जसे मागच्या सभेमध्ये घेतले होते तसे फक्त ह्या ठरावाच्या विरोधात ज्यांचे मतदान असेल तर तो त्यांच्या गटनेत्याने सांगावे आणि जर वैयक्तिक असेल तर तो त्यांनी व्यक्तीश: नाव घेऊन आपले ह्या ठरावावरती विरोध आहे असे निवेदन द्यावे.

प्रविण पाटील :-

सचिव साहेब परत माझा ह्या गोष्टीवर आक्षेप आहे.............

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम भारतीय जनतेच्या ग टनेत्याच्या हिशोबाने जुबेर इनामदार यांनी जो ठराव मांडलेला आहे त्याचा विरोध दर्शवितो आहे . ह्या विषयावर कोणाला किंवा बाजूने मांडायचा असेल तो व्यक्तीगत बोलू शकतो.

**नगरसचिव :-**

**सुचक जुबेर इनामदार यांनी मांडलेल्या ठरावाच्या विरोधात भारतीय जनता पार्टीचे गटनेता ह्यांनी त्यांचा विरोध दर्शविलेला आहे . ह्याव्यतिरिक्त कोणाला त्यांना विरोध दर्शवायचा असेल तर त्यांनी कृपया सांगावे.**

**गिता जैन :-**

**सचिव साहेब ह्या भारतीय जनता पार्टीच्या सदस्यांचे किती सदस्यांचे तुम्ही मोजत आहात.**

**नगरसचिव :-**

**ते गोषवाऱ्यात दिलेलच आहे 61 सदस्य.**

**मा. महापौर :-**

**जैन मॅडम आपला आक्षेप असेल आपल्याला विरोधात मतदान करायचे असेल तर तुम्ही करु शकता.**

**गिता जैन :-**

**आता तुम्हाला तेच सांगते किती सदस्यांची मोजणी आहे. किती सदस्य आहेत.**

**नगरसचिव :-**

**मॅडम आपला प्रश्न निट कळलेला नाही आपण पुन्हा सांगावे.**

**गिता जैन :-**

**गहलोतजीने सांगतले भाजपातर्फ आम्ही विरोध करत आहात मग ते 61 करत आहेत की 60 करत आहेत?**

**नगरसचिव :-**

**गटनेता यांनी भारतीय जनता पार्टीचे 61 सदस्य आहेत त्यांच्यातीने हे सांगितले आहे. विरोध दर्शवितो असे सांगितलेले आहे. तथापी कोणालाही भारतीय जनता पक्षाच्या कोणत्या ही सदस्याला जर आपला विरोध नोंदवायचा असेल तर तो व्यक्तीश : आपला विरोध नोंदवू शकतो. त्याची नोंद घेण्यात येईल.**

**गिता जैन :-**

**परत गोंधळ आम्ही समजायचे काय आम्हाला बडतर्फ केल्यानंतर त्यांनी मला मोजले हे मलाच समजत नाही.....**

**मा. महापौर :-**

**सन्मा. सदस्या आता आपण कोणत्या पक्षामध्ये आहेत? आपण सांगा.**

**गिता जैन :-**

**मी सांगितले मला बडतर्फ केलेले आहे.**

**मा. महापौर :-**

**तुम्ही कोणत्या पक्षामध्ये आहात आपणच खुलासा करा.**

**गिता जैन :-**

**मी खुलासा केला की, बडतर्फचे लेटर मिळाल्यानंतर एखादा नगरसेवक अपक्ष असतो तुम्हाला माहिती पाहिजे. तुम्ही महापौर आहात तुम्हाला हे माहिती पाहिजे.**

**मा. महापौर :-**

**आता आपण कोणत्या पक्षामध्ये आहेत. आपण स्पष्टपणे उल्लेख करा. त्याची नोंद होईल.**

**गिता जैन :-**

**एक वर्षाआधी याची नोंद करुन घ्यायची होती. मला लेटर दिले तेव्हा.**

**मा. महापौर :-**

**तुम्हाला कोणी लेटर दिले पक्षाने दिले की महापालिकेने दिले.**

**गिता जैन :-**

पक्षाने दिले.

**मा. महापौर :-**

पक्षाने दिले तर याचा खुलासा तुम्ही पक्षाकडे करायला पाहिजे होता. आता तुम्ही महासभेमध्ये हा विषय आणता ठिक आहे . आणला आहे तर मी तुम्हाला संधी देते आपण कोणत्या पक्षामध्ये आहात. त्याचा खुलासा आपण स्वत: करावा.

**गिता जैन :-**

मॅडम मी स्वत: कशी करणार.

**मा. महापौर :-**

मग कसे कळणार तुमचा विषय कसा मीटणार.

**मा. उपमहापौर :-**

विषय उगाच लांबत आहे . त्यांना मत बाजूने करायचे असेल त्यांनी मतदान करा ज्यांना विरोधात करायचे असेल मतदान ते विरोधात करण्यात यावे अशी महापौर मॅडम विनंती आहे . सचिव महोदय तुम्ही निर्देश द्या.

**नगरसचिव :-**

कोणाचेही सदस्यांचे विरोध आहे का सुचक जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या विरोधात

**प्रविण पाटील :-**

सचिव साहेब आता मला सांगा गटनेता ही संख्या सांगेल हे तुम्ही नोंद करणार.

**नगरसचिव :-**

गटनेता सांगेल ही नाही माझ्याकडे जे उपस्थित सदस्य संख्या आहे त्याप्रमाणेच आम्ही नोंद करणार आहोत. मिटींगमध्ये जे सदस्य उपस्थित आहेत ती सदस्य संख्या मोजली जाईल.

**प्रविण पाटील :-**

तेच मला विचारायचे होते.

**नगरसचिव :-**

सुचक जुबेर इनामदार यांच्या ठरावाच्या विरोधा त भारतीय जनता पार्टीने विरोध दर्शविलेला आहे. अन्य कोणाचाही सदस्यांचा विरोध नाही.

**गिता जैन :-**

मला एक सांगा तुमच्याकडे संख्या किती आहे?

**मा. महापौर :-**

उपस्थित संख्या...........

**नगरसचिव :-**

भारतीय जनता पक्षातर्फे ह्या व्हिडीयो कॉन्फरन्सींग सभेमध्ये 49 सदस्यांना सहभाग आहे.

**गिता जैन :-**

त्यात मी आहे का?

**नगरसचिव :-**

तुम्ही पण त्याच्यात आहातच ना.

**प्रविण पाटील :-**

आता एखाद्या सदस्याला तुम्ही तुमच्या 49 सदस्यांपैकी.

**मा. उपमहापौर :-**

प्रविण पाटील साहेब तुम्हाला कुठल्याही ठरावामध्ये विरोध नोंदवायचा असेल कुठल्याही पक्षाचा असेल......

**प्रविण पाटील :-**

**प्रत्येकाचा स्वतंत्र अधिकार आहे. प्रत्येक सदस्याला.**

**मा. उपमहापौर :-**

**आता मतदानाची प्रक्रिया सुरु आहे.**

**प्रविण पाटील :-**

**सर्वांना अधिकार आहे. तुम्ही 49 मोजतात. ठराव करायचा असेल एखाद्याला तटस्थ राहायचे असेल हा सदस्याचा अधिकार आहे. तुम्ही तो कसा हिरावून घेणार.**

**नगरसचिव :-**

**सर्व सदस्यांना विनंती आहे मतदानाची प्रक्रिया आपण ह्या विषयाची पूर्ण करुया . त्यानंतर पुन्हा आपण आपली मते जरूर मांडावीत.**

**प्रविण पाटील :-**

**सचिव साहेब गटनेता नाही प्रत्येक सदस्याचे मतदान तुम्ही स्वतंत्र घ्या . त्यांचा अधिकार आहे.**

**गिता जैन :-**

**सचिव साहेब ही प्रक्रिया चालू असताना माझे एक निवेदन नोंदवून घ्या . जेव्हा जेव्हा मतदानाची वेळ येईल तेव्हा तुम्ही प्लीज 6 जरी अजून लेटर दिले नसेल आणि मला नेहमी माझे मत काय आहे ते वेगळे विचारा.**

**नगरसचिव :-**

**मॅडम मी प्रत्ये क वेळेस विचारतो . मागच्या वेळेस देखील विचारले होते . आताही पुन्हा विचारलेले आहे की गटनेत्यांनी त्यांचे बाजूने किंवा विरोधात हे मतदान दिल्यानंतरच कोणत्याही पक्षाचे त्याच पक्षाचे सदस्याला आपले मतदान द्यायचे आहे का स्वतंत्रपणे भारतीय जनता पार्टीने जी नावे दिलेली आहेत आणि त्यांचा जो ठराव आहे त्याच्या अनुषंगाने ज्या सदस्यांना आपला विरोध दर्शवायचा असेल त्यांनी कृपया आपला विरोध गटनेत्यांनी आपला दर्शवावा.**

**जुबेर इनामदार :-**

**काँग्रेस लोकशाही आघाडीने पूर्ण विषयावरच विरोध दर्शविलेला आहे . ह्या विषयावर आम्ही तौलानिक संख्येच्या विषयावर तदर्थ समितीवर मी विरोध दर्शविलेला आहे . मी ठराव केलेला आहे . काँग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने.**

**निलम ढवण :-**

**जुबेरजी मी आपण केलेल्या ठरावाला अनुमोदन दिलेले आहे . त्याचाच अर्थ त्या मताशी मी सहमत आहे. शिवसेनाच्या वतीने.**

**नगरसचिव :-**

**ठिक आहे मी नोंद घेतलेली आहे.**

**गिता जैन :-**

**सचिव साहेब आता माझे मत घेत आहात का?**

**नगरसचिव :-**

**तुम्ही बोला.**

**गिता जैन :-**

**मी जुबेर साहेबांच्या ठरावाशी सहमत आहे.**

**नगरसचिव :-**

**ठिक आहे.**

मा. महापौर :-

भारतीय जनता पार्टी 48, शिवसेना काँग्रेस 25 सदरचा विशेष समित्यांवरील तौलानिक संख्येप्रमाणे सदस्य घेणे हा ठराव बहुमताने मंजूर करण्यांत येत आहे. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

प्रकरण क्र. 31 :-

विशेष समित्यांवर तौलानीक संख्येप्रमाणे सदस्य घेणे.

ठराव क्र. 22 :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून [महिला व बालकल्याण समितीसह ] विशेष समित्यांची नेमणूक करता येईल. अशा समित्यांनी महानगरपालिका त्यांना वेळोवेळी जे अनुदेश देईल ते पाळले पाहिजेत. त्या अनुषंगाने मा. महासभा दि. १८/०७/२०१८, ठराव क्र. २३ अन्वये पुढील विशेष समित्या गठित करून विशेष समित्यांची सदस्य संख्या ९ (नऊ) इतकी निश्चित केलेली आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | सरासरी | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९४ x ९ = ५.८४ | ६ |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९४ x ९ = २.०१ | २ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९४ x ९ = १.१४ | १ |

तौलानिक संख्याबळानुसार विशेष समित्यांवर सदस्य नेमणुक करणेसाठी सर्वपक्षीय गटनेत्यांनी शिफारस केलेल्या सदस्यांची एक वर्षाकरिता विशेष समित्यांवर नेमणूक करण्यात येत आहे.

१) पाणी पुरवठा व मल:निसारण समिती

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्रीम. यादव मिरादेवी रामलाल | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. शाह रिटा सुभाष | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. भोईर गणेश गजानन | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. म्हात्रे नयना गजानन | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्री. शाह राकेश रतिशचंद्र | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. म्हात्रे सचिन केसरीनाथ | भारतीय जनता पार्टी |
| ७ | | शिवसेना |
| ८ | | शिवसेना |
| ९ | | काँग्रेस लोकशाही आघाडी |

२) शिक्षण व समाजकल्याण व झोपडपट्टी सुधार, क्रिडा व सांस्कृतिक समिती

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| १ | डॉ. पाटील प्रिती जयप्रकाश | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. भानुशाली वर्षा गिरधर | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री. मांजरेकर आनंद दत्ताराम | भारतीय जनता पार्टी |

| | | |
|---|---|---|
| ५ | श्रीम. शाह सीमा कमलेश | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. दुबे मनोज रामनारायण | भारतीय जनता पार्टी |
| ७ | | शिवसेना |
| ८ | | शिवसेना |
| ९ | | काँग्रेस लोकशाही आघाडी |

३) विधी व नियोजन समिती

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्री. थेराडे संजय अनंत | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्री. भोईर जयेश भानुदास | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. जैन राजेंद्र भवरलाल | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री. शेट्टी अरविंद आनंद | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्री. विरानी अनिल रावजीभाई | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. म्हात्रे मोहन गोपाळ | भारतीय जनता पार्टी |
| ७ | | शिवसेना |
| ८ | | शिवसेना |
| ९ | | काँग्रेस लोकशाही आघाडी |

४) आरोग्य परिरक्षण, वैद्यकीय सहाय्य, उद्यान व शहर सुशोभिकरण समिती

| अ.क्र. | सदस्याचे नाव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्रीम. पाटील वंदना मंगेश | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. भानुशाली वर्षा गिरधर | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. शेट्टी गणेश गोपाळ | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्री. मांजरेकर आनंद दत्ताराम | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. शाह सीमा कमलेश | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. दुबे मनोज रामनारायण | भारतीय जनता पार्टी |
| ७ | | शिवसेना |
| ८ | | शिवसेना |
| ९ | | काँग्रेस लोकशाही आघाडी |

सुचक :- श्री. हसमुख गेहलोत                अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील

ठराव बहुमताने मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. 32, महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यांची नेमणूक करणे. तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे**

**मा. उपमहापौर :-**

**महापौर मॅडम , भारतीय जनता पार्टीच्या गटनेत्याच्या हिशोबाने आमच्या सदस्यांची यादी सचिव महोदयांना देत आहे.**

**जुबेर इनामदार :-**

**सचिव महोदय , काँग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने मी इथुन नाव वाचून दाखवतो . वृक्ष प्राधिकरण समितीवर अशरफ मोहम्मद इब्राहीम शेख ह्या सदस्याचे नाव नामनिर्देशित करत आहे.**

**निलम ढवण :-**

**सचिव साहेब वृक्ष प्राधिकरण समितीवर मी शि वसेना पक्षातर्फे श्री . दिनेश नलावडे व सौ . अर्चना कदम ह्या दोन सदस्यांचे नाव देत आहे.**

**नगरसचिव :-**

**मा. पिठासीन अधिकाऱ्यांच्या परवानगीने वृक्ष प्राधिकरण ह्या समितीवर जी नावे आलेली आहेत पक्षनिहाय ती मी वाचून दाखवतो . भारतीय जनता पार्टीतर्फे 6 सदस्यांची नावे प्रा प्त झालेली आहेत. 1) पाटील धृवकिशोर मन्साराम 2) गोहिल शानु जोरावर 3) म्हात्रे विनोद काशिनाथ 4) नयना म्हात्रे 5) जैन सुनिता रमेश 6) पांडये पंकज सुर्यमणी ही भारतीय जनता पक्षातर्फे देण्यात आलेली नावे आहेत. तसेच शिवसेना पक्षातर्फे वृक्ष प्राधिकरण समितीसाठी दो न नावे आलेली आहेत . 1) सौ. अर्चना कदम 2) श्री. दिनेश नलावडे तसेच काँग्रेस लोकशाही आघाडीच्या तर्फे 1) अशरफ मोहम्मद इब्राहीम शेख.**

**मा. महापौर :-**

**वृक्ष प्राधिकरण समिती करिता सर्वपक्षियकडून नावे आलेली आहेत आणि सचिव साहेबांनी त्या नावांचे वाचन केलेले आहे. सदर समितीमध्ये आलेल्या सदस्यांच्या नावांना मान्यता देण्यात येत आहे. सचिव साहेब पुढचा विषय वाचा.**

**प्रकरण क्र. 32 :-**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे आरक्षण व जतन (सुधारणा) अधिनियम १९७५ चे कलम ३(१) अन्वये वृक्ष प्राधिकरण समिती गठीत करुन पालिका सदस्यांमधून सदस्यां ची नेमणूक करणे . तसेच ३(३) नुसार बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींची सदस्य संख्या निश्चित करुन नेमणूक करणे**

**ठराव क्र. 23 :-**

**महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये संबंधित नागरी स्थानिक प्राधिकरणाने त्या प्राधिकरणा स ठरविता येईल अशारितीने आणि मुदतीसाठी नेमण्यात आलेल्या अध्यक्ष व इतर यासह कमीत कमी ५ आणि जास्त १५ व्यक्तींची मिळून बनलेल्या एका वृक्षप्राधिकरणाची रचना करता येईल अशी तरतुद आहे.**

**प्रकरण २ चा नियम ३(३) अन्वये वृक्षप्राधिकरणेस ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींना वृक्षप्राधिकरणाचे सदस्य म्हणून नामनिर्देशित करुन घेता येईल . हे सदस्य वृक्षप्राधिकरण समिती ठरविल अशारितीने व मुदतीसाठी स्विकृत करण्यात आले पाहिजे . प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचा अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील.**

महानगरपालिकेच्या नवनिर्वाचित सदस्यांनी मा . विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचे कार्यालयात नोंदणी करून पक्ष/गट/आघाडी मिळून केलेल्या आघाडीचा तपशिल खालील प्रमाणे आहे.

| भारतीय जनता पार्टी | शिवसेना | काँग्रेस लोकशाही आघाडी |
|---|---|---|
| ६१ | २१ | १२ (१० + २) |

महापालिका सदस्यांमधून घ्यावयाचे सदस्य संख्येसाठी तौलनिक संख्याबळाचे प्रमाणात वृक्ष प्राधिकरण समितीवर सदस्यांचे नामनिर्देशन (उदाहरणार्थ) खालीलप्रमाणे होत आहे.

| अ. क्र. | पक्ष/गट/आघाडी | समिती सदस्य ९ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य | समिती सदस्य १२ प्रमाणे | प्रस्तावीत सदस्य |
|---|---|---|---|---|---|
| १ | भारतीय जनता पार्टी | ६१ ÷ ९४ x ९ = ५.८४ | ६ | ६१ ÷ ९४ x १५ = ९.७३ | १० |
| २ | शिवसेना | २१ ÷ ९४ x ९ = २.०१ | २ | २१ ÷ ९४ x १५ = ३.३५ | ३ |
| ३ | काँग्रेस लोकशाही आघाडी | १२ ÷ ९४ x ९ = १.१४ | १ | १२ ÷ ९४ x १५ = १.९१ | २ |

वृक्ष प्राधिकरण समितीची मुदत व महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून 9 सदस्य संख्या व ३(३) अन्वये ज्यांना वृक्षाचे रोपण आणि जतन या क्षेत्रामध्ये विशेष ज्ञान आणि प्रत्यक्ष अनुभव असेल अशा बिनसरकारी संघटनाच्या प्रतिनिधींमधून 2 सदस्य संख्या निश्चित करुन वृक्ष प्राधिकरण समिती तसेच प्रकरण २ कलम ३ (२) नुसार वृक्ष प्राधिकरणाचे अध्यक्ष महानगरपालिका आयुक्त असतील अशी 12 सदस्यांची समिती गठीत करण्यात यावी.

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ मधील प्रकरण २ नियम ३(१) अन्वये महापालिका सदस्यांमधून पुढील सदस्यांची वृक्ष प्राधिकरण समितीवर एक वर्षाकरिता नेमणूक करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्री. पाटील ध्रुवकिशोर मनसाराम | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. गोहिल शानु जोरावरसिंह | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. म्हात्रे विनोद काशिनाथ | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. नयना गजानन म्हात्रे | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. जैन सुनिता रमेश | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्री. पान्डेय पंकज सुर्यमणि | भारतीय जनता पार्टी |
| ७ | सौ. अर्चना अरुण कदम | शिवसेना |
| ८ | श्री. दिनेश दगडू नलावडे | शिवसेना |
| ९ | शेख अशरफ मोहम्मद इब्राहीम | काँग्रेस लोकशाही आघाडी |

सुचक :- श्री. हसमुख गेहलोत अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 33, महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

**मा. उपमहापौर :-**

**महापौर मॅडम महिला व बालकल्याण समिती सदस्यांची यादी भारतीय जनता पार्टी गटनेत्यांच्या हिशोबाने सचिव महोदयांना मी देत आहे.**

**निलम ढवण :-**

**महापौर मॅडम शिवसेनेच्या वतीने महिला व बालकल्याण समितीवर 1) सौ. वंदना विकास पाटील 2) सौ. शर्मिला बगाजी ह्या दोन महि ला सदस्यांची नेमणूक करण्यांत यावी असे मी शिफारस करत आहे.**

**जुबेर इनामदार :-**

**महिला व बालकल्याण समिती प्रतिनिधींची नेमणूक कॉंग्रेस लोकशाही आघाडीच्या वतीने मी इथून नाव वाचून दाखवत आहे . 1) मर्लिन मर्विन डिसा 2) रुबीना फिरोज शेख या दोन सदस्यांचे नाव नामनिर्देशित करण्यांत येत आहे.**

**मा. महापौर :-**

**ठिक आहे सचिव साहेब नावांचे वाचन करा.**

**नगरसचिव :-**

**शिवसेना पक्षातर्फे 2 नावे दिलेली आहेत. तथापी त्यांनी अजून एक नाव द्यायचे आहे . तीन नाव देणे अपेक्षित आहेत. आपण 15 सदस्यांची समिती गठीत करणार आहोत.**

**निलम ढवण :-**

**मगाशी 9 ची समिती म्हणालात म्हणून 2 नावे दिली गेली.**

**नगरसचिव :-**

**प्रत्येक समितीची सदस्य संख्या वेगवेगळ्या आहेत . महिला बालकल्याण समिती साठी आपण 15 सदस्य संख्या निश्चित केलेली आहे . आपल्याला गोषवारा तसा दिलेला आहे . त्याप्रमाणे भारतीय जनता पक्षाची 10 नावे माझ्याकडे आलेली आहेत. शिवेसनेची 2 नावे आलेली आहेत आणि कॉंग्रेस लोकशाही आघाडीची पण 2 आलेली आहेत. अद्याप एक नाव शिवसेना पक्षाने देणे अपेक्षित आहे . आपण ते नाव देण्यात यावे.**

**निलम ढवण :-**

**सचिव साहेब, आपण त्याच्यात 9 आणि 15 ची समिती ही महासभेत ग्राहय धरली जाईल . त्याच्यानुसार द्यायची आहे. म्हणून आम्ही 9 सदस्यानुसार दोन नावे दिली होती. तर त्यामध्ये आपण एक 1) श्रीम. तारा घरत ह्या सदस्याचे महिला बालकल्याण समितीमध्ये नाव घ्यायचे आहे.**

**नगरसचिव :-**

**ठिक आहे, महिला व बालकल्याण समितीसाठी भारतीय जनता पक्षातर्फे 10 नावे आलेली आहेत. 1) श्रीम. पाटील वंदना मंगेश 2) श्रीम. सिमा शहा 3) श्रीम. नाईक विविता 4) श्रीम. बेलानी हेमा 5) श्रीम. सुजाता पारधी 6) श्रीम. सुनिता भोईर 7) श्रीम. सोनार सुरेखा 8) श्रीम. मुखर्जी अनिता 9) श्रीम. परमार हेतल 10) भावसार वंदना शिवसेना पक्षातर्फे 1) श्रीम. वंदना विकास पाटील 2) श्रीम. शर्मिला बगाजी 3) श्रीम. तारा घरत कॉंग्रेस लोकशाही आघाडी पक्षातर्फे दोन सदस्यांची नावे आलेली आहेत. 1) श्रीम. मर्लिन डिसा 2) श्रीम. रुबिना फिरोज याप्रमाणे नावे महिला बालकल्याण समितीसाठी प्राप्त झालेले आहेत.**

**निलम ढवण :-**

**सचिव साहेब एक शंका आहे.**

**नगरसचिव :-**

**बोला.**

**निलम ढवण :-**

आम्ही 9 सदस्य संख्यानुसार पहिले लेटर दिले होते. आता जे ॲडीशनल नाव टाकले आहेत. त्यांचे लेटर वेगळ द्याव लागेल का आपल्याला?

**नगरसचिव :-**

द्या. नंतर द्या.

**निलम ढवण :-**

चालेल थँक्यू.

**मा. महापौर :-**

महिला व बालकल्याण समिती व रती सर्व पक्षांनी आप आपल्या सदस्यांची नाव सचिवांकडे दिलेली आहेत. त्याकरिता समितीवर आलेल्या सर्व सदस्यांना मान्यता देण्यात येत आहे.

**प्रकरण क्र. 33 :-**

महिला व बालकल्याण समितीवर सदस्यांची नेमणूक करणेबाबत.

**ठराव क्र. 24 :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे क लम ३०(१) चे तरतुदीनुसार महिला व बालकल्याण समिती गठीत करणे आवश्यक असुन, महानगरपालिकेतील गटाच्या तौलनिक संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करण्याची तरतुद आहे . माता व बालकांच्या विविध कल्याणकारी योजना शासकिय धोरणाप्रमाणे राबविणे तसेच यासंबंधी नविन यो जना सादर करून शासकिय धोरणाप्रमाणे कार्यन्वित करणे हे या समितीचे कार्यक्षेत्र राहिल.

महानगरपालिका सभा कामकाज नियमचे कलम ४ (ब) अंतर्गत महिला व बालकल्याण समिती सदस्य संख्या नऊ इतकी निश्चीत आहे. तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम ३०(१) अन्वये महानगरपालिकेस, वेळोवेळी आपल्या पालिका सदस्यांमधून (महिला व बालकल्याण समितीसह) विशेष समित्यांची नेमणूक करता येईल अशी तरतुद आहे . मा. महासभा दि. १६/१०/२०१७, ठराव क्र. ०२ अन्वये महिला व बालकल्याण समिती सदस्यांची संख्या १५ इतकी निश्चित करण्यात आली आहे.

सर्वपक्षीय ग टनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार महिला व बालकल्याण समितीवर खालील १५ सदस्यांची १ वर्षाकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्रीम. पाटील वंदना मंगेश | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्रीम. सिमा शाह | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्रीम. नाईक विविता विवेक | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. बेलानी हेमा राजेश | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. पारधी सुजाता यशवंत | भारतीय जनता पार्टी |
| ६ | श्रीम. भोईर सुनिता शशिकांत | भारतीय जनता पार्टी |
| ७ | श्रीम. सोनार सुरेखा प्रकाश | भारतीय जनता पार्टी |
| ८ | श्रीम. मुखर्जी अनिता बबलू | भारतीय जनता पार्टी |
| ९ | श्रीम. परमार हेतल रतिलाल | भारतीय जनता पार्टी |
| १० | श्रीम. भावसार वंदना संजय | भारतीय जनता पार्टी |
| ११ | श्रीम. वंदना विकास पाटील | शिवसेना |
| १२ | श्रीम. शर्मिला बगाजी | शिवसेना |
| १३ | श्रीम. तारा विनायक घरत | शिवसेना |
| १४ | श्रीम. मर्लिन मर्विन डिसा | काँग्रेस लोकशाही आघाडी |

| | | |
|---|---|---|
| १५ | श्रीम रुबिना शेख | काँग्रेस लोकशाही आघाडी |

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 34, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे. गोषवारा आम्ही दिलेला आहे. त्यामध्ये ज्या पक्षाचे सदस्य निवृत्त होत आहेत त्याच पक्षाच्या सदस्यांनी त्या गोषवाऱ्याप्रमाणे नावे देणे अपेक्षित आहेत.

**मा. उपमहापौर :-**

महापौर मॅडम आपल्या परवानगीने स्थायी समितीच्या सदस्यांची यादी मी सचिव महोदय भारतीय जनता पार्टीच्या वतीने ॲज अ गटनेता या नात्याने यादी देत आहे.

**निलम ढवण :-**

सचिव साहेब शिवसेनेच्या वतीने आपल्याकडे मी देखील लेटर दि लेले आहे. मी वाचून दाखवू का?

**नगरसचिव :-**

पत्र मिळालेले आहे. तरी आपण आपली नावे वाचून दाखवा.

**निलम ढवण :-**

स्थायी समितीवर सदस्य म्हणून 4 सदस्य यांची आम्ही शिवसेनेच्या वतीने शिफारस करत आहोत. 1) स्नेहा पांडे 2) एलायस बांड्या 3) श्री. कमलेश भोईर 4) श्री. जयंतीलाल पाटील.

**नगरसचिव :-**

मॅडम आपल्याला ३ नावे द्यायची आहेत. 3 नावे ती आपण दिलेली आहेत. एलायस बांड्या हे ह्या पूर्वीपासूनच सदस्य आहेत. त्यांची टर्म पूर्ण झालेली नाही अद्याप जी निवृत्त सदस्य होणार त्यांची नावे आपल्याला दिलेली होती. 1) श्रीम. अनिता पाटील 2) श्रीम. स्नेहा पांडे 3) श्री. कमलेश भोईर हया 3 नावावरच 3 नावांच्या जागी आपल्याला सदस्य द्यायचे आहेत.

**निलम ढवण :-**

1) श्रीम. स्नेहा पांडे 2) श्री. कमलेश भोईर 3) जयंतीलाल पाटील.

**नगरसचिव :-**

ठिक आहे नावे मिळाली. काँग्रेस गटनेत्यांची नावे ह्या समितीमध्ये नाहीत. स्थायी समितीवर ८ सदस्यांची नावे आपल्याला येणे अपेक्षित आहेत. त्यामध्ये भारतीय जनता पार्टीचे 5 सदस्यांची नावे प्राप्त झालेली आहेत. 1) राकेश शहा 2) हसमुख गेहलोत 3) सुरेश खंडेलवाल 4) सुनिता जैन 5) शानु गोहिल त्याचप्रमाणे शिवसेना पक्षातर्फे 3 नावे प्राप्त झालेली आहेत. 1) श्रीम. स्नेहा पांडे 2) श्री. कमलेश भोईर 3) जयंतीलाल पाटील.

**मा. महापौर :-**

स्थायी समिती सदस्यांची नावे ह्या ठिकाणी भारतीय जनता पक्ष तसेच शिवेसना पक्षामार्फत सचिवांकडे दिलेली आहेत. सदरच्या नावांना मान्यता देण्यात येत आहे. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 34 :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(३) अन्वये मा. स्थायी समितीच्या रिक्त होणाऱ्या आठ (८) सदस्यांच्या जागी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे प्रकरण २ कलम २०(५) अन्वये नविन आठ (८) सदस्यांची नेमणूक करणे.**

**ठराव क्र. 25 :-**

**महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(३) अन्वये स्थायी समिती सदस्यांपैकी खालील निम्मे (आठ) सदस्य माहे ऑक्टोबर २०२० च्या पहिल्या तारखेस निवृत्त झालेले आहेत.**

**निवृत्त होणाऱ्या सदस्यांमध्ये भारतीय जनता पार्टीचे ५ व शिवसेना पक्षाचे ३ सदस्य निवृत्त होत आहेत . मा. उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील पत्र क्र . संकिर्ण२००८/४३४/ प्र.क्र.१५१/२००८/नवि-२५, दि. २० ऑक्टोबर २००८ अन्वये निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी त्याच मान्यता प्राप्त पक्षाचे, नोंदणीकृत पक्षाचे, गटाचे, आघाडीचे किंवा फ्रंटचे नवीन सदस्य स्थायी समितीवर नेमणे अध्यारुत आहे.**

**सर्वपक्षीय गटनेत्यांनी तौलानिक संख्या बळाप्रमाणे सदस्यांच्या नावाची शिफारस केलेनुसार निवृत्त होणाऱ्या आठ सदस्यांच्या जागी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमचे कलम २०(५) अन्वये आठ सदस्यांची दोन वर्षासाठी नेमणूक करण्यात येत आहे.**

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पक्ष |
|---|---|---|
| १ | श्री. राकेश शाह | भारतीय जनता पार्टी |
| २ | श्री. हसमुख गहलोत | भारतीय जनता पार्टी |
| ३ | श्री. सुरेश खंडेलवाल | भारतीय जनता पार्टी |
| ४ | श्रीम. सुनिता जैन | भारतीय जनता पार्टी |
| ५ | श्रीम. शानु गोहिल | भारतीय जनता पार्टी |
| ६ | सौ. स्नेहा पांडे | शिवसेना |
| ७ | श्री. कमलेश भोईर | शिवसेना |
| ८ | श्री. जयंतीलाल पाटील | शिवसेना |

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**
**महापौर**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. ३५, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २, कलम ५(२)(ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे . नामनिर्देशित सदस्यांची नियुक्ती करणे हा विषय आता आपल्याकडे विषयपटलावर आहे. ह्या विषयाच्या अनुषंगाने श्री. नितेश मुणगेकर यांनी न्यायालयामध्ये याचिका दा खल केलेली आहे . ह्या विषया संदर्भामध्ये महासभेने कोणताही निर्णय घेऊ नये याचिका दाखल केली असल्याकारणाने याची जी प्रोसेस आहे त्याबद्दल आणि तसेच एकूण प्रक्रियेला आणि सदस्यांच्या नावाबद्दल ह्यांनी आक्षेप घेतलेला आहे आणि**

त्याबाबत याचिका उच्च न्यायालयात दाखल केले ली आहे त्याच्यावरती येणाऱ्या ९ तारखेला सुनावणी होणार आहे. याबाबत त्यांनी आपल्याला कळविलेला आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम, सचिव साहेबांनी जे सांगितल की ह्या संदर्भात पीटीशन हायकोर्टामध्ये फाईल करण्यात आली आहे आणि तशाप्रकारे आयुक्तांना पण पत्र दिलेला आहे. महापौर मॅडम आपणाला पण तसे पत्र देण्यात आलेला आहे. परंतु ते जरी देण्यात आला असेल तरी याचा अर्थ असा होत नाही की आपण हा विषय घेऊ शकत नाही . सचिव महोदय विषय आपण घेऊ शकतो कना ? ते ९ तारखेला आहे. कोर्टाने आपल्याला काही जजमेंट दिलेला आहे का ? कोर्टाने महापालिकेला काही कळविले आहे का? आयुक्त महोदय, महापौर महोदय कोर्टाचे काहीही निर्देश नाहीत त्यामुळे महासभेमध्ये हा विषय घेण्यात यावा अशी मी आपणांस विनंती करतो. आणि मदन सिंह यांनी ह्या संदर्भातला ठराव मांडावा.

**नगरसचिव :-**

नितेश मुणगेकर यांनी आपल्याला जे पत्र दिले ते मी आपल्याला थोडक्यात वाचून दाखवतो. मा. महासभा दि. ४/१२/२०२०, प्रकरण क्र. ३५ बाबत मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल असल्याने सदरचा विषय रद्द करणेबाबत त्यांनी पत्र दिलेले आहे. मा. उच्च न्यायालयातील दाखल याचिका टॅम्प क्र. ९६८४५/२०२० उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपल्या निर्देशनास आणून देऊ इच्छितो येत्या शुक्रवार दि. ४/१२/२०२० रोजी होणाऱ्या मा. महासभा प्रकरण क्र. ३५ बाबत आम्ही याचिका दाखल केलेलइ सून आमचे वकील मा. ॲड श्री. पृथ्वीराज गोहेल यांनी ह्याबाबत बुधवार दि . २/१२/२०२० रोजी सुनावणी बाबत रितसर नोटिस दिलेली आहे . वरील नमुदप्रमाणे सदरचे प्रकरण मा . उच्च न्यायालयात न्यायप्रविष्ठ असल्याने सदरचे प्रकरण रद्द करुन मा . उच्च न्यायालयाचा अवमान होणार नाही याची दक्षता घ्यावी अन्यथा याची संपूर्ण जबाबदारी राहील असे त्यांनी पत्र दिलेले आहे . त्यानंतर आता आपण प्रश्न ह्या संदर्भात विचा रलेला आहे. ह्याबाबत न्यायालयाचे काही नोटिस आहेत का ? तर ह्याबाबत महापालिकेचे विधी अधिकारी यांच्याशी मी चर्चा केलेली आहे . सकाळी आज त्यानुसार सदरच्या प्रकरणावरती आतापर्यंत हेरींग झालेली नाही. पहिली सुनावणी ही ९/१२/२०२० रोजी मा. उच्च न्यायालयात आपल्याला कोणतेही अन्य आदेश ह्या प्रकरणामध्ये नाहीत.

**मा. महापौर :-**

सन्मा. धृवकिशोर पाटील बोला.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, मा. उच्च न्यायालयाने महापालिकेला उक्त आपणाला तसे काही निर्देश केलेले नाहीत की जो आपण विषय घेतलेला आहे . हा विषय महासभेत घेऊ नये तसे काही निर्दे श नाहीत. त्याच्यामुळे आपण हा विषय घेऊ शकतो. तसेच श्री. नितेश मुणगेकर ही व्यक्ती जी आहे ही आपल्या महापालिकेच्या कामकाजामध्ये इंटरफेअर करु शकत नाही. ते आपल्याला डायरेक्शन सुध्दा देऊ शकत नाही. त्याप्रमाणे माझी आपणाला विनंती की हा विषय घेणे गरजेचे आहे आणि तसे च लॉ ऑफिसरने सुध्दा आपल्याला तसे डायरेक्शन दिलेले नाहीत की आपण विषय घेऊ शकत नाही. त्याच्यामुळे माझी आपणांस विनंती आहे की हा विषय महासभेत घ्यावा.

**निलम ढवण :-**

महापौर मॅडम, विधी अधिकारी यांना ह्या विषयी विचारा ना.

**मा. महापौर :-**

सचिव साहेबांनी सांगितल ना.

**निलम ढवण :-**

त्यांना ही विचारा ना. नंतर कॉम्पलीकेशन नको आहेत कोणाला.

मा. महापौर :-

ठिक आहे.

हसमुख गहलोत :-

महापौर मॅडम, आता सचिव साहेबांनी सांगितल आहे की विधी विभागाला विचारपूस केलेली आहे आणि त्यांच्या माहितीच्या अनुषंगाने असे काही ठराव किंवा असे काही आदेश कोर्टातून आलेले नाहीत.

निलम ढवण :-

उपमहापौर साहेब सचिव साहेबांनी असे काही आदेश आले नाहीत म्हणून सांगितले आहे . परंतु विधी विभाग विधी अधिकाऱ्यांकडून क्लिअर करु दे की याच्यामुळे काही प्रॉब्लेम होणार नाही.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम , आयुक्त महोदय हा विषय आपल्याकडे समोर आलेला आहे . त्याच्यामध्ये नितेश मुणगेकर हे त्यांनी पीटीशन दाखल केली असेल कोर्टामध्ये उच्च न्यायालयामध्ये मात्र कोर्टाचा जो त्यांनी व्हेरी क्लिअर की आपल्याला त्यांना कोर्टाचा आपल्याला ऐकून घ्यायच बाकी आहे त्या अनुषंगाने कोर्टाने आपल्याला काही डायरेक्शन दिलेले नाहीत. ९ तारखेला ऐकून घेणार का तो पीटीशन करणे विधी अधिकारीचा आहे . पण आजच्या तारखेला ह्या विषयाला करण्यासाठी हो किंवा नाही महापौर मॅडम मला वाटते उगाच वेळ वाया घालतो. त्यांनी ह्या विषयावर पुढे कारवाई केली.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, ठराव वाचण्या अगोदर मला ह्या विषयावर बोलायची संधी देण्यात यावी.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आपला ठराव आहे तो सन्मा . सदस्य मदन सिंह ठराव वाचणार आहे . तर महापौर मॅडमने अनुमती द्यावी.

नगरसचिव :-

प्रकरण क्र. 35, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २, कलम ५(२)(ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या ) नियम २०१२ अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे.

मदन उदितनारायण सिंह :-

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण क्र .2 कलम 5(2)(ब) तसेच महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या ) नियम 2012 अन्वये मिरा भाईंदर महानगरपालिकेवर पाच नामनिर्देशित पालिका सदस्यांची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012 मधील नियम 5(1) च्या परंतुकानुसार व महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम 31अ नुसार नामनिर्देशित पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना महानगरपालिका , मान्यताप्राप्त पक्षाचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलानिक संख्याबळ विचारात घेवून भारतीय जनता पार्टी तीन सदस्य, काँग्रेस लोकशाही आघाडी 1 सदस्य, शिवसेना 1 सदस्य होत आहे.

नामनिर्देशित पालिका सदस्य पदाकरीता तौलानिक संख्याबळाच्या प्रमाणात 5(पाच) उमेदवारांची नावे मा. आयुक्त यांनी खालीलप्रमाणे शिफारस केली आहेत.

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | पक्ष/गट/आघाडीचे नाव |
|---|---|---|
| 1 | ॲड खान शफीक अहमद सादत खान | काँग्रेस लोकशाही आघाडी |
| 2 | श्री. सिंह विक्रमप्रताप रमापती | शिवसेना |
| 3 | श्री. अजित भगवान पाटील | भारतीय जनता पार्टी |
| 4 | श्री. भोसले अनिल बाबुराव | भारतीय जनता पार्टी |

| 5 | श्री. शर्मा भगवती तुगनचंद | भारतीय जनता पार्टी |
|---|---|---|

मा. आयुक्त यांनी शिफारस केलेल्या भारतीय जनता पक्षाचे 1) श्री. अजित भगवान पाटील 2) श्री. भोसले अनिल बाबुराव आणि 3) श्री. शर्मा भगवती तुगनचंद व काँग्रेस लोकशाही आघाडीचे ॲड खान शफीक अहमद सादत खान यांचे नाव नामनिर्देशित पालिका सदस्य पदी नियुक्त करण्यात येत आहे. मा. सचिव यांनी नामनिर्देशित केलेल्या सदस्यांची नावे लवकरच महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द करण्याची कार्यवाही करावी.

शिवसेना पक्षाचे उमेदवार श्री . सिंह विक्रमप्रताप रमापती यांच्याबाबत मा . महापौर व व मा. आयुक्तांकडे सभागृह नेते श्री. प्रशांत दळवी व भाजपा गटनेते श्री. हसमुख गहलोत यांनी तक्रार अर्ज पुराव्या सहित दिला आहे . तक्रार अर्जाबाबत चौकशीची शहानिशा करुन निर्णय घेणेबाबत मा . महापौरांनी मा. आयुक्त यांना कळविले होते.

तक्रार अर्जात श्री . सिंह विक्रमप्रताप रमापती यांनी महानगरपालिकेत उमेदवारी अर्ज दा खल केल्यानंतर व नामनिर्देशन सदस्यांची निवड प्रक्रियाचे कामकाज चालु असताना श्री . सिंह विक्रमप्रताप रमापती हे मे. प्रताप फाऊंडेशनचे अध्यक्ष असून त्यांनी मिरा भाईंदर महानगरपालिकेतर्फे शहरातील नागरीकांना अन्न पाकिटांचा पुरवठा करणेकामी महानगरपालिकेकडे दरपत्रक (Quotation) सादर केले आहे. त्याप्रमाणे श्री. सिंह विक्रमप्रताप रमापती हे अध्यक्ष असलेल्या मे. प्रताप फाऊंडेशन या संस्थेस महानगरपालिकेने दि.13/04/2020 रोजी कार्यादेश देण्यात आले.

मिरा भाईंदर महानगरपालिका कार्यादेशाप्रमाणे ठेकेदार मे . प्रताप फाऊंडेशन यांनी महानगरपालिकेत पुरवठा केलेल्या अन्न पाकिटांचा खर्चाचे रु.2,39,30,940/- बिल महानगरपालिकेकडे सादर केले. त्याप्रमाणे मिरा भाईंदर महानगरपालिकेने सदर बिलाची तपासणी करुन देयक अदा करणेस शिफारस केली.

यावरुन श्री. सिंह विक्रमप्रताप रमापती यांनी मिरा भाईंदर महानगरपालि केत ठेका घेतल्याचे सिध्द होत आहे . त्यामुळे त्यांना नामनिर्देशित पालिका सदस्य घोषित करु नये कारण महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम 10 (1) (फ) नुसार पालिका सदस्य होण्यास अनर्हता सिध्द होत आहे. असे सभागृह नेते श्री . प्रशांत दळवी यांच्या पत्रात नमुद आहे . श्री. सिंह विक्रमप्रताप रमापती मिरा भाईंदर महानगरपालिकेचे ठेकेदार असल्याचे कागदपत्रे पुरावे सभागृह नेत्यांचा पत्रासोबत जोडलेले आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012 मधील नियम 5(1) नुसार नामनिर्देशित पालिका सदस्यां चे नामनिर्देशित करण्यासाठी सभागृहनेता , विरोधी पक्षनेता आणि गटनेत्यांशी विचार विनीमय करण्याकरीता मा . आयुक्त यांनी दि.05/10/2020 रोजी बैठक आयोजित केली होती . सदर बैठकीत सभागृह नेते श्री . प्रशांत दळवी व भाजपा गटनेते श्री. हसमुख गहलोत यांनी श्री. सिंह विक्रमप्रताप रमापती यांचा नामनिर्देशित सदस्य नियुक्तीवर मा. आयुक्त यांना दि .03/10/2020 रोजी पत्रान्वये तक्रार अर्ज दिला आहे . यावर मा. आयुक्त यांनी खुलासा करावा असे सांगितल्यावर मा. आयुक्त यांनी “आम्हाला दोन दिवसांचा टाईम द्या आपण दोन दिवसा नंतर बसु तेव्हा फाय नल करु” असे सांगुन बैठक संपवली. तद्नंतर मा. आयुक्त यांनी सदर विषयाबाबत पुन्हा दि.22/10/2020 रोजी बैठक आयोजित केली. त्या बैठकीत पुन्हा उपरोक्त तक्रार अर्जावर निर्णय घेण्याबाबत सभागृह नेते यांनी सांगितल्यावर मा . आयुक्त यांनी असे सांगितले की , “तुम्ही जे सांगि तले ते आम्ही रेकॉर्ड वर घेतलेले आहे , आयुक्तांनी शिफारस केलेल्या उमेदवाराबाबत महानगरपालिका अंतिम निर्णय घेवू शकते किंवा महानगरपालिका निर्णय रिझर्व्हर्ड ठेवू शकते.”

श्री. सिंह विक्रम प्रताप रमापती यांच्या वरील आक्षेपाबाबत मा . आयुक्त यांनी तक्रार अर्जाची व पुराव्याची शहानिशा करुन चौकशी केली नाही तसेच याबाबत निर्णय घेतल्याचे दिसून येत नाही.

महाराष्ट्र महानगरपालिका (नामनिर्देशित सदस्यांची अर्हता व नियुक्त्या) नियम 2012 मधील नियम 5(2) अन्वये महानगरपालिकेत नामनिर्देशन सदस्यांसाठी कायद्यातील तरतुदीनुसार नियम 4 अन्वये विहित नमुन्यात प्रपत्र (नमुना) दिला आहे. त्यात उमेदवाराने करावयाच्या घोषणापत्रात स्पष्टपणे नमुद आहे की, उमेदवार ठेकेदार नसावा, जरी उमेदवार नामनिर्देशन अर्ज भरताना ठेकेदार नसला, परंतु निवडून आल्यावर किंवा जाहिर झाल्यावर देखील तो ठेकेदार असु नये अशी तरतुद आहे. त्यामुळे सदरचे उमेदवार नामनिर्देशित सदस्य होण्यास अपात्र आहेत , असे सभागृह नेते यांनी सादर केलेल्या कागदपत्रानुसार महाराष्ट्र महानगरपालिका कलम 10(1)(फ) नुसार पालिका सदस्य होण्यास सिध्द होत असल्याचे दिसून येत आहे.

मा. आयुक्त यांनी श्री. सिंह विक्रम प्रताप रमापती हे ठेकेदार आहेत याबाबतच्या तक्रार अर्जाचा व त्यासोबत जोडलेल्या कागदपत्रांची पूर्ण चौकशी व शहानिशा करुन संबंधितांची सुनावणी घेवून शिवसेना पक्षाचे श्री. सिंह विक्रम प्रताप रमापती यांचे नामनिर्देशन पालिका सदस्य नियुक्त करणे योग्य असल्यास प्रस्ताव निर्णय घेणेकरीता पुन्हा मा. महासभेत फेरसादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

सचिन म्हात्रे :-

माझे अनुमोदन आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्य प्रविण पाटील साहेब बोला.

प्रविण पाटील (विरोधी पक्षनेता) :-

मा. महापौर मॅडम, ह्या विषयावरती मा. आयुक्तांनी त्यांच्या दालनामध्ये महापालिकेच्या सर्व पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली होती . त्या बैठकीत स्पष्ट दिलेले आहे . एक बैठक झाली दि . 05/10/2020 या तारखेला, त्याच बरोबर दुसरी बैठक झाली . आता जे सन्मा. सदस्य मदन सिंह साहेबांनी जे एकंदर अभ्यास करुन एवढे वाचन केलेले आहे. आयुक्त साहेब, माझी एकच विनंती आहे 22 तारखेला जो निर्णय झालेला आहे तो निर्णय वाचतो . ह्या विषयावरती स्पष्ट निर्देश होते . या विषयावरती जे आक्षेप घेतले होते ते मुळात त्यांना घेताच येत नाही . कधी निवडणूक पण नाही निवडणूकीची कार्यपत्रिका असते त्याची कार्यपत्रिका पण नाही.

मा. उपमहापौर :-

प्रविण पाटील साहेब तुमचा आवाज ईको होत आहे. तुमच्या बाजुला कोणीतरी बसलेले आहेत. त्यांचा माईक बंद करावा. एक माईक चालू ठेवावा हि विनंती.

प्रविण पाटील (विरोधी पक्षनेता) :-

आयुक्त साहेब आपणांस विनंती आहे की, 22 तारखेला जो बैठकीत निर्णय झालेला आहे. तो निर्णय वाचून दाखवतो. असा आक्षेप देऊ शकतो का?

मा. महापौर :-

ठिक आहे. आयुक्त साहेब, याचा खुलासा करतील . आयुक्त साहेब याचा आपण खुलासा करावा. सन्मा. सदस्य ध्रुवकिशोर पाटील तुम्ही बोला . आयुक्त साहेब सगळ्यांचे बोलणे झाल्यानंतर खुलासा करतील.

ध्रुवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम माझे असे मत होते की , प्रविण पाटील ह्यांना जे काही म्हणायचे आहे ते त्यांनी सविस्तर संपूर्ण बोलल्यानंतर त्यांच्यावर आपल्याला खुलासा करणे योग्य राहिल. कारण की ज्या मिटींगला आम्हाला विरोधी पक्षनेते प्रविण पाटील साहेब दिलेले आहे त्याच मिटींगमध्ये 22 तारखेच्या मिटींगमध्ये आयुक्तांनी सांगितले की , मी शिफारस केलेल्या उमेदवारांबाबत महापालिका अंतीम निर्णय घेवू शकते किंवा महापालिका निर्णय रिझर्व्ह ठेवू शकते असे आयुक्तांनी त्यांच्या खुलाशामध्ये म्हंटलेले आहे.

**प्रविण पाटील (विरोधी पक्षनेता) :-**

**तुम्ही बोलण्यापेक्षा आयुक्त साहेब तिथे उपस्थित आहेत.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**माझ्याकडे आयुक्त साहेबांच्या प्रोसेडींगची झेरॉक्स आहे. त्याच्यामध्ये पहिल्या पेजला लिहलेले आहे.**

**मा. महापौर :-**

**सन्मा. विरोधी पक्षनेते आपणांस विनंती आहे की , आपण ध्रुवकिशोर पाटील साहेबांचे बोलणे झाल्यानंतर पुन्हा बोला. त्यांना त्यांचे पूर्ण मत मांडू द्या.**

**प्रविण पाटील (विरोधी पक्षनेता) :-**

**सभागृहाचा वेळ तुम्ही घालवू नका.**

**मा. महापौर :-**

**तुम्ही कमी बोलले तर सभागृहाचा वेळ कमी जाईल . पहिला ध्रुवकिशोर पाटील साहेबांना बोलू द्या नंतर तुम्हाला बोलायला देते.**

**ध्रुवकिशोर पाटील :-**

**महापौर मॅडम, आयुक्त साहेबांच्या खुलाशामध्ये एक लिहलेले आहे की , महापालिका अंतिम निर्णय घेवू शकते . तसेच आपल्या महापालिकेच्या ॲक्टमध्ये सुध्दा मिरा भाईंदर महानगरपालि केचे नामनिर्देशन सदस्यांकरीता आयुक्तांनी शिफारस केली आणि जर समजा ती शिफारस महापालिकेला मान्य नसल्यास महापालिकेने कारण देवून ती अमान्य करु शकतो आणि सन्मा . सदस्य मदन सिंह यांनी तो ठराव केला त्या ठरावामध्ये जे शिवसेना पक्षाचे ते नामनिर्दे शित सदस्यांनी फॉर्म भरलेला आहे त्याबद्दल त्यांनी सविस्तर माहिती दिलेली आहे . म्हणजे त्यांनी ठेका कसा घेतला. त्यांना किती बील अदा करण्यात आले आहे . प्लस त्यांनी फॉर्म भरताना त्यांनी ॲफेडेव्हीट दिले की मी ठेकेदार नाही आणि मॅडम कोणत्याही सदस्याने जर आपण एखादे सदस्याने फॉर्म भरलेला आहे . त्याने कोणताही ठेका घेवू नये असे क्लिअरकट महापालिकेच्या निर्णयामध्ये असल्यामुळे प्रविण पाटील साहेब यांनी जो खुलासा केलेला आहे तो खुलासा सरळ सरळ चुकीचा आहे असे माझे मत आहे.**

**मा. महापौर :-**

**निलमताई बोला.**

**निलम ढवण :-**

**महापौर मॅडम, म्हणजे तुम्हाला असे म्हणायचे आहे का की , आयुक्त साहेबांनी एकदा सोडून दोनदा मिटींग घेतल्या फॉर्म भरण्याच्या प्रोसिजर पासून ती प्रोसिजर प्रशासनाने केली मग प्रशासनाला ह्या संदर्भातले नॉलेज नाही आहे का? असे तुम्हाला म्हणायचे आहे का?**

**मा. महापौर :-**

**याबाबत मा. आयुक्त साहेब खुलासा करतील . तुमचे मत मांडा तुम्हाला काय बोलायचे आहे ते.**

**निलम ढवण :-**

**मी माझेच मत विचारत आहे. त्यांनी तो विषय मांडलेला आहे. महापालिका निर्णय घेवू शकते. आपण एकदा सोडून दोनदा साहेबांनी मिटींग घेतली. शेवटच्या मिटींगमध्ये देखील आम्ही स्वत: होतो. आपल्या सदस्याने आपल्या गटनेत्याने , सभागृह नेत्यांनी देखील त्यावेळी तिथे पाच जे नामनिर्देशित सदस्य आहेत त्यांची नावे तिथे सर्वांची मान्य झाली आणि आताच काय मोठा इश्यू झाला आणि ज्यावेळी ठेकेदार नसावा ह्या सगळ्या गोष्टी अटी आणि शर्ती होत्या . आम्हाला ही त्याची कल्पना आहे. परंतु त्यांनी त्या अगोदरच ठेकेदारीचा अर्ज दिला होता . त्याच्यामुळे तो प्रश्न आ ता येत नाही आणि जर आला असता तर स्क्रुटीनी करताना तो विषय आला पाहिजे होता. त्यावेळी तो फॉर्म त्यांचा**

योग्य का धरला गेला होता आता ह्या विषयावर चर्चा कशाला . म्हणजे जाणुन बुजून हे करायचे आहे का?

मा. महापौर :-

ठिक आहे उपमहापौर साहेब आपण बोला.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम, ढवण मॅडमचे जे म्हणणे आहे ते १०० टक्के खरे आहे. पण त्या मिटींगमध्ये फक्त ऑब्जेक्शन घेण्यासाठी बोलावले होते आणि जे दोन मिटींगचे ढवण मॅडम बोलतात त्या दोन मिटींग नव्हत्या . कुठल्या तांत्रिक बाब अडचणी होती म्हणून ती मिटींग पुढे ढकलली . दुसरी २२/१०/२०२० ला घेतलेली आमची मांग होती की आमची तक्रार ही होती की , ज्या उमेदवारांनी फॉर्म भरलेले आहेत फेब्रुवारी महिन्यात १३/०२/२०२० ला अर्ज वैध धरण्यात आले होते . त्या बाबतीचा हा विषय होता याच्यामध्ये विषय हा ऑलरेडी मदन सिंग साहेबांनी जे ठराव मांडले त्यामध्ये पूर्ण स्पष्ट केलेले आहे. पण त्यामध्ये दोन विषय अजून आहेत. ते ॲड करायचे बाकी होते. महापौर मॅडम एकतर हे आहे की आम्ही चॅरीटी कमिशनरला पत्र दिले होते. त्या चॅरीटी कमिशनरला ही विचारपुस केलेली की आपण जे तुम्ही छाननी जी केली होती त्या छाननीमध्ये चॅरीटी कमिशनरला पत्र विचारले होते की विचारपुस केली होती का ? प्रताप फाऊंडेशनमध्ये विक्रम सिंग हे अध्यक्ष म्हणून आहेत की त्यामध्ये बदल झालेले आहेत की त्यामध्ये काय फेरबदल केलेले आहेत . ही चौकशी किंवा ही तपासणी सचिव महोदयांनी केली होती का किंवा आपल्या महानगरपालिकेतर्फे झाली होती का . त्या मिनिट्समध्ये हे पण रेकॉर्डमध्ये आलेले आहे की ते आपण केलेली नव्हती . महापौर मॅडम आम्ही स्वत : पत्र दिलेले आहे मी स्वत: पत्र दिलेले आहे चॅरीटी कमिशनरला १५/०६/२०२० ला त्यांचेकडून मला उत्तर आलेले आहे. ०७/११/२०२० ला उत्तर आलेले आहे त्या उत्तरा मध्ये चॅरीटी कमिशनरचे उत्त र हे आहे महापौर मॅडम की त्यामध्ये अजूनपर्यंत म्हणजे अध्यक्ष की बदली किंवा त्यामध्ये काही बदल झालेला नाही म्हणजे कुठेही प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष ठेकेदार म्हणून ते आहेत . प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष म्हणून त्यांनी तो फायदा घेतलेला आहे. प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष म्हणून त्यांनी त्यांचा जोडाव किंवा त्यामध्ये संबंधित आहेत म्हणून आम्ही ही मागणी केली होती की नगरसेवक फॉर्म भरलेला असेल किंवा नगरसेवक झाला असेल त्यांचा ते फॉर्म किंवा ते नगरसेवक पद असेल असे तुम्ही रद्द करु शकतात प्लस आता जे ढवण मॅडमने सांगितले ऑलरेडी ते आपल्या नियमामध्ये आहेत. महापौर मॅडम ५(२२) खाली अशा नियमामध्ये आहेत. महापौर मॅडम, आयुक्तांनी केलेले शिफारस विचार करुन महापालिकेला सदस्य नामनिर्देशन करील परंतु आयुक्तांनी अशाप्रकारे शिफारस केलेल्या व्यक्तीची शिफारस महापालिकेला अमान्य करायची ठरवल्यास त्या बाबतीची कारणे महानगरपालिकेत नोंद करावी लागतील. महापालिका म्हणजे आयुक्त नाही. ढवण मॅडम, प्रविण पाटील साहेब महापालिका म्हणजे आपली ही सभा तर हे आहेत प्लस हे नियम पण आहेत आता जे धृवकिशोर पाटील साहेबांनी सांगितले की ते प्रोसेडिंगमध्ये आहेत. ज्या दिवशी कमिशनर बरोबर आम्ही बसलो होतो आता जे प्रविण पाटील साहेबांनी सांगितले की आयुक्तांनी डिसीजन दिले ते फाईनल प्रविण पाटील साहेब आयुक्तांनी डिसीजन दिले ते फायनल असतात. पण त्यात सर्वात मोठी महासभा हे त्यावर उच्च आहे . निर्णय ते घेऊ शकतात हे प्रोसेडिंगमध्ये पण आहे आणि आपल्या कायद्यामध्ये पण आहे. त्या प्रोसेडिंगमध्ये हे पण लिहीलेले आहे महापौर मॅडम परत मी रिपीट करतो . तुम्ही जे सांगतील ते आम्ही रेकॉर्डवर घेतलेले आहे . आयुक्तांनी शिफारस केलेल्या उमेदवाराबाबत महापालिका अंतिम निर्णय घेऊ शकते किंवा महापालिका निर्णय रिझर्व्हे ठेऊ शकते. महानगरपालिका म्हणजे महासभा मॅडम महापालिका सुप्रिम आहे हा शब्द प्रोसिडींगमध्ये आहे. तरी सुद्धा यांची काही मागणी असेल आपले विरोधी पक्षनेते किंवा शिवसेना गटनेते त्यांची काही मागणी असेल ह्या विषयावर आयुक्त महोदय याच्यावर खुलासा करावा आणि असे पण आपले महापालिकेत आता नियम नविन ठरलेले आहेत की आम्ही महासभा किंवा परिवहन

किंवा स्थायी समिती ह्यांचा कुठलाही ठराव आपण करतो आणि ते ठराव कोणाच्या आदेशाखाली किंवा कोणाच्या दबावाखाली आयुक्त ते विषय बदलतात किंवा ते विखंडीतसाठी पाठवतात हा आता शेवटच्या ६ महिन्याच्या काळामध्ये भर पूर झालेले आहे . आता हा विषय असा डावलून जाऊ नये आणि ह्याच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी अशी विनंती आहे.

**निलम ढवण :-**

उपमहापौर साहेब, महापौर मॅडम, आपण जे आता म्हणालात की आयुक्त साहेबांवर दबाव म्हणा किंवा कोणाला राजकीय उद्देशाने हे करत आहेत . मी असे म्हणू शकते का मग की आपल्या मेजोरीटीचा आपण गैरफायदा घेता.

**मा. उपमहापौर :-**

| | | | | | | बांधकामे | **गटारे दुरुस्ती** | **300.00** | **292.06** | **50.00** | |

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12** |
| | | | | | | (पृ.क्र.33) | (पृ.क्र.33) | **लक्ष** | **लक्ष** | **लक्ष** | रु.40.**00** लक्ष, व **"तांत्रिक सल्लागार फी"** या लेखाशिर्षाखाली रु.50.**00** लक्ष वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| | | | | | | बांधकामे (पृ.क्र.33) | **गटारावर झाकणे बसविणे** (पृ.क्र.33) | **200.00 लक्ष** | **79.66 लक्ष** | **25.00 लक्ष** | |
| | | | | | | **महसुली शिक्षण विभाग** (पृ.क्र.69) | **शाळा इमारत दुरुस्ती, निगा** (पृ.क्र.69) | **25.00 लक्ष** | **17.81 लक्ष** | **10.00 लक्ष** | |
| | | | | | | **स्मशानभूमी** (पृ.क्र.41) | **स्मशानभुमी / दफनभुमी विकास खर्च / बांधकाम करणे** (पृ.क्र.41) | **100.00 लक्ष** | **99.05 लक्ष** | **40.00 लक्ष** | |
| | | | | | | सार्व. बांधकामे (पृ.क्र.41) | **तांत्रिक सल्लागार फी** (पृ.क्र.43) | **100.00 लक्ष** | **91.64 लक्ष** | **50.00 लक्ष** | |
| **8** | सार्व. बांधकामे | **नविन रस्ते** | **3500.0** | **1200.00** | **2300.00** | **विकास** | **मुख्य** | **150.00** | **150.00** | **75.00** | **'नविन रस्ते/ डी. पी. रोड बांधकाम/** |

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12** |
| | (पृ.क्र.41) | **/ डी. पी. रोड बांधकाम / शासन अनुदान** | **0 लक्ष** | **लक्ष** | **लक्ष** | **आराखडा अंमलबजावणी** (पृ.क्र.46) | **कार्यालय/ प्रभाग कार्यालय फर्निचर व्यवस्था/ इमारत बांधकाम व इतर कामे करणे.** (पृ.क्र.46) | **लक्ष** | **लक्ष** | **लक्ष** | **शासन अनुदान"** या लेखाशिर्षात रु.3500.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2021** पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन **"मुख्य कार्यालय/ प्रभाग कार्यालय फर्निचर व्यवस्था/ इमारत बांधकाम व इतर कामे करणे."** या लेखाशिर्षाखाली रु.75.**00** लक्ष, **"नगरसेवक स्वेच्छा निधी** " या लेखाशिर्षाखाली रु.90.**00** लक्ष, **"सार्व. इमारती/ सिग्नल/ जनरेटर/ लिफ्ट/ कुलर/ सौरदिवे/ स्ट्रीट लाईट विद्युत देखभाल दुरुस्ती (विद्युत दुरुस्ती)"** या |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | **नगरसेवक स्वेच्छा निधी** (पृ.क्र.34) | **1500.00 लक्ष** | **425.07 लक्ष** | **90.00 लक्ष** | |

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12** |
| | | | | | | **विद्युत दुरूस्ती** (पृ.क्र.38) | **सार्व.इमारती /सिग्नल /जनरेटर/ लिफ्ट/ कुलर / सौरदिवे / स्ट्रीट लाईट विद्युत देखभाल दुरुस्ती (विद्युत दुरुस्ती)** (पृ.क्र.38) | **250.00 लक्ष** | **200.06 लक्ष** | **50.00 लक्ष** | लेखाशिर्षाखाली रु.50.**00** लक्ष, **"मार्केट बांधकाम**" या लेखाशिर्षाखाली रु.60.**00** लक्ष, व **'सार्व. शौचालय व मुतारी देखभाल / दुरूस्ती व नुतनीकरण / साफ-सफाई (बांधकाम / आरोग्य)"** या लेखाशिर्षाखाली रु.100.**00** लक्ष वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| | | | | | | बाजारपेठा आणि कत्तलखाने (पृ.क्र.41) | **मार्केट बांधकाम** (पृ.क्र.41) | **50.00 लक्ष** | **50.00 लक्ष** | **60.00 लक्ष** | |
| | | | | | | बांधकामे (पृ.क्र.33) | **सार्व. शौचालय व मुतारी देखभाल /** | **800.00 लक्ष** | **420.43 लक्ष** | **100.00 लक्ष** | |

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| **1** | **2** | **3** | **4** | **5** | **6** | **7** | **8** | **9** | **10** | **11** | **12** |
| | | | | | | | **दुरूस्ती व नुतनीकरण / साफ-सफाई (बांधकाम / आरोग्य)** (पृ.क्र.33) | | | | |
| **9** | नविन विद्युत कामे (पृ.क्र.47) | **सिग्नल यंत्रणा (नविन विद्युत कामे)** (पृ.क्र.47) | **100.00 लक्ष** | **-** | **100.00 लक्ष** | विशेष निधी (पृ.क्र.34) | **नगरसेवक स्वेच्छा निधी** (पृ.क्र.34) | **1500.00 लक्ष** | **425.07 लक्ष** | **60.00 लक्ष** | **"सिग्नल यंत्रणा (नविन विद्युत कामे)"** या लेखाशिर्षात रु.100.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2021** पर्यंत होणारा खर्च पहाता सदर लेखाशिर्षातुन "नगरसेवक निधी" या लेखाशिर्षाखाली रु.60.**00** लक्ष व "प्रभाग समिती निधी क्र.2 या लेखाशिर्षाखाली रु.20.**00** लक्ष वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | **प्रभाग समिती निधी क्र. 02** (पृ.क्र.34) | **120.00 लक्ष** | **55.43 लक्ष** | **20.00 लक्ष** | |
| **10** | विशेष निधी (पृ.क्र.34) | **सौर उर्जा निधी / एल.ई.डी. बसविणे** | **150.00 लक्ष** | **6.83 लक्ष** | **143.16** | विशेष निधी (पृ.क्र.34) | **उपमहापौर स्वेच्छा निर्णय निधी** (पृ.क्र.34) | **125.00 लक्ष** | **-** | **50.00 लक्ष** | **"सौर उर्जा निधी/ एल.ई.डी. बसविणे"** या लेखाशिर्षात रु.150.00 लक्ष एवढी तरतुद असून सदर लेखाशिर्षाखाली **31** मार्च **2021** पर्यंत होणारा खर्च पहाता |

| या शिर्षातुन | | | | | | ह्या शिर्षात | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| अ. क्र. | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | उपलब्ध शिल्लक | प्रधान, गौण व तपशिलवार शिर्ष | बांधकाम विषयक सेवा वगैरे | मुळ अनुदान | आज तारखे पर्यंतचे खर्च | प्रस्तावित वाढीची रक्कम | अभिप्राय |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 |
| | | (पृ.क्र.34) | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | **सभापती, स्वेछा निर्णय निधी** (पृ.क्र.34) | **100.00 लक्ष** | **97.04 लक्ष** | **50.00 लक्ष** | सदर लेखाशिर्षातुन "उप महापौर स्वेच्छा निर्णय निधी " या लेखाशिर्षाखाली रु.50.**00** लक्ष, "सभापती, स्थायी समिती स्वेच्छा निर्णय निधी " या लेखाशिर्षाखाली रु.50.**00** लक्ष व "प्रभाग समिती निधी क्र.2 या लेखाशिर्षाखाली रु.25.**00** लक्ष वर्ग होण्यास मान्यता देण्यात येत आहे. |
| | | | | | | विशेष निधी (पृ.क्र.34) | **प्रभाग समिती निधी क्र. 02** (पृ.क्र.34) | **120.00 लक्ष** | **55.43 लक्ष** | **25.00 लक्ष** | |

वरीलप्रमाणे पुर्नविनियोजन **पत्रकास मान्यता येत आहे.**

**सुचक :- श्री. प्रशांत दळवी** **अनुमोदन :- श्री. ध्रुवकिशोर पाटील**

**ठराव सर्वानुमते मंजूर**

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव** :-

**प्रकरण क्र. 37, महानगरपालिकेचे विविध विभागाचे अभिलेख स्कॅनिंग डिजीटायझेशन करणेकामी खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**धृवकिशोर पाटील** :-

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणे आवश्यक आहे त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका RFP for scanning and digitization of records of Mira Bhaindar Municipal Corporation करणेकामी जुने दस्ताऐवज व 5 वर्ष कालावधीत नविन निर्माण होणारे दस्तावेज स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणेकरी ता M/S. Genius Infotech यांची निविदा 5 वर्षे कालावधीकरीता खालील दराप्रमाणे मंजुर आहे.

| Sr. No. | Particular | Rate per Unit in Rs. (+ GST) |
|---|---|---|
| A | Document Scanning and Digitization Cost | |
| | A4/Legal | 0.61 |
| | A3 | 1.22 |
| | A2 | 1.22 |
| | A1 | 2.44 |

महापालिकेच्या विविध विभागांची दस्ताऐवज स्कॅनिंग व डिजीटायझेशन करावयाचे असल्याने पुढील उर्वरीत कालावधीकरीता रु.2.50 कोटीच्या खर्चास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिल्याने मा. आयुक्त यांचा प्रस्ताव मंजुर करीत आहे असा मी ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी** :-

**माझे अनुमोदन आहे**.

**मा. महापौर** :-

**सन्मा. सदस्य धृवकिशोर पाटील यांनी मांडलेला ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे**.

**प्रकरण क्र. 37 :-**

**महानगरपालिकेचे विविध विभागाचे अभिलेख स्कॅनिंग डिजीटायझेशन करणेकामी खर्चास मंजूरी मिळणेबाबत.**

**ठराव क्र. 28 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका विविध विभागांचे अभिलेख स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणे आवश्यक आहे त्यामुळे मिरा भाईंदर महानगरपालिका RFP for scanning and digitization of records of Mira Bhaindar Municipal Corporation करणेकामी जुने दस्ताऐवज व 5 वर्ष कालावधीत नविन निर्माण होणारे दस्तावेज स्कॅनिंग व डिजीटायझेशन करणेकरी ता M/S. Genius Infotech यांची निविदा 5 वर्षे कालावधीकरीता खालील दराप्रमाणे मंजुर आहे.

| Sr. No. | Particular | Rate per Unit in Rs. (+ GST) |
|---|---|---|
| A | Document Scanning and Digitization Cost | |
| | A4/Legal | 0.61 |
| | A3 | 1.22 |
| | A2 | 1.22 |
| | A1 | 2.44 |

महापालिकेच्या विविध विभागांची दस्ताऐवज स्कॅनिंग व डिजीटायझेशन करावयाचे असल्याने पुढील उर्वरीत कालावधीकरीता रु.2.50 कोटीच्या खर्चास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिल्याने मा. आयुक्त यांचा प्रस्ताव मंजुर करीत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. ध्रुवकिशोर पाटील          अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव** :-

प्रकरण क्र. 38, मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत पोलीस आयुक्तालय व पोलीस उपआयुक्त कार्यालयासाठी जागा भाड्याने देणे व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.

**प्रशांत दळवी** :-

महाराष्ट्र शासन गृहविभागाकडील शासन निर्णय क्र .7316/प्र.क्र.104/पोल-3 दि.13/9/2019 अन्वये मिरा भाईंदर वसई विरार पोलिस आयुक्तालय निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी भाडयाने जागा उपलब्ध करून देण्यासाठी मा . महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता . मा. महासभा दि.31/01/2020 ठराव क्र.97 अन्वये मा. महासभेने पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली . सदर समितीमध्ये आयुक्त , उपमहापौर, सभापती स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, सर्वपक्षीय गटनेते, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांचा समावेश होता. सदर समितीची दि.07/09/2020 रोजी बैठक होऊन खालील निर्णय एकमताने घेण्यात आले.

1) पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी मिरारोड (पूर्व) शांती गार्डन , सेक्टर 5, राष्ट्रसंत आचार्य श्री पद्मसागर सुरश्वरजी भवन ही पूर्ण इमारत रिकामी करुन दोन वर्ष मुदतीसाठी मनपाच्या नियमानूसार भडयाने देण्यात यावी . याबाबत भाडे दराचा करारनामा करण्यात यावा.
2) मिरारोड (पूर्व) कनकीया मधील आरक्षण क्र .249 ही इमारत पोलिस उपआयुक्त कार्यालयासाठी रिकामी करुन दोन वर्ष मुदतीसाठी मनपाच्या नियमानूसार भाडयाने देण्यात यावी याबाबत भाडे दराचा करारनामा करण्यात यावा.
3) पोलिस आयुक्तलयासाठी शासनाने मंजुर केलेल्या आरक्षण क्र .324 मधील 11815 चौमीटर ही जागा पोलिस विभागाने संपादीत करुन सदर जागेवर इमारत बांधण्याने काम तातडीने सुरू करावे.
4) सद्यास्थितीत मिरारोड (पूर्व) शांतीगार्डन, सेक्टर 5 येथील राष्ट्रसंत आचार्य श्री. पद्मसागर सुरश्वरजी भवन इमारतीमधील कार्यालये खालील ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावीत.
5) भाईंदर पश्चिम येथील अपर तहसिलदार कार्यालयासाठी पहिला मजला भाडयाने दिलेला असुन तळ मजल्यावर सेतु करावयाचा असल्याने सदर जागा भाडयाने देण्यात यावी.
6) पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी महानगरपालिकेमार्फत कंत्राटदाराच्या वार्षिक मंजुर दराने सदर कार्यालयातील आवश्यक कामे सुरु करुन कार्यालय तयार करण्यात यावे.
7) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रस्ता रुंदीकरणात नयानगर येथील जुने पोलिस स्टेशन इमारत, भाईंदर (प.) पोलिस स्टेशन समोरील मंदीर , काशिमिरा पोलिस स्टेशन समोरील गोडावुन व कुंपणभिंत बाधित होत आहे . काशिमिरा उड्डाणपुलाखालील काशिमिरा पोलिस स्टेशनची असलेली वाहने , एमआयडीसी येथील ईएसआयसी हॉस्पीटल च्या जागेतील वाहतुक विभागा ची पार्कींग इत्यादी घोडबंदर सर्व्हे क्र . 233 मध्ये शिफ्ट करुन वरील

प्रमाणे सर्व जागा महानगरपालिकेस रिकामी करुन देण्यात याव्यात . याबाबत पोलिस विभागाने त्वरीत कार्यवाही करावी.

8) मा. आयुक्त यांनी वरील प्रमाणे निर्णयाची अंमलबजावणी करावी.

सदर निर्णयानूसार पोलिस आयुक्त व पोलिस उपआयुक्त कार्यालयाकरीता तसेच इतर कार्यालयांना स्थलांतरीत करून जागा उपलब्ध करून देण्यात आलेल्या असून मनपाच्या सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु .49,96,350/- रकमेचे व आयुक्तालय कार्यालयासाठी मंजूर दराने रु.55,07,900/- रकमेचे अंदाजपत्रक करून काम सु रू करण्यात आलेले आहे . सदर अंदाजपत्रकीय खर्चास व आवश्यक तरतुद पुर्नविनियोजना व्दारे उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने घेतलेल्या निर्णयांना कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून निर्णयानूसार पोलिस आयुक्त , पोलिस उपआयुक्त, उप निबंधक सहकारी संस्था , सहदुय्यम निबंधक नोंदणी विभाग , अप्पर तहसिलदार , महसूल निवडणूक कार्यालय या सर्व कार्यालयांना नव्याने दिलेल्या जागेचे शासकीय दराने भाडे आकारण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

डिम्पल मेहता :-

माझे अनुमोदन आहे.

धृवकिशोर पाटील :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब मिरा भाईंदर, वसई विरार पोलिस आयुक्तालय सुरु करण्याबाबत मा. महापौरांच्या अध्यक्षतेखाली आपण एक कमिटी नेमली होती आणि ह्या कमिटीमध्ये आपण काही निर्णय घेतले होते आणि ह्या निर्णयाचा गोषवारा पूर्ण आपण सगळ्या सदस्यांना दिलेला आहे. साहेब ज्याप्रमाणे आपण पोलिस आयुक्तालयाकरिता जागा इमिजिएटली उपलब्ध करुन दिली आणि वॉरफॉर्टी वरती आपण काम केले. जिथे आपली जेवढे वॉर्ड ऑफिसर होते तिथे आपला प्रभाग अध्यक्षाचे ऑफिस होते. त्या लोकांना आपण इमिजिएटली खाली करुन दिले. तिथे आणखीन एक स्टॅम ड्युटीजचे ऑफिस होते त्यांना ही आपण खाली करायला सांगितले इमिजिएटली त्याच्यानंतर गिरीयाचे ऑफिस होते. आपण त्यांनाही खाली केले. त्या लोकांनी रातोरात म्हणजे अख्खा आकाश पाताळ एक करुन आपले सर्व कर्मचारी लावून आपली सगळी कागदपत्र सगळ घेऊन ते दुसरीकडे शिफ्ट झाले. म्हणजे ज्या तत्परतेने त्या लोकांनी काम केले ज्या तत्परतेने आपण काम केले त्याच तत्परतेने पोलिस विभागाने आपण घेतलेले निर्णयाची अंमलबजावणी केली नाही साहेब. ह्याच पोलिस आयुक्तालयाकरिता आपण एक करोड रुपयाचे फर्निचर करण्यासाठी आपण त्याला मंजूरी दिलेली आहे. एवढे असताना सुध्दा आपण काही निर्णय घेतलेले होते त्यात निर्णय हे पब्लिकच्या हिताचे होते जनतेच्या हिताचे होते परंतु त्याची अंमलबजावणी झाली नाही. त्याच्यामध्ये एक निर्णय सांगतो की आरक्षण क्र. 324 मधील 11 हजार 815 चौ.मी. ही जागा पोलिस विभागाने तातडीने घेतली पाहिजे आणि त्याच्यावरती एक अद्यावत चांगले काम हेच आता जर आपण सुरु केले तर येणाऱ्या 2 वर्षामध्ये पोलिस आयुक्तालय होऊ शकते. जर आपण आता जर काम सुरु केले नाही तर हे 2 वर्ष पण होणे इम्पॉसिबल आहे म्हणजे आपली जी वास्तु आपण त्यांना दिलेली आहे ती वास्तु खाली होऊ शकत नाही. त्यानंतर साहेब दुसऱ्या छोट्या गोष्टी होत्या आपण त्यांना सांगितले होते की मिरा भाईंदर महापालिका रस्ता रुंदीकरणामध्ये एक नयानगरची जी पोलीस चौकी आहे. आपण एक त्यांना पोलिस स्टेशन दिले परंतु ती जी पोलिस चौकी रस्त्यामध्ये आहे आणि ती वाहतुकीस अडथळा निर्माण करते ती काढायला पाहिजे पण त्यांनी ती काढली नाही. त्याच्या बदल्यात त्यांना आपण चांगले पोलिस स्टेशन बांधुन दिले. चांगली जागा दिली परंतु ते काढले नाही. त्याचप्रमाणे काशिमिरा पोलिस स्टेशनच्या समोर जी जागा आहे ब्रीजच्या खाली तिथे संपूर्ण गोडाऊन केले आहे. त्यांना आपण सांगितले की ते गोडाऊन तिकडून हटवा त्यातल्या ज्या गाड्या आहेत त्या डिस्पोज करा. त्यासुध्दा त्यांनी अजूनपर्यंत केल्या नाही. आणि त्याच्यामुळे आपले ते काम थांबलेले आहे. त्याचप्रमाणे एम.आय.डी.सी. येथील ई.एस.आय.सी. हॉस्पीटलच्या जागेतील वाहतुक विभागात

जी पार्किंग आहे त्यातले जे गाड्या आहेत त्या गाड्या घोडबंदरचा सव्हे क्र. 233 मध्ये आपण शिफ्ट करायला सांगितले होते. पण ते ही त्यांनी अजून पर्यंत केले नाही. तसेच आपले काशिमिरा रोडवरती एस.के. स्टोनची पोलिस चौकी आहे ती रस्त्याच्यामध्ये येतो ती अगदी कॉर्नरला आहे. त्याच्यामुळे भरपूर ट्राफीक जाम होते. ती सुध्दा आपण त्यांना शिफ्ट करायला सांगितली होती. पण त्याचे ही काम अजून पर्यंत त्यांनी केलेले नाही. तर माझी आपणास विनंती होती की, आयुक्त साहेब महापौर मॅडम आपण इमिजिएटली पोलिस अधिका-यांशी पुन्हा एकदा बैठक लावून आपण ह्याला मंजूरी दिलेली आहे त्यांना सुध्दा सांगा की 4 महिने होऊन गेले आपण निर्णय घेता पण आजतागयात ते काम आपण केले नाही तर हे काम आपण त्वरीत लवकरात लवकर करावे ही विनंती.

मा. महापौर :-

ठिक आहे. आयुक्त साहेब आपण त्यांची लवकरच बैठक बोलवून आपण त्यांच्यासाठी आयुक्तलयासाठी एवढा खर्च करत आहेत. अपेक्षित आहे की महापालिकेची किंवा शहराची जी कामे रखडलेली आहेत किंवा आपण त्यांना सुचवली आहेत ती कामे झाली पाहिजेत यासाठी लवकरात लवकर एक मिटींग आयोजित करुन त्यांना ह्या संदर्भामध्ये सुचना देण्यात याव्यात. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 38 :-**

**मिरा भाईंदर महानगरपालिकेमार्फत पोलीस आयुक्तालय व पोलीस उपआयुक्त कार्यालयासाठी जागा भाड्याने देणे व खर्चास कार्योत्तर मान्यता देणेबाबत.**

**ठराव क्र. 29 :-**

महाराष्ट्र शासन गृहविभागाकडील शासन निर्णय क्र .7316/प्र.क्र.104/पोल-3 दि.13/9/2019 अन्वये मिरा भाईंदर वसई विरा र पोलिस आयुक्तालय निर्माण करण्यास शासनाने मान्यता दिलेली आहे. सदर पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी भाडयाने जागा उपलब्ध करून देण्यासाठी मा . महासभेपुढे प्रस्ताव सादर करण्यात आला होता . मा. महासभा दि.31/01/2020 ठराव क्र.97 अन्वये मा. महासभेने पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यासाठी मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली . सदर समितीमध्ये आयुक्त , उपमहापौर, सभापती स्थायी समिती, सभागृह नेता, विरोधी पक्षनेता, सर्वपक्षीय गटनेते, शहर अभियंता, कार्यकारी अभियंता यांचा समावेश होता. सदर समितीची दि.07/09/2020 रोजी बैठक होऊन खालील निर्णय एकमताने घेण्यात आले.

1) पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी मिरारोड (पूर्व) शांती गार्डन , सेक्टर 5, राष्ट्रसंत आचार्य श्री पद्मसागर सुरश्वरजी भवन ही पूर्ण इमारत रिकामी करुन दोन वर्ष मुदतीसाठी मनपाच्या नियमानूसार भडयाने दे ण्यात यावी. याबाबत भाडे दराचा करारनामा करण्यात यावा.
2) मिरारोड (पूर्व) कनकीया मधील आरक्षण क्र .249 ही इमारत पोलिस उपआयुक्त कार्यालयासाठी रिकामी करुन दोन वर्ष मुदतीसाठी मनपाच्या नियमानूसार भाडयाने देण्यात यावी याबाबत भाडे दराचा करारनामा करण्यात यावा.
3) पोलिस आयु क्तलयासाठी शासनाने मंजुर केलेल्या आरक्षण क्र .324 मधील 11815 चौमीटर ही जागा पोलिस विभागाने संपादीत करुन सदर जागेवर इमारत बांधण्याने काम तातडीने सुरू करावे.
4) सद्यास्थितीत मिरारोड (पूर्व) शांतीगार्डन, सेक्टर 5 येथील राष्ट्रसंत आचार्य श्री. पद्मसागर सुरश्वरजी भवन इमारतीमधील कार्यालये खालील ठिकाणी स्थलांतरीत करण्यात यावीत.
5) भाईंदर पश्चिम येथील अपर तहसिलदार कार्यालयासाठी पहिला मजला भाडयाने दिलेला असुन तळ मजल्यावर सेतु करावयाचा असल्याने सदर जागा भाडयाने देण्यात यावी.

6) पोलिस आयुक्तालय कार्यालयासाठी महानगरपालिकेमार्फत कंत्राटदाराच्या वार्षिक मंजुर दराने सदर कार्यालयातील आवश्यक कामे सुरु करुन कार्यालय तयार करण्यात यावे.

7) मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या रस्ता रुंदीकरणात नयानगर येथील जुने पोलिस स्टेशन इमारत, भाईंदर (प.) पोलिस स्टेशन समोरील मंदीर , काशिमिरा पोलिस स्टेशन समोरील गोडावुन व कुंपणभिंत बाधित होत आहे . काशिमिरा उड्डाणपुलाखालील काशिमिरा पोलिस स्टेशनची असलेली वाहने , एमआयडीसी येथील ईएसआयसी हॉस्पीटल च्या जागेतील वाहतुक विभागाची पार्कीग इत्यादी घोडबंदर सर्व्हे क्र . 233 मध्ये शिफ्ट करुन वरील प्रमाणे सर्व जागा महानगरपालिकेस रि कामी करुन देण्यात याव्यात . याबाबत पोलिस विभागाने त्वरीत कार्यवाही करावी.

8) मा. आयुक्त यांनी वरील प्रमाणे निर्णयाची अंमलबजावणी करावी.

सदर निर्णयानूसार पोलिस आयुक्त व पोलिस उपआयुक्त कार्यालयाकरीता तसेच इतर कार्यालयांना स्थलांतरीत करून जागा उपलब्ध करून देण्या त आलेल्या असून मनपाच्या सदर इमारतीच्या दुरुस्तीसाठी रु .49,96,350/- रकमेचे व आयुक्तालय कार्यालयासाठी मंजूर दराने रु.55,07,900/- रकमेचे अंदाजपत्रक करून काम सुरू करण्यात आलेले आहे . सदर अंदाजपत्रकीय खर्चास व आवश्यक तरतुद पुर्नविनियोजना व्दारे उपलब्ध करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

मा. महापौर यांच्या अध्यक्षतेखाली गठीत समितीने घेतलेल्या निर्णयांना कार्योत्तर मान्यता देण्यात येत असून निर्णयानूसार पोलिस आयुक्त , पोलिस उपआयुक्त, उप निबंधक सहकारी संस्था , सहदुय्यम निबंधक नोंदणी विभाग , अप्पर तहसिलदार , महसूल निवडणूक कार्यालय या सर्व कार्यालयांना नव्याने दिलेल्या जागेचे शासकीय दराने भाडे आकारण्यास देखिल मान्यता देण्यात येत आहे.

सुचक :- श्री. प्रशांत दळवी अनुमोदन :- श्रीम. डिंम्पल मेहता

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर
मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव** :-

प्रकरण क्र. 39, मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (Construction & demolition waste (C & D)) संकलन, वाहतुक पुर्नचक्रीकरण करणे कामांच्या दरांना मान्यता देणेबाबत.

**श्रीप्रकाश सिंग** :-

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम व निष्कासन केलेल्या कचऱ्याचे संकलन , वाहतुक व पुर्नचक्रीकरण करणेचा प्रस्ताव प्रशासनाने मा. महासभेत सादर केलेला आहे.

प्रशासनाने गोषवाऱ्यात नमुद केलेल्या व महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन केलेल्या कचरा निर्माणाच्या वस्तुस्थितीचा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर ठा णे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सीकडे बांधकाम व निष्कासित कचरा देवून पुर्नचक्रीकरण करणेकरीता देणे उचित होणार नाही. तसेच ते नागरीकांच्या व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हिताचे होणार नसुन महानगरपालिकेवर नाहक आर्थिक भुर्दंड पडण्याची शक्यता दिसून येत आहे.

मा. महासभा दि.31/01/2020 ठराव क्र.82 अन्वये सार्वजनिक/ खाजगी भागीदारी तत्वावर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या पध्दतीने सदर प्रकल्प राबविण्यासाठी प्रशासनाने जागा उपलब्ध

करुन प्रकल्प उभारुन प्रक्रिया करावी असा ठराव मंजुर करण्यात आला होता , परंतु प्रशासनास जागा उपलब्ध झाली नाही.

सबब, प्रशासनाने भाडे तत्वावर जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करावी किंवा महापालिकेस घनकचरा प्रकल्पाकरीता शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या जागेत प्रकल्प उभारणेबाबतची कार्यवाही करुन प्रस्ताव तयार करावा व मान्यतेसाठी पुढील मा . महासभेत प्रस्ताव फेरसादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**प्रशांत दळवी :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**मा. महापौर :-**

**प्रकरण क्र. 39, नगरसेवक श्री. मदन सिंग यांनी मांडलेला ठराव सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे.**

**प्रकरण क्र. 39 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन कचऱ्याचे (Construction & demolition waste (C & D)) संकलन, वाहतुक पुर्नचक्रीकरण करणे कामांच्या दरांना मान्यता देणेबाबत.

**ठराव क्र. 30 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात बांधकाम व निष्कासन केलेल्या कचऱ्याचे संकलन , वाहतुक व पुर्नचक्रीकरण करणेचा प्रस्ताव प्रशासनाने मा. महासभेत सादर केलेला आहे.

प्रशासनाने गोषवाऱ्यात नमुद केलेल्या व महानगरपालिका क्षेत्रातील बांधकाम व निष्कासन केलेल्या कचरा निर्माणाच्या वस्तुस्थितीचा संपूर्ण आढावा घेतल्यानंतर ठाणे महानगरपालिकेने नियुक्त केलेल्या एजन्सीकडे बांधकाम व निष्कासित कचरा देवून पुर्नचक्रीकरण करणेकरीता देणे उचित होणार नाही. तसेच ते नागरीकांच्या व मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या हिताचे होणार नसुन महानगरपालिकेवर नाहक आर्थिक भुर्दंड पडण्याची शक्यता दिसून येत आहे.

मा. महासभा दि.31/01/2020 ठराव क्र.82 अन्वये सार्वजनिक/ खाजगी भागीदारी तत्वावर बांधा, वापरा व हस्तांतरीत करा या पध्दतीने सदर प्रकल्प राबविण्यासाठी प्रशासनाने जागा उपलब्ध करुन प्रकल्प उभारुन प्रक्रिया करावी असा ठराव मंजुर करण्यात आला होता , परंतु प्रशासनास जागा उपलब्ध झाली नाही.

सबब, प्रशासनाने भाडे तत्वा वर जागा उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही करावी किंवा महापालिकेस घनकचरा प्रकल्पाकरीता शासनाने उपलब्ध करुन दिलेल्या जागेत प्रकल्प उभारणेबाबतची कार्यवाही करुन प्रस्ताव तयार करावा व मान्यतेसाठी पुढील मा . महासभेत प्रस्ताव फेरसादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. मदन उदितनारायण सिंह अनुमोदन :- श्री. प्रशांत दळवी

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 40, भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १० मधील स्व. इंद्रबहादुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन "अभियान" या सामाजिक संस्थेला देणेबाबत.

**गणेश भोईर :-**

**महापालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या स्व . इंद्रबहादुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन , पुस्तकांची देखरेख व देखभाल योग्य रितीने होत नसल्याने पुस्तक प्रेमींना उपलब्ध पुस्तके वाचावयास मिळत नाही. तसेच वेळोवेळी ग्रंथालयाचे अपग्रेडेशन करणे गरजेचे असते , सध्या कोणत्या विषयांच्या पुस्तकांची मागणी आहे, कोणती पुस्तके उपलब्ध असावीत याबाबतचा सखोल अभ्यास असणे देखील आवश्यक आहे. सद्यस्थितीत ग्रंथालयाच्या व्यवस्थापनेकरीता ग्रंथपाल व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. ग्रंथालय व्यवस्थापनेकरीताही महापालिकेस खर्च होत आहे.**

**उपरोक्त परिस्थीतीचा विचार करुन प्रशासनाने सदर ग्रंथालय व्यवस्थापन करणेकरीता मा . आयुक्त यांनी "अभियान" या सामाजिक संस्थेशी चर्चा विनीमय करुन स्व. इंद्रबहादुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन "अभियान" या सामाजिक संस्थेला नाममात्र भाड्याने दे णेस मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.**

**डिम्पल मेहता :-**

**माझे अनुमोदन आहे.**

**जुबेर इनामदार :-**

**महापौर मॅडम हा विषय कोणाचा आहे. प्रशासनाचा आहे तुमचा आहे सत्ताधाऱ्यांचा आहे.**

**मा. महापौर :-**

**हा विषय अभियान ह्या सामाजिक संस्थेने मागणी केली होती आणि त्यांनी आपल्याला निवेदन केलेले आहे त्यांनी तसे पत्र दिलेले आहे. त्यानुसार हा आपण ह्या सभागृहामध्ये विषय आणला आहे.**

**जुबेर इनामदार :-**

**मालमत्ता पालिकेची आहे. याच्यावर आयुक्तांचा काय अभिप्राय आहे.**

**मा. महापौर :-**

**आपण हा पालिकेच्या आयुक्तांनाच अधिकार दिलेला आहे.**

**जुबेर इनामदार :-**

**हा विषय आयुक्तांकडे गेला नव्हता का फक्त तुमच्याकडेच आला होता का? त्यांनी जी मागणी केली होती पालिकेची मालमत्ता आहे ग्रंथालय असला विषय चांगला असला तरी आयुक्तांचे ह्याच्यावरती मत काय आहे?**

**मा. महापौर :-**

**आयुक्त साहेब ह्यावर आपले काय मत आहे?**

**दिपक खांबित :-**

**मा. महापौरांच्या परवानगीने बोलतो आरक्षण क्र. 120 वाचनालयाचे काम अजून पूर्ण झालेले नाही. त्याला जवळ जवळ 3 ते 4 महिने लागतील प्रशासनाचे मत होते कीती लायब्रारी जी आहे ही आपणच करायला पाहिजे असे आम्ही रिपोर्टींग करुन त्याला आयुक्त साहेबांनी मान्यता दिली होती. तथापी याचा आम्ही गोषवारा दिला नाही. याचा ठराव आल्यानंतर याबाबत आम्ही आयुक्तांकडे सादर करुन त्यांच्या निर्णयानुसार पुढील कारवाई करु.**

**जुबेर इनामदार :-**

**अजून आपली तयारी नाही. ग्रंथालय तयार नाही. खांबित साहेब वास्तू अजून तयार झालेली नाही. महापौर मॅडम आमच्या कोकणामध्ये एक म्हण आहे. म्हैस नाही तर गारगा सुरुवात अजून व्हायची आहे अजून ठिकाणा नाही आणि हा गारगा तयार केला तुम्ही हे काय चाललयं. याची लोणी खाण्याची तयारी आहे का? आयुक्त महोदय हे काय चालले आहे. पालिका कोणाची लोणी तुम्हीच खात आहेत. कुठल्यातरी ह्याला देत आहेत. आता तो पालिकेची मालमत्ता त्याचे धोरण काय असणार. त्याचे शुल्क काय आकारेल. त्याची काय पध्दत असेल. त्याचा स्वतःचा किती अनुभव आहे असे हे ग्रंथालय चालण्याचे याचे आधी संशोधन**

लावावे लागेल. ते मागणी करायच्या आधी आपण देऊन मोकळे आयुक्त महोदयांना माझी विनंती आहे एकतर प्रथमतः प्रशासनाचा ठराव गोषवारा नाही. म्हणजे हा विषय चर्चेला येऊ शकत नाही. कारण तुम्ही स्वतः ठरवले. सत्ताधाऱ्यांनी हे आमचे आम्ही ह्याला काही करु पालिकेची मालमत्ता पालिकेची मालमत्ता निर्णय घेणारे तुम्ही.

**मा. महापौर :-**

आपण विषय आणू शकतो.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही आणू शकता आणि बहुमताने पहिले तर करु शकता. आयुक्तांना अधिकार आहे. 451 अंतर्गत विखंडीत करुन घेतील. महापौर मॅडम पालिकेचे मालमत्तेचे विश्वस्त कोण तुम्ही आणि मी.

**मा. महापौर :-**

नक्की.

**जुबेर इनामदार :-**

कोणाच्यातरी स्वाधीन करुन टाकायचे. आजपर्यंत जितके स्वाधीन केले ना त्याची परिस्थिती आपल्या डोळ्याच्या समोर आहे. लक्षवेधीने शिवारगार्डन दिले त्याची काय परिस्थिती झाली. शाळा दिल्या त्याची काय परिस्थिती झाली.

**मा. महापौर :-**

ठराव झालेला आहे. तुम्ही त्याला मान्यता द्या नाहीतर तुमचा ठराव करा.

**जुबेर इनामदार :-**

या विषयाला गोषवाराच नाही तर ठराव काय करणार. गोषवाराच दिला नाही त्याच्यावर काय चर्चा करणार. पालिकेची मालमत्ता भाडे तत्वावर द्यायची असेल काही करायचे असेल कुठल्या संस्थेला द्यायचे असेल त्याच्यावर चर्चा झाली पाहिजे. प्रशासनाचा त्याच्यावर गोषवारा पाहिजे. त्यांची सही पाहिजे. मनाला वाटेल तसे करायचे. ते कसं शक्य आहे. आयुक्त महोदय माझी आपणास विनंती आहे एकतर प्रथमतः याचा गोषवारा नाही तुम्हाला मी थोडस इतिहासात घेऊन जातो आमच्याकडे अच्युत हांगे आयुक्त होते. त्यांनी परिपत्रक काढले होते. कुठलाही गोषवारा प्रशासनाचा नसला तर विभागीय अधिकाऱ्याने त्याच्यावर कारवाई करायची नाही आणि त्या आयुक्ताने मर्दासारखे व्यासपिठावरुन त्यांनी आवाहन केले होते की अशा कुठल्याही विषयाला ज्याचा गोषवारा प्रशासनाचा नसणार आम्ही कारवाई करणार नाही आणि ते ठामपणे त्या विषयावर राहिले. आम्हाला तुमच्याकडून तशीच अपेक्षा आहे साहेब. अशा विषयांना तुम्ही जुमानणार नाहीत अशा विषयांना ज्याच्यावर प्रशासनाचा गोषवारा नाही.

**मा. महापौर :-**

गणेश भोईर साहेब यांनीजो ठराव मांडलेला आहे त्याच्यामध्ये त्यांनी स्पष्टपणे म्हटलेले आहे की मा. आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे. आयुक्तांच्या अधिकाराशिवाय कोणी काही करु शकणार नाही.

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही काय कोणत्या कोपऱ्यामध्ये कोणाला गुळ लावण्यासारखा विषय केला काय. कुठल्या तरी संस्थेला फक्त त्यांना खुश करण्यासाठी.

**मा. महापौर :-**

कसले गुळ आणि कसले.............

**जुबेर इनामदार :-**

तुम्ही काहीतरी कोणाला खुश करण्यासाठी केलेला आहे याचा अर्थ तोच झाला.

**मा. महापौर :-**

ह्या संस्थेने आपल्याला निवेदन दिले त्या निविदनानुसार आपण ह्या सभागृहात......

**जुबेर इनामदार :-**

**निवेदन दिले तर आयुक्तांकडे दिले पाहिजे आणि आयुक्तांनी निर्णय घेतला पाहिजे.**

**मा. महापौर :-**

**ठराव झालेला आहे तुम्हाला ठराव मांडायचा आहे का?**

**जुबेर इनामदार :-**

**ठराव करायला काय जातो. आम्ही करु ठराव चार पानाचा ठराव दोन मिनिटात बनवून आणतो. माझा चार पानाचा ठराव आहे मी वाचायला घेतो.**

**गिता जैन :-**

**महापौर मॅडम हा एक आपल्याला महासभेची पध्दत होती की, जोपर्यंत गोषवारा येत नाही तोपर्यंत आपणतो विषय महासभेत घेणार नाही. एकतर गोषवारा नाही. आणि दुसरी डिटेल्स पण दिलेली नाही. त्या संस्थेने त्या ग्रंथालयाला सांभाळायचे असेल पण ते कसे सांभाळणार. काय करणार त्याची डिटेल्स काय आहेत त्याचा खर्च काय आपण त्यांना काय अटीशर्तीवर देतो कारण बहुतेक वास्तु अशी झाली आहेत की आपण ज्यांना ज्यांना दिली आहेत त्यांनी ते ते त्याचे बरोबर पालन केले नाही असे सांगितले तरी चुकीचे होणार नाही. कारण आपण वास्तु आपल्या विश्वासाने देतो की आपली ही संस्था खुप चांगले करणार. पण त्या संस्थेने त्यानंतर चांगले करणार. पण त्या संस्थेने त्यानंतर तिथे मोनोपॉली काढून मग ते मैदान असो किंवा दुसरी वास्तू असो अजूनपर्यंत आपण ज्या ज्या संस्थांनी हे दिलेले आहे. मी सांगत नाही ही संस्थाही तशीच असेल पण डिटेल्स तोपर्यंत आम्हाला भेटत नाही अंधारात आम्ही काही सांगु शकत नाही मॅडम तुम्हाला विनंती राहणार की आम्हाला पहिला डिटेल्स द्या ही संस्था कशाप्रकारे ते ग्रंथालय करणार आणि त्यानंतर काय सुविधा आपल्याला ते उपलब्ध करुन देणार किंवा त्या ग्रंथालयामध्ये स्टूडंटला काय देणार किंवा सिनियर सिटीझनला काय देणार काय सोई सुविधा उपलब्ध करुन देणार ही सगळी डिटेल्स जोपर्यंत त्या संस्थाने आपल्याला दिली नाही मला वाटते ते चुकीचे होणार काही निर्णय घ्यायचे अशी कित्येक तरी संस्थाचे आवेदन येत असते. त्यांनाही प्रोटोकॉल प्रमाणे आयुक्तांना ते देऊन त्यांनी काय काय द्यायचे त्यांनी इच्छा आहे किंवा कसे करणार ते द्यायची गरज होती आणि मला असे वाटते त्यांच्याकडून पूर्ण डिटेल्स मागवून पुढच्या सभेत हा विषय घ्यावा. जेणेकरुन आम्ही पण त्यात निर्णय देऊ शकू आणि जर संस्था खूपच चांगले करायला बघते तर त्यांच्याशी ही अन्याय होणार नाही आपण सर्वांनी मिळून ते निर्णय केला तर ते बर राहील असे मला वाटते.**

**निलम ढवण :-**

**महापौर मॅडम ठेकेदार हा विषय महापालिकेला अत्यंत प्रिय आहे. असे वाटायला लागले. प्रत्येक विषयामध्ये प्रत्येक जिथे जिथे पूर्वी हेच सगळे काम महापालिकेच्या अंतर्गत चालत होते परंतु आता जर आपण त्याचा हिशोब काढला तर महापालिकेच्या प्रत्येक विभागामध्ये ठेकेदार नेमले गेले आहेत आणि फायदा ठेकेदारांचा आणि बाकीच्या काही गोष्टी म्हणजे जे शहराला विकासासाठी पाहिजे किंवा काम होण्यासाठी तो उद्देश महापालिकेचा असतो असे दर्शवले जाते. तर तो विषय नक्कीच अस्तित्वात येतोय का आणि दुसरी गोष्ट आता ह्या सगळ्यांनी आपले मत मांडलेले आहे. त्या विषयाशी मी देखील सहमत आहेच. परंतु माझे असे म्हणणे आहे आयुक्त साहेब की ही महापालिका पूर्णतः ठेकेदारांच्या हातात सोपवू नये पूर्ण शहराचे वाटोळे होईल जे मिळते ते देखील महापालिकेला मिळणार नाही हे सगळे ठेकेदार खाऊन मोकळे होतील आणि नंतर आपण त्याच्यावर ऑब्जेक्शन घेत राहणार विषय मांडत राहणार. विषयावर चर्चा करत राहणार दिवस संपला की आम्ही घरीगेलो. याच्यातून काही निष्पन्न होणार नाही. जर खरोखर चांगले असेल शहराच्या विकासासाठी असेल शहराच्या फायद्यासाठी असेल तर नक्की तुम्ही तिथे करा. परंतु तुमची दिशा काय आहे नियमावली नियम अटीशर्ती काही समोर न ठेवता अशा पध्दतीने जी वास्तु झालीच नाही त्याच्या संदर्भात आताच तुम्ही जाहिर करता. सगळ्या नगरसेवकांना कुठेतरी त्यांची दिशाभूल झालेली आहे त्यांना कुठच्या कडून ती माहिती कळत नाही. तर ह्या गोष्टी अशा कुठेतरी होऊ नये मला वाटते आता सगळ्या**

डिपार्टमेंटमध्ये ठेकेदार जर नेमलेत तर मला वाटते पालिकेचा जेवढा स्टाफ आहे त्यांना आता काही कामे उरलेली नसतील. आयुक्त साहेब ह्या गोष्टीचा पूर्ण विचार विनिमय करा आणि प्रत्येक जिथे जिथे ठेकेदार नेमले आहेत तिथे तिथे काय चालले आहे याची देखील शहानिशा पण आपण करावी. त्यामुळे हा विषय रितसर नियम आणि अटीशर्तीते आपल्याला काय देणार आहेत काय करणार आहेत त्या बदल्यात ते काय घेणार आहेत. जे काही सर्व अटीशर्ती सहीत हा प्रस्ताव गोषवारा सादर करावा आणि त्यानंतरच हा विषय पुढच्या महासभेत घेण्यात यावा ही आपल्याला विनंती आहे.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या जैन मॅडम, सन्मा. सदस्या ढवण मॅडम, जुबेर इनामदार जी आपण आपल्या पध्दतीने ह्या ठिकाणी सुचना केलेल्या आहेत. परंतु मला असे वाटते सन्मा. सदस्य गणेश भोईर साहेब आणि अनुमोदन डिम्पल मेहता मॅडमने दिलेले आहे. ह्या संस्थेला काम द्यायचे नाही द्यायचे कशा पध्दतीने द्यायचे आहे या सर्वांचा अधिकार आयुक्तांना दिल्याचा ठराव तो आहे. त्याच्यामुळे तुम्हाला असे वाटते की तो ठराव चुकीचा आहे किंवा तुम्हाला आणखीन वेगळा ठराव मांडायचा असेल तर तुम्ही मांडा.

जुबेर इनामदार :-

आम्हाला कसे समजेल हे चुकीचे आहे की नाही गोषवाराच दिला नाही.

निलम ढवण :-

महापौर मॅडम आपण पण ह्या सभागृहाचा फार वर्षापासूनच्या सदस्या होत आलेल्या आहेत. त्यामध्ये जो ठराव याच्यापूर्वी ह्याच सभागृहामध्ये झालेला मा. आयुक्त अच्युत हांगे साहेबांनी जो मागे घेतला होता त्यानुसार आतापर्यंत सगळ चालत आलेले आहे. काही गोष्टींमुळे आपण देखील त्याला सहकार्य आम्हाला केलेले आहे. सगळ्यांनाच गोषवारा नसेल तर तो विषय पुढच्या महासभेत घेतला गेलेला आहे. आतापर्यंत मग आता घाई काय आहे की बाबा आताच आपल्याला ते करायचे आहे आणि तुम्ही आम्हाला विरोधकांचा ठराव मांडायला सांगता.

मा. महापौर :-

ढवणताई आपण आयुक्त साहेबांनाच अधिकार दिले आहेत. आयुक्त पाहतील. त्याच्यामध्ये काय आहे आणि तसे वाटले तर परत आपण चर्चेला हा विषय घेऊया. आता आपण त्यांना मान्यता देऊ. पुन्हा चर्चेला विषय घेऊया. त्या ठरावामध्ये आपण अधिकार आयुक्तांना दिलेले आहेत आपल्याकडे नाही.

निलम ढवण :-

महापौर मॅडम मान्यता दिल्यानंतर आपण चर्चा काय करणार आहोत त्याच्यावर.

प्रशांत दळवी :-

महापौर मॅडम आयुक्तांना अधिकार दिले आहेत आयुक्त पूढे निर्णय घेतील.

निलम ढवण :-

ठिक आहे.

जुबेर इनामदार :-

आयुक्तांना अशी सुचना करा की हा विषय तुम्ही याच्यावरती अभ्यास करा. चौकशी करा आणि हा परत विषय महासभेसमोर सादर करा अशी तुम्ही सुचना करु शकता का तर करा.

मा. उपमहापौर :-

महापौर मॅडम ऑलरेडी त्या ठरावामध्ये म्हटलेले आहे.

जुबेर इनामदार :-

महासभेसमोर सादर करा.

**मा. उपमहापौर :-**

**महापौर मॅडम जुबेर भाई ॲड कर रहा हूँ ऑलरेडी ठराव के अंदर लिखा हुआ है बोला हुआ है अगर आयुक्तको ऐसा लगता है की वापीस से लाना है तो लेके आयेंगे विषय खतम।**

**निलम ढवण :-**

**उपमहापौर साहेब तुमचे वाक्य आठवण करुन देते उद्या कदाचित आयुक्तांवर नाही तरी प्रेशर आला दबाव आला आणि त्यांनी त्यादबावाखाली त्यांनी ते केले तर आयुक्तांना अधिकार देता खर पण आयुक्तांवर उद्या कोणाचे तरी प्रेशर आलं असे नको व्हायला. असे मी म्हणाले.**

**मा. उपमहापौर :-**

**ढवण मॅडम पुढचा विषय येणार आहे. त्यामध्ये कळेल की आमच्या आमचा आयुक्तांना किती प्रेशर येतो आणि हे आम्हाला ठावुक आहे आपले आयुक्त जी एकदम शंभर टक्के जेंटलमन माणूस आहेत.**

**जुबेर इनामदार :-**

**आयुक्तांचा या विषयावर काय अभिप्राय आहे आयुक्तांना त्याचे निवेदन करु द्या.**

**मा. आयुक्त :-**

**आपल्याकडे हा जो विषय आला होता की ग्रंथालयाचे व्यवस्थापन द्यायचे तर आज रोजी ग्रंथालयाची बिल्डींग झाली नसल्यामुळे हा गोषवारा प्रशासनाला देण्यात आलेला नाही आणि जी काही चर्चा आता झाली त्याच्या नुसार जो अधिकार दिलेला आहे त्याचे पूर्णतः गोष्टी तपासून पॉझीटिव्ह निगेटीव्ह लक्षात घेऊन किंवा आपल्या इथले जे ज्या काही हिस्ट्री झाल्या त्या लक्षात घेऊन पालिकेच्या हितानुसार डिसीजन घेतले जाईल.**

**मा. महापौर :-**

**बरोबर.**

**निलम ढवण :-**

**धन्यवाद साहेब.**

**मा. महापौर :-**

**प्रकरण क्र. 40, सन्मा. गणेश भोईर साहेब यांनी मांडलेला ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात येत आहे. सचिव साहेब पुढचा विषय घ्या.**

**प्रकरण क्र. 40 :-**

**भाईंदर (पूर्व) प्रभाग क्र. १० मधील स्व. इंद्रबहादुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन "अभियान" या सामाजिक संस्थेला देणेबाबत.**

**ठराव क्र. 31 :-**

महापालिकेतर्फे उभारण्यात आलेल्या स्व . इंद्रबहादुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन , पुस्तकांची देखरेख व देखभाल योग्य रितीने होत नसल्याने पुस्तक प्रेमींना उपलब्ध पुस्तके वाचावयास मिळत नाही. तसेच वेळोवेळी ग्रंथालयाचे अपग्रेडेशन करणे गरजेचे असते , सध्या कोणत्या विषयांच्या पुस्तकांची मागणी आहे, कोणती पुस्तके उपलब्ध असावीत याबाबतचा सखोल अभ्यास असणे देखील आवश्यक आहे . सद्यस्थितीत ग्रंथालयाच्या व्यवस्थापनेकरीता ग्रंथपाल व आवश्यक कर्मचारी वर्ग उपलब्ध नाही. ग्रंथालय व्यवस्थापनेकरीताही महापालिकेस खर्च होत आहे.

उपरोक्त परिस्थीतीचा विचार करुन प्रशासनाने सदर ग्रंथालय व्यवस्थापन करणेकरीता मा . आयुक्त यांनी "अभियान" या सामाजिक संस्थेशी चर्चा विनीमय करुन स्व . इंद्रबहादुर सिंह ग्रंथालयाचे व्यवस्थापन "अभियान" या सामाजिक संस्थेला नाममात्र भाड्याने देणेस मा . आयुक्त यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्री. गणेश भोईर     अनुमोदन :- श्रीम. डिंम्पल मेहता

ठराव सर्वानुमते मंजूर

**सही/-**

**महापौर**

**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**नगरसचिव :-**

**प्रकरण क्र. 41, महानगरपालिकेच्या स्व. इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये आत्यावश्यक सेवेकरीता NICU कार्यान्वीत करणेबाबत.** ह्या विषया संदर्भात प्रशासनाकडून पत्र प्राप्त झालेले आहे की याबाबत मा. महासभा दि. 07/06/2019 ठराव क्र. 22 अन्वये ह्यापूर्वीच ह्या कामाच्या संदर्भात मान्यता दिलेली असून काम प्रगती पथावर आहे करीता हा विषय वगळण्यात यावा असे पत्र प्रशासनाकडून सचिव कार्यालयाला प्राप्त झालेले आहे.

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम आता सचिव महोदय म्हणाले की ह्याच्या आधारावर हा ठराव झालेला आहे प्रशासनाने पानक्र. 66 कोणी खुलासा केले ह्या संदर्भातला.

**मा. उपमहापौर :-**

दळवी साहेब तुम्हाला परत एक निवेदन आहे तुमच्या आजूबाजूला जे माईक चालू आहेत त्यांना सगळ्यांना बंद करायला लावा.

**मा. महापौर :-**

सचिव साहेब पत्र वाचून दाखवत आहे. (पत्र वाचून दाखवणे.)

**प्रशांत दळवी :-**

महापौर मॅडम वैद्यकिय अधिकारी यांनी जो खुलासा केलेला आहे त्यामध्ये ते म्हणतात एन.आय.सी.यू. हे कार्यान्वित करता येतणार नाहीत. एस.एन.सी.यू. आणि एन.आय.सी.यू. याचा फुल फॉर्म जरा सांगा. याचा जरा अर्थ सांगा काय आहे. एस.आय.सी.यू. आणि एन.आय.सी.यू. आपण जो ठराव केला आहे की 07/06/2019 तो एस.आय.सी.यू. साठी आहे आणि त्यामध्येच आपण हे एन.आय.सी.यू. ॲड करा असे आपले म्हणणे आहे मग प्रॉब्लेम कुठे येत आहे. त्यांनी तो ठराव बघितला का?

**संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-**

आदरणीय महापौर मॅडम आणि सन्मा. सदस्य एस.एन.यू.सी म्हणजे स्पेशल न्यू बॉनकेअर युनिट आणि एन.आय.सी.यू. म्हणजे न्यू ओनेटल इन्टेन्सीव्ह केअर युनिट ह्या दोन्हीमध्ये एकच डिफरन्स आहे.

**प्रशांत दळवी :-**

मला सांगा दि. 07/06/2019 ला सिक न्यु बॉनकेअर युनिट हा शब्द टाकलेला आहे. तर हा चुकीचा आहे का?

**संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-**

तो शब्द चुकीचा नाही. आपल्याला एस.एन.सी.यू साठी आपला ठराव मंजूर होता. त्यादृष्टीने ज्यावेळेला तिसऱ्या मजल्याचे बांधकाम होईल त्यानुसार आपला एस.एन.सी.यू तिथे चालू करायचे आहे.

**प्रशांत दळवी :-**

एन.आय.सी.यू ला काय प्रॉब्लेम आहे.

**संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-**

एन.आय.सी.यू. जे आहे हे करसरी केअर युनिट आहे. याच्यामध्ये मेडिकल कॉलेजेस आहेत किंवा टीचींग इन्स्टीट्युट आहेत. त्याठिकाणी हे चालते आणि तिथे न्युनेटॉलॉजिस्ट तशाचे गरज आपल्याला भासते आणि आपल्याकडे न्यूनेथॉलॉजिस्ट हे उपलब्ध होत नाहीत. ज्या ठिकाणी मेडिकलकॉलेज असतेतिथे 24 हवर्स हे न्युरोलॉजिस्ट उपलब्ध असतात आणित्या बालकांचे तिथे उपचार चांगल्याप्रकारे होऊ शकतात.

प्रशांत दळवी :-

सर मग आपण काय म्हणतो की आपल्याकडे ह्या एन.आय.सी.यू. कार्यान्वीत होऊ शकत नाही असे आपले म्हणणे आहे.

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

करायचेच असे आपण ठरवले तर आपण करु शकतो. पण ह्यामध्ये आपण जे न्युनेटोलॉजिस्ट आणि एन.आय.सी.यू. करायचे याच्यामध्ये म्हणतो एन.आय.सी.यू साठी जी बालकांची गरज असते तर एक हजार बालकांचा ज्यावेळी जन्म आपल्याकडे होतो त्यामध्ये 2 ते 3 बालकांना आपल्याला एन.आय.सी.यू. ची आवश्यकता वगैरे भासते.

प्रशांत दळवी :-

ठिक आहे ॲग्री पण त्याकरिता डॉक्टर साहेब आपल्याला आज आपल्याकडे ती व्यवस्था नसल्यामुळे मुंबईच्या ठिकाणी हलवण्यात येते. त्याठिकाणी ते उपचार आपल्याकडे दिले जात नाही. मग जे उपचार दिले जात नाही ती जरी यंत्रणा आपण इकडे कार्यान्वित केली तर प्रॉब्लेम कुठे येणार आहे.

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

सर आपल्याला जो मेडिकल स्टाफ त्यासाठी लागायचा आहे......

प्रशांत दळवी :-

सर आपण मेडिकल स्टाफ बद्दल बोलत आहेत तर आपण खाली इथे जो दि. 07/06/2019 चा ठराव आहे त्यामध्ये आपण पद भरतोय. बघा बालरोगतज्ञ एक आहे, वैद्यकिय अधिकारी एम.बी.बी.एस, वैद्यकिय अधिकारी 4 बी.ए.एम.एस, परिसेविका एक, अधिपरिचारिका 12, संगणक चालक, कक्ष सेवक, सफाई कामगार अशा पध्दतीने आापण 29 पदे याठिकाणी भरतो. असे शासनाकडे आपण मंजूरीकरिता पाठवणार होतो. असे तुम्ही त्या ठरावामध्ये मेन्शन आहे. दि. 07/06/2019 च्या मग कुठे अडलं आणि का पाठवला नाही हा दि. 07/06/2019 चा ठराव आपण म्हणता हा ठराव झालेला आहे तर मग हा का नाही पाठवला ठराव?

संभाजी वाघमारे (मा. उपायुक्त) :-

7 जून 2019 चा जो ठराव आहे तो एस.एन.सी.यू. साठीचा ठराव आहे आणि तो स्टाफची जी रिक्वायरमेंट सांगितलेली आहे ती एस.एन.सी.यू. साठी ची रिक्वायरमेंट आहे ज्यावेळेला आपण एस.एन.सी.यू. स्थापन करु त्याच्यापेक्षा आपल्याला डबल स्टाफ तिथे लागतो आणि आपले एक्स्पेंडीचर जे आहे ते पण त्यानुसार आपले वाढणार.

प्रशांत दळवी :-

आयुक्त महोदय, महापौर मॅडम मला असे म्हणायचे आहे आपण हे पदनिर्मिती शासनाकडे हा प्रस्ताव अजूनपर्यंत वर्ष होऊन गेले पाठवलेला नाही. माझी आपणांस विनंती आहे त्यामध्ये एस.एन.सी.यू. ॲड करुन घ्यावं आयुक्त महोदय जरी स्टाफ वाढला तरी चालेल परंतु मिरा भाईंदरच्या नागरिकांना हा एस.एन.सी.यू. बद्दल जे मुंबईला जावे लागते तो प्रॉब्लेम येऊ नये अशी माझी विनंती आहे महापौर मॅडम आणि म्हणून आपण हा जो काही ठराव करतो महापौर मॅडम याच्यामध्ये आपण तेच म्हणतो की गेल्या वेळेला जो दि. 07/06/2019 चा ठराव आणि एस.एन.सी.यू. चा आज जो विषय आपण आणला आहे तो त्यामध्ये ॲड करुन घ्यावे आणि पुढील महासभेत फेर सादर करावा.

रोहिदास पाटील :-

महापौर मॅडम सभागृहाला विनंती करतो महापौरांनाही विनंती करतो, आयुक्तांनाही विनंती करतो आपण ज्यावेळी ठराव महासभेसमोर आणतात. त्यावेळी आयुक्तांकडे उत्तर मला अधिका-यांकडे उत्तर हा जो मॅसेज शहरामध्ये जातो तो अत्यंत दुर्दैवी आहे. आमा असा अनुभव म्हणून त्या कामाकाजामध्ये प्रगती होणे गरजेचे आहे. आयुक्त साहेब आपण आय.ए.एस. ऑफीसर आहात. त्यामुळे समाज पूर्ण आपल्याकडे अत्यंत आशेने पाहत आहे की आता आम्हाला आय.ए.एस. ऑफिसर मिळाले आहेत. त्यामुळे ते तज्ञ आहेत,

कार्यक्षम आहेत. लोकाभिमुख कामामध्ये त्यांना रुची आहे असा मॅसेज जायला पाहिजे. सभागृहामध्ये दोन्ही बाजूची जी मते मांडली जातात. दोन्ही तीन्ही चारही ठरावावर जी चर्चा झाली त्या चर्चेमध्ये शहराचे भले आहे. असे प्रश्न आहेत किंवा कोणला अडचण आहे असे प्रश्न लोकांपर्यंत किंवा पत्रकारांपर्यंत जातो. माझी महापौरांना विनंती आहे सभागृह नेत्याला विनंती आहे, आयुक्तांनाही विनंती आहे की ज्यावेळी विषय येतात त्याचे गांर्भियाने अभ्यास करुन तसे विषय आणले पाहिजेत आणि भुमिका ही मांडते वेळी तुम्ही स्पष्ट भुमिका मांडली पाहिजे. जसे मगाशी सांगितले की हांगे साहेबांनी तो विषय मांडला होता आयुक्त साहेब नियमात असेल तर त्याचे तुम्ही पुर्नविचार करा आणि तुम्ही ठोस उत्तर द्यायला पाहिजे. तेच गावाला अपेक्षित आहे. अन्यथा परत ही सभा होते जाते गोंधळ माजतोय हे फार चांगले नाही असे मी माझे व्यक्तिगत मत मांडतो धन्यवाद.

गिता जैन :-

महापौर मॅडम, आयुक्त साहेब तुमच्या मताशी मी सहमत आहे. पण आपल्याकडे बोरीवली आणि खार इथे प्रायव्हेट एस.एन.सी.यू. चालत आहेत. मग तिथेही ते मॅनेज करत आहेत. मला माहित आहे हे थोडेसे डिफिकल्ट जॉब आहे आणि सर्वांना ते पॉसिबल नसते. साहेब जर आपल्याला इंदिरा गांधीमध्ये नसेल तरी आपल्या भिमसेन जोशीमध्ये पण ते उपलब्ध होत असेल तर इथे गरीब जनतेला एस.एन.सी.यू. ची गरज आहे. सिरियसली तो विचार करा आणि मला वाटते 10 तर 10 मला माहित आहे तुम्ही हजारमध्ये 10सांगितले तर आपली अर्धी वस्ती म्हणजे 4-5 लाख वस्ती आहे. महिलांची आणि आपले ते विचार करा जे आपण एस.एन.सी.यू. बॉम्बेला पाठवतो एस.एन.सी.यू. पेशंट तो जरा एक नंबर काढून जर आपल्याला 10 एवढे पण करता आले तर मला वाटते इथली जनतेला एक हेल्प राहणार साहेब तुम्ही एक डॉक्टर म्हणून आणि एक आयुक्त म्हणून त्याबाबतीत पॉझिटिव्हली विचार करा इंदिरा गांधी इथे नाही मी ही ते मान्य करते. कदाचित एस.एन.सी.यू. एवढे सोपे नाही. 24 हवर्स तीन डॉक्टर आणि आपल्याकडे ते पदनिर्मिती झालेली नाही. पण आपण जर विचारच केला नाही आपल्या शहराला हे काही पाहिजे तर कधीच होणार नाही आणि आता आपल्याकडे ते कुठेही होऊ शकते आणि कुठे आपण ते करु शकतो त्या बाबतीत पॉझिटिव्हली प्रयत्न करा अशी माझी विनंती आहे.

जुबेर इनामदार :-

महापौर मॅडम, आयुक्त महोदय हा विषय खरतर डॉ. विजय राठोड साहेबांचा. साहेब तुमच्या समोर सुंदर विषय आलेला आहे साहेब. एन.एस.एन.सी.यू. करा, एस.एन.सी.यू. करा मशीन सुध्दा घ्या. कॅच लॅब तयार करा. एम.आर.आय. सीटी स्कॅन हे सगळ काही करा करता ना. म्हणजे हा विषय तुम्ही दिलेला नाही तुम्हाला खरतर दोष दिलाच नाही पाहिजे. महापौर मॅडमने हा विषय म्हणजे सत्ताधाऱ्यांनी हा विषय आणलेला आहे. काय विचार करुन मला त्याची कल्पना नाही. एस.एन.सी.यू. हा विषय आपल्या विचाराच्या पलीकडचा आहे. महापालिकेला तरी आणला ठिक आहे. हरकत नाही. विषय चांगला आहे विचार चांगले आहेत. कल्पना चांगली आहे. मी याला कल्पना बोलणार कारण हे स्वप्न आहे. मात्र साहेब ते कमीत कमी इंदिरा गांधी रुग्णालय जो मुझफ्फर हुसेनच्या आमदार निधीतून तयार झालं आहे सध्या एकमेव हॉस्पीटल आहे जो जनरल हॉस्पीटल आहे. टेंभामध्ये आपण कोविड सेंटर केल्यामुळे लोकांची गर्दी तिथे पाठवली. एक्स रे मशीन बंद आहे. दोन डायलेसिस मशीन बंद आहेत, लिफ्ट बंद आहे, हऊस किपींगचा ठिकाणा नाही. साहेब लेबर बेडमध्ये सर्वात जास्त तिथे डिलीव्हरीज होत आहेत. बेड कमी पडत आहेत त्याच्यावरती कोणी चर्चा करत नाही. एस.एन.सी.यू., एन.एन.सी.यू. ठिक आहे साहेब याच्या पलीकडे तुम्हाला काय जाऊन पाहिजे ते करा आपल्याकडे अजून बरेच काही करता येईल साहेब ते करा. मात्र सध्या जी आपण वास्तु तयार केली होती त्याला जी सोय दिली पाहिजे लोकांना गोरगरिब माणूस साहेब तिथे उपचारासाठी आल्यानंतर त्याला एक्स रे काढायला लोक नाही. पॅथोलॉजीचे लॅब मशीन बंद आहेत. आपण साहेब अजून स्पॉट पध्दतीने करतो. एलायझाची मशीन आपल्याकडे नाही हे तुम्हाला अंतर समजत असेल. पॉट ॲनॅजस, स्पॉट पॅथोलाजी आणि ऐलायझा आपण ऐलायझा पध्दतीने करत नाही. आपण स्पॉट पध्दतीनेच करतो. साहेब तिथे पॅथोलॉजी

कदाचित डॉक्टर आमचे दुसरे नविन डॉक्टर वाघमारे साहेबांना ही ते समजत नसेल. साहेब ती गरजेची वस्तु आहे. माझी ह्या विषयावर तुम्हाला विनंती आहे सत्ताधाऱ्यांनी हा विषय आणला त्यांच्या भावना चांगल्या आहेत. चांगल्या वाईट नाहीत. करता आले ते 100 टक्के करा. मात्र सध्या ज्या तिथे वास्तुवर ज्या सोयी सुविधा आपल्याला ज्या पुरवल्या पाहिजेत त्याच्यावरती साहेब ह्या अधिकाऱ्यांना बोलवा आणि विचारा की याच्या कॅबीनमध्ये बंद पडलेला ए.सी. किती दिवसात रिपेअर होतो आणि तिथे डायलेसिस मशीन 6 महिने बंद आहे. त्याला अजूनपर्यंत का केले नाही. एक्स रे मशीन आज वर्षभर बंद आहे. त्याला ऑपरेटर नाही त्याच्यावरती त्यांनी काय केले त्याचा जवाब विचारा. ही जबाबदारी कोणाची. ह्या ज्या मोठमोठ्या कल्पना आपल्या आहेत काल्पनिक बाबी याच्यावरती चर्चा केली पाहिजे. आहे त्या सोयींना साहेब चालू करुन द्या ही माझी आपल्याला कळकळीची विनंती आहे सभागृहामध्ये.

निलम ढवण :-

महापौर मॅडम एका वाक्यात सुचना आहे की कुठचाही याचा जसे जुबेर इनामदारजी यांनी सांगितले बऱ्याचशा गीवरी बंद आहेत त्याची लोकांना सेवेसाठी मिळत नाही. अशाच पध्दतीने फक्त युनिट उभे न करता त्याचा योग्य रितीने लोकांना त्याचा फायदा होत असेल किंवा फायदा करावा आणि जे युनिट लावलेले आहेत ते भले डायलेसिसचे असु देत, एक्स रे चे असु देत बाकीचा नाही का प्रशासनाला किंवा आपल्या सत्ताधाऱ्यांना पण मग त्याच्यावर पण अंकुश ठेवा ना. ते करुन घ्या. लोकांना त्याची सेवा मिळाली पाहिजे. हे 15-15 लाखांचे 25 लाखांचे होतात. मग तिथे ह्या मशीन बंद आहेत आरोग्य विषयक प्रशासन सरियस नाही आहे का? ह्या विषयावर लक्ष द्या. नविन नविन करायला फायदा नाही. ते पाहिजे जे लोकांना पाहिजे किंवा जास्तीत जास्त सुविधा आपल्या मिरा भाईंदरच्या लोकांना नागरिकांना मिळाली पाहिजे ह्या एरियातच मिळाली पाहिजे ही प्रांजळ इच्छा आमची पण आहे. आणि ते करावं परंतु जे केलेले आहे. त्यातुन लोकांना सुविधा मिळत नाही. तर त्याच्यावर पहिल्यांदा लक्ष द्या.

मा. महापौर :-

सन्मा. सदस्या जैन मॅडम, सन्मा. सदस्य दळवी साहेब, ढवण ताई, इनामदार ह्या सर्वांनी अतिशय चांगल्या सुचना ह्या ठिकाणी केलेल्या आहेत. मला असे वाटते प्रशासनाचे खरोखर दुर्लक्ष होत चालले आहे. उपायुक्त वाघमारे साहेब मिरा भाईंदर शहरामध्ये ही जनता ही महापालिकेला किंवा महापालिकेच्या प्रशासन अधिकाऱ्यांकडे वेगळ्या नजरेने पाहते. आज भले आम्ही सत्तेवर आहोत परंतु जनतेला काम पाहिजे सत्ता कोणाचीही असो जनतेचे काम करणे हे तुमचे कर्तव्य आहे आणि आम्ही लोकप्रतिनिधी सुध्दा लोकांनी आम्हाला निवडून दिले म्हणून त्याच्याशी कटीबध्द आहोत. ज्या रुग्णालयामध्ये एक्स रे मशीन नाही डायलेसिस मशीन काम करत नाही. रुग्णांवरती योग्य तो उपचार होत नसेल तर ही खंताची बाब आहे. मला असे वाटते की संबंधित अधिकाऱ्यांनी त्यावर योग्य ती देखरेख केली पाहिजे आणि ह्या बाबतच्या सुचना उपायुक्तांना मी दिल्या होत्या परंतु जर अशा पध्दतीचे कामकाज आणि ही पध्दत जर प्रशासनाच्या माध्यमातून होत असेल तर ही खेदाची बाब आहे. आणि जो कोणी अधिकारी योग्य पध्दतीने काम करत नसेल तर त्याच्यावर ही ही महासभा कारवाई करु शकते म्हणून कृपया आपण आपल्या जबाबदारी योग्य त्यारितीने पाळाव्या आणि ह्याबाबत त्वरीत ॲक्शन घेऊन साहेब हा विषय डॉक्टर आपण आहात त्यामुळे हा विषय सगळे आपल्या विभागाशी संबंधित आहेत आणि याबाबत आपल्याला योग्य ती माहिती असेलच आणि हे असे विषय या सभागृहामध्ये चर्चेला यायला नको होते मला असे वाटते आपण ह्याकडे जातीने लक्ष द्या आणि त्वरीत आपण कारवाई कराल आणि आजचा हा जो विषय आलेला आहे याबाबत दळवी साहेब ठराव मांडायला सांगा.

हेतल परमार :-

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरा रोड (पु.) येथील स्व. इंदीरा गांधी रुग्णालयामध्ये नवजात शिशूंसाठी 8 खाटांचे SNCU (SICK NEW BORN CARE UNIT ) चालू करणे व त्याकरीता आवश्यक असलेले डॉक्टर्स तसेच कर्मचारी उपलब्ध करुन घेण्याचा ठराव मा. महासभा

दि.07/06/2019 रोजीच्या महासभेत ठराव संमत झाला होता . प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केली नाही. याच रुग्णालयात NICU कार्यान्वीत करणेबाबत लोकप्रतिनिधी व नागरीकांची मागणी असल्याने प्रशासनाने परिपूर्ण प्रस्ताव मंजुरीकरीता प्रशासनाने पुढील मा . महासभेत सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

**दिपीका अरोरा :-**

माझे अनुमोदन आहे.

**मा. महापौर :-**

प्रकरण क्र. 41 हा ठराव सन्मा. सदस्या हेतल परमार यांनी मांडलेला आहे. तो सर्वानुमते मंजूर करण्यांत येत आहे. पुढचा विषय घ्या.

**प्रकरण क्र. 41 :-**

महानगरपालिकेच्या स्व . इंदिरा गांधी रुग्णालयामध्ये आत्यावश्यक सेवेकरीता NICU कार्यान्वीत करणेबाबत.

**ठराव क्र. 32 :-**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या मिरारोड (पु.) येथील स्व . इंदीरा गांधी रुग्णालयामध्ये नवजात शिशूंसाठी 8 खाटांचे SNCU (SICK NEW BORN CARE UNIT ) चालू करणे व त्याकरीता आवश्यक असलेले डॉक्टर्स तसेच कर्मचारी उपलब्ध करुन घेण्याचा ठराव मा . महासभा दि.07/06/2019 रोजीच्या महासभेत ठराव संमत झाला होता . प्रशासनाने त्याची अंमलबजावणी केली नाही. याच रुग्णालयात NICU कार्यान्वीत करणेबाबत लोकप्रतिनिधी व नागरीकांची मागणी असल्याने प्रशासनाने परिपूर्ण प्रस्ताव मंजुरीकरीता प्रशासनाने पुढील मा . महासभेत सादर करावा असा मी ठराव मांडत आहे.

सुचक :- श्रीम. हेतल परमार अनुमोदन :- श्रीम. दिपीका अरोरा

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-

महापौर

मिरा भाईंदर महानगरपालिका

**नगरसचिव :-**

प्रकरण क्र. 42, महाराष्ट्र शासनाने निलंबित केलेला मा. स्थायी समिती सभा दि. १७/०८/२०२०, ठराव क्र. २७ बाबत अभिवेदन सादर करणेबाबत.

**धृवकिशोर पाटील :-**

महापौर मॅडम, मा. आयुक्त साहेब यांच्या निदर्शनास आणू इच्छितो.

**दिनेश जैन :-**

महापौर मॅडम हा आपला जो विषय आहे त्याच्यामध्ये मूळ विषय हा आहे की आपण महासभेमध्ये हा विषय दि. 07/06/2019 रोजी यासाठी आणला होता की आपल्याला कोणत्याही नगरसेवकाच्या वॉर्डमध्ये जे गार्डन असेल काही पण असतात त्याला आपल्याला ते टाईमावरती काम होत नव्हतं. एक डिपार्टमेंट लाईटचं वेगळ, मजुरच वेगळ, देखभाल दुरुस्तीच वेगळ, नविन रोप लावायचं वेगळ, रंगरंगोटीच वेगळ, खेळणीच वेगळ, शौचालय दुरुस्तीच वेगळ, विद्युत विभागाच वेगळ म्हणून नगरसेवक सगळ्या लोकांना त्रास होत होता म्हणून आपण महासभेध्ये हा विषय आणला होता की आपण ही सगळी वस्तु सुरक्षारक्षक, मजूर पुरवठा, लालमाती, शेणखत, औषधे, देखभाल निगा, नविन रोप लावणे, रंगरंगोटी, दुरुस्ती खेळणी दुरुस्ती, शौचालय, विद्युत दुरुस्ती हा ठराव केला होता की आपण सर्व मिळून एकच टेंडर काढायचे म्हणजे आपल्याला त्यासाठी दहा ठिकाणी फिरायची गरज नाही. आता सध्या माझ्या वॉर्डमध्ये दोन महिन्यापासून

